

# हाकारा

वर्ष एकोणिसावे • अंक दुसरा
एप्रिल – जून १९९८

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. अ. रा. कुलकर्णी |
| उपाध्यक्ष | : | वैद्यरत्न भा. पु. नानल |
| मुख्य सचिव | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| सह सचिव | : | श्री. पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : | डॉ. वि. श्री. कुलकर्णी |
| सभासद | : | डॉ. न. शं. देवधर |
| | : | डॉ. विजय भानू |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | डॉ. शं. गो. देवगावकर |
| | : | ॲड. पद्माकर वळवी |
| | : | श्रीमती आरती कौलगेकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | | २ |
| ❖ पंचायत राज्य आणि जनता | प्रा. अ. रा. कुलकर्णी | ३ |
| ❖ वारल्यांमधला माणूस जागा करणाऱ्या ''गोदाराणी'' श्रीमती गोदावरी परुळेकर | डॉ. गोविंद गारे | १४ |
| ❖ मानवशास्त्र : एक आढावा | प्रा. वि. श्री. कुलकर्णी | १९ |
| ❖ आदिवासी विकासाच्या दशा आणि दिशा | श्री. जनार्दन वळवी | २३ |
| ❖ पामल गौतमेच्य किनाऱ्याहून | सौ. कुसूम अलाम | २८ |
| ❖ आदिवासी एकता परिषद : संमेलन वृत्तांत | राजू पांढरा | ३० |
| ❖ ऐतिहासिक वैरागड | सौ. कुसूम अलाम | ३२ |
| ❖ आदिवासी भागातील महिला ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण शिबिर : एक आढावा | पुरुषोत्तम आगाशे | ३४ |
| ❖ पुस्तक परीक्षण | डॉ. शौनक कुलकर्णी | ४० |
| ❖ पुस्तक परीचय | ग. शां. पंडित | ४५ |
| ❖ कविता : खंडीभर / म्हसा जत्रेचा तमाशा | भुजंग मेश्राम | ४६ |


**वर्ष एकोणिसावे :**
अंक -दुसरा
एप्रिल - जून १९९८

**मूल्य रू. २०/-**

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
दूरध्वनी : ३८७२१९

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
**मुखपृष्ठ व सजावट**
पुरुषोत्तम आगाशे

**अक्षरजुळणी**
सन ग्राफीक्स्
दत्तवाडी, पुणे ३०.

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
शैलेश आर्ट प्रिंट
१३६, नारायण पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय

हाकाराचा हा अंक वाचकांच्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

कायद्यातील तरतुदींमुळे पंचायत राज्य अस्तित्वात आले. लोकशाहीचे विकेंद्रीकरण व्हावे, सर्व लोकांना विकास प्रक्रियेमध्ये सहभागी होता यावे ही पंचायत राज्याची संकल्पना. या पंचायत राज्याबद्दल लोकांना काय वाटते ? त्यांच्या हातात सत्ता आली का ? पंचायत राजमुळे गावच्या विकासाला चालना मिळाली का ? लोकप्रतिनिधींबद्दल लोकांना काय वाटते ? यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न प्रा. अ. रा. कुलकर्णी यांनी 'पंचायत राज्य आणि जनता' या लेखातून केला आहे.

ठाणे जिल्ह्यातील वारली लोकांना संघटित करून प्रस्थापितांविरुद्ध संघर्ष करणाऱ्या गोदूताई आपल्या सर्वांच्याच परिचयाच्या आहेत. वारल्यांमध्ये अस्मिता जागवण्याचे महान कार्य गोदूताईंनी केले आहे. डॉ. गोविंद गारे यांनी आपल्या लेखातून कै. गोदावरी परूळेकर यांचा जीवनपट उलगडून दाखवला आहे.

मानवशास्त्र ही सामाजिक शास्त्रांमधील महत्वाची विद्याशाखा. मानवाचा सर्वांगीण दृष्टीकोनातून अभ्यास हे या शाखेचे वैशिष्ट्य. पूर्वीच्या काळी मानवशास्त्रज्ञ आदिवासी जमाती, त्याच्या चालीरिती, संस्कृती वगैरेंचा अभ्यास करत असत. औद्योगिकरण व शहरीकरणामुळे जगामध्ये झपाट्याने बदल होत आहेत. विकास प्रक्रियेच्या ओघामध्ये मानवापुढे निरनिराळ्या समस्यादेखील उद्‌भवत आहेत. या समस्यांचा अभ्यास करून त्यावर तोडगा काढण्यासाठी मानवशास्त्राचा उपयोग होऊ शकतो. अशा या मानवशास्त्राचा परिचय प्रा. वि. श्री. कुलकर्णी यांनी आपल्या लेखातून करून दिला आहे.

नळोदा येथे ११ व १२ एप्रिल १९९८ रोजी पहिले आदिवासी विचारवेध संमेलन पार पडले. या संमेलनाचे उद्‌घाटन ख्यातनाम आदिवासी समाजसेवक श्री. जनार्दन महाराज वळवी यांनी केले. त्यांच्या उद्‌घाटनपर भाषणातून आदिवासी समाजाच्या विकासाबद्दल त्यांनी आपली मते मांडली आहेत.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने नुकत्याच घेतलेल्या आदिवासी भागातील महिला सदस्य प्रशिक्षण शिबिरांचा आढावा श्री. पुरूषोत्तम आगाशे यांनी घेतला आहे. महिला सदस्यांविषयी गोळा केलेली माहिती निश्चितच उद्‌बोधक आहे. सौ. कुसूम अलाम यांनी करून दिलेला वैरागड या विदर्भातील ऐतिहासिक स्थळाचा परिचय वाचनीय आहे. याशिवाय पुस्तक परीक्षण, पुस्तक परिचय ही सदरे आहेत. तसेच सौ. कुसूम अलाम व भुजंग मेश्राम यांच्या आशायघन कविताही आहेतच.

'हाकारा' चा हा अंक सर्वसामान्य वाचक व शिक्षक, विचारवंत, आदिवासी अभ्यासकांना खचितच आवडेल अशी आशा वाटते. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

\- कार्यकारी संपादक

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# पंचायत राज्य आणि जनता

- प्रा. अ. रा. कुलकर्णी

विकासकार्यासाठी जनतेचे सहकार्य अधिकात अधिक संपादन करणे, त्यांना उपक्रमशील बनविणे, हा विकेंद्रीकरणामागील प्रमुख हेतु मानला जातो. योजना अपूर्ण राहतात किंवा असफल होतात याचे कारण त्या सदोष आहेत हे नव्हे, तर त्या कार्यान्वित करणारी माणसे- मग ते सरकारी अधिकारी असोत, वा नागरिक असोत- प्रामाणिकपणे आपले कार्य करीत नाहीत असे म्हटले जाते. कार्यक्षमता वाढावी, लोकांना योजनांविषयी आत्मीयता वाटावी. योजना आपल्या दाराशी आली आहे तिचा स्वीकार करणे वा अव्हेर करणे आपल्यावर अवलंबून आहे. या भावनेची वाढ सामान्य जनात व्हावी या हेतूने प्रेरित होऊनच पंचायत राज्याचा अभिनव प्रयोगाचा प्रस्ताव सरकारने केला आहे.

पंचायत राज्य अथवा जिल्हा परिषदांच्या राज्याला कार्यान्वित होऊन काही काळ लोटला आहे. तेवढ्या अल्पमुदतीत त्याच्याकडून काही फार मोठ्या अपेक्षा करणे हे अनुचित ठरेल. हा प्रयोग नवा आहे. नव्या मोठ्या जबाबदाऱ्या जनतेच्या प्रतिनिधींना उचलायच्या आहेत आणि असे करीत असताना पोलादी चौकटीतला शासनवर्ग आणि असंतुष्ट जनता यांची सांगड घालून विकासाचे कार्य चालू ठेवायचे आहे. तेव्हा प्रतिनिधींच्या कार्याचे मूल्यमापन करताना ही पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे.

पंचायत राज्य रुजविण्यासाठी प्रतिनिधींनी काय केले, हे जाणून घेणे जसे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे जनतेने हा प्रयोग यशस्वी होण्यासाठी काय प्रयत्न केले, या प्रयोगाविषयी तिच्या काय प्रतिक्रिया आहेत आणि तिचे सहकार्य मिळविण्यासाठी काय केले पाहिजे हे समजून घेणेहि श्रेयस्कर ठरेल. या उद्देशानेच मराठवाड्यातील पाच जिल्ह्यातील काही नागरिकांकडे एक प्रश्नपत्रिका पाठवली होती. पंचायत राज्याशी लोकांनी जितके सहकार्य केले नसेल त्याहून अधिक प्रमाणात सहकार्य या आमच्या प्रयोगाला मिळाले समाजातील सर्व थरांतील लोकांनी आपली मते प्रांजळपणे मांडली व या प्रयोगाचा वस्तुनिष्ठपणे अभ्यास करण्यास हातभार लावला. प्रश्नांची उत्तरे पाठविण्यात शेतकरी, सत्तारूढ पक्षाचे सभासद, विरोधक, व्यापारी, मास्तर, वकील, डॉक्टर समाजसेवक इत्यादि विविध क्षेत्रातील व्यक्ती आहेत आणि लोकांनी आपले विचार निर्भीडपणे मांडले आहेत. लोकांचा हा प्रतिसाद म्हणजे लोकशाहीचा विजय. त्याचबरोबर जनतेची वाढणारी जागरूकता, असे मानावयास काही हरकत नाही.

### गावच्या गरजा

प्रत्येक व्यक्ती ही प्रामुख्याने प्रथम आपल्या गावचा आणि तदनंतर आपल्या टापूचा किंवा ज्या नजीकच्या गावांशी आपले संबंध आहेत त्याचा विचार करते हे गृहीत धरून असे विचारण्यात आले होते की, तुमच्या गावच्या पाच प्रमुख गरजा कोणत्या, तुमच्या टापूत काय विकासकामे चालू आहेत, तुम्ही त्यासंबंधी काय प्रयत्न करता ?

आपल्या गावच्या गरजा सांगताना प्रत्येकाने आपल्या व्यवसायला अग्रस्थान दिले आहे असे दिसून येते. अर्थात हे स्वाभाविकच आहे. छोटा शेतकरी म्हणतो, बी-बियाणे द्यावीत, बांध घालावेत, पिकावरील कीड नाहीशी करण्याकरिता उपाययोजना करावी; मोठा शेतकरी, ऑइल इंजिन्स, सोसायटी व शेतीची मोठी अवजारे यांची मागणी करतो; व्यापाऱ्याला

सडक, गोदाम, बाजार, वीज या गोष्टी अत्यावश्यक वाटतात; एका महिलेने तर स्त्रियांसाठी संडास आणि महिला मंडळाची आवर्जून मागणी केली आहे. सरकारी नोकराला घराचा प्रश्न महत्वाचा वाटतो; डॉक्टरला दवाखान्यासाठी सोयी उपलब्ध व्हाव्यात असे वाटते; तर मास्तरांना शाळा, शाळेची इमारत या मुलभूत गरजा वाटतात. हरिजनांनी पिण्याचं पाणी आणि घरांना पत्रे मागितले आहेत, तर काहींनी अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि स्थिर जीवन किंवा शिक्षण, न्याय, समानता नैतिक जीवन अशा तऱ्हेच्या वैश्विक गरजांची वकिली केली आहे.

पण या साऱ्या गरजांची यादी वाचत असताना काही अपवाद वगळल्यास, त्यात अप्रमाणिकपणाचा चुकून सुद्धा वास येत नाही. सडक, शाळा, पाणी, दिवाबत्ती, दवाखाना, शेती सुधारणा, स्वस्त धान्याचे दुकान, नाल्या, नदीवर बंधारे, बाजाराकरिता ओटे, बसथांबा, संडास, टपाल कार्यालय इत्यादि गरजा प्रमुखपणे मांडल्या आहेत, त्यात अवास्तव असे काहीच नाही.

आपल्या गावाला सडक असावी, दुसऱ्या गावाला जोडणारी सडक असावी, पावसाळ्यात दळणवळणाला त्रास होतो, इतर गावाशी संबंध तुटतो, जीवन विस्कळित होते, ही जवळ जवळ प्रत्येक खेड्याचीच करूण कहाणी आहे. दळवळणाच्या बाबतीत मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यातील इतर विभागांच्या मानाने अप्रगत असल्यामुळे लोकांनी ही सडकेची मागणी आवर्जून केली तर त्यात नवल नाही. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा शहरातील पाण्याच्या सोयींपेक्षा अत्यंत भेडसावणारा असा आहे. यासाठी विहिरींची, नळांची, आडदुरुस्तीची, बोअरिंगची मागणी लोकांनी केली आहे. हरिजनांना स्वतंत्र विहिरीची आवश्यकता आजही भासते.

## रस्ता, पाणी व शाळा

आपल्या गावाला शाळा पाहिजे, ही मागणी बहुतेक सर्व उत्तर पत्रिकांतून आढळते. ही मागणी करताना शाळेला इमारत, अपूर्ण इमारती पूर्ण करण्यासाठी पैसा, शिक्षणाचं साहित्य, शिक्षक, त्यांची राहण्याची सोय, माध्यमिक अथवा दुय्यम शिक्षणाच्या शाळा, शाळादुरुस्ती, ग्रंथालय, प्रौढशिक्षण, वैद्यकीय महाविद्यालय, तंत्रशिक्षण संस्था इत्यादि गरजांचा उल्लेख केला आहे. एका शाळेतील मुख्याध्यापकाची बदली करावी, असे शिक्षणाशी संबंध नसलेल्या माणसाने आपल्या गावची गरज म्हणून सांगितले आहे. बदलीचे कारण काय तर मुख्याध्यापक त्या गावचाच आहे, तो काम करीत नाही, फक्त हुकूमशाही गाजवितो असे सांगितले आहे. लोकांनी ज्या तपशिलाने शिक्षणासंबंधीच्या मागण्या केल्या आहेत त्यावरून शिक्षणाची आस्था दिवसेंदिवस वाढत चालली आहे, असा निष्कर्ष काढता येईल.

ग्रामीण-सार्वजनिक आरोग्याबाबत, दवाखाना, ड्रेनेज, संडास, रस्ते सफाई, दिवाबत्ती, मोऱ्या, औषधांची पेटी असावी, रस्तेसफाई, डुकरांचा संहार, संडास विशेषत: स्त्रियांसाठी इत्यादि गरजांची नोंद केली आहे. शेतीसुधारणा व्हावी म्हणून बी-बियाणे, कीडनाशक औषधे, शेतीची अवजारे, बंडिग, विहिरी, खत जमविण्याची व्यवस्था, कंपोस्ट खड्डे, पाटबंधारे, धरण, इंजिने इत्यादि गरजा प्रमुख म्हणून मांडल्या आहेत.

उद्योग, व्यापार आणि इतर गरजांच्या यादीत शहरांना जोडणारे रस्ते, नद्यावर पूल, बाजाराकरिता ओटे, गोदाम, बँक, टपाल कार्यालय, सहकारी संस्था, पॉवर मीटर, बससेवा, फळाचा रस काढण्याचा कारखाना, ग्रामोद्योग, रेल्वे, वीज, गावठाण-वस्ती, घरे, ग्रामपंचायतीची कार्यालये, व्यायामशाळा, पोलिस चौकी, चावडी, सार्वजनिक सभागृह, जनावर-बाजार इत्यादि बाबींचा समावेश होतो.

गावच्या गरजांचा अग्रक्रम चाळीत असतांना, त्या गावची प्रगती अथवा आर्थिक स्थिती चटकन् ध्यानात येते. वीज, पॉवर मीटर, रेल्वे, बँका अशा मागण्या करणारी गावे फारच थोडी आहेत. पाणी, सडका, शाळा, दिवाबत्ती या मागण्या करणारीच बहुसंख्य खेडी असल्यामुळे सुधारणेच्या कोणत्या अवस्थेत आपण अद्याप आहोत याची स्पष्ट कल्पना येते.

## लोकांनी काय केले ?

'आपण गरजा मांडल्या, पण त्याच्यासाठी प्रयत्न केले होते का ?' असा प्रश्न विचारला असताना, 'पुढाऱ्यांना भेटलो, अर्ज केले, लोकांच्या सह्या गोळा केल्या, वर्गणी जमा केली, श्रमदानाची तयारी दर्शविली' अशी, त्याचबरोबर 'काही केले नाही.' अशीही उत्तरे दिली आहेत. ग्रामपंचायतीने जर योजना आखली तर तिच्या पूर्तीसाठी गावकऱ्यांनी काही वर्गणी जमा करावी लागते, श्रमदानाची तयारी दर्शवावी लागते; तरच त्या योजनेला काही मूर्त स्वरूप येण्याची अथवा चालना मिळण्याची शक्यता असते. नुसते प्रयत्न करणे, अथवा लोकांच्या सह्या गोळा करणे आणि काही न करणे यात वस्तुत: तसा काहीच फरक नाही. पण लोक जेव्हा निश्चितपणे सांगतात की गावात शाळा सुरू व्हावी म्हणून, पैसे जमा करून पोस्टात ठेवले, ते तीन वर्षे तसेच पडून आहे, शाळा काही उभी राहात नाही, किंवा आपल्या गावात टपाल कार्यालय निघावे म्हणून आपल्या गावची टपाल व्यवहाराची माहिती काढून दिली, बँकेची शाखा निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न केले, पण 'पोलिस चौकी झाल्याखेरीज बँक निघू शकत नाही;' अशी जेव्हा लोक तक्रार करतात, तेव्हा त्या तक्रारींना काही अर्थ असतो आणि त्यांची छाननी करणे आवश्यक होते.' मागणी केली पण दाद नाही,' अशी जी सरसकट ओरड केली जाते, ती फक्त अशा विशिष्ट बाबींपुरतीच मर्यादित असते असे म्हणावे लागेल. काही व्यक्तींनी स्पष्टपणे म्हटले आहे की, वर्गणी जमविणे त्याचप्रमाणे श्रमदानाचा कार्यक्रम आखणे या दोन्ही गोष्टी समप्रमाणात कठीण असल्यामुळे मागण्या पूर्ण होत नाहीत.

'तुमच्या गरजांसाठी ग्रामपंचायत, तालुका पंचायत अथवा जिल्हा परिषद यांनी काही केले आहे काय ?' या प्रश्नाला नकारात्मक उत्तरे देण्याची प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात आढळते, 'प्रयत्न केले नाहीत, करण्याची सोय नाही, त्याचा काही उपयोग नाही, सभासद काही हालचाल करीत नाहीत, खटपट करीत नाहीत, सभासदांच्या घरी जाऊन सभेच्या कागदपत्रावर त्यांचे अंगठे घेतात, गाव धरणाखाली जाणार म्हणून उपेक्षा करतात. हरिजनांसबंधींच्या गरजा टाळतात, खेड्यांकडे त्यांची दृष्टि नाही, ठराव होतात, अंमलबजावणी होत नाही, कागदोपत्री चर्चा-विचार होतात, फक्त आश्वासने देतात' इत्यादी उत्तरे बहुसंख्य नागरिकांनी दिली आहेत.

या संस्थांनी जे काही थोडेबहुत काम केले त्याची नोंद काही व्यक्तींनी नमूद केली आहे. दवाखाना, सडक, शाळा, बांधकाम, दिवाबत्ती, विहिरी बांधणे, दुरुस्त करणे, रस्तादुरुस्ती याबाबतीत 'एका वर्षाच्या अवधीत जेवढे शक्य आहे तेवढे केले आहे,' असे स्थूल मानाने त्यांना वाटत असावे. काहींनी या संस्थांच्या अडचणी समजून घेण्याचाही प्रयत्न केला आहे. गावात वर्गणी जमा होत नाही. पंचायतींचे कार्य हे अनुदानावर अवलंबून असते. बंधने पडतात, त्या एका वर्षात जादूची कांडी फिरवून पंचायत राज्य दूर करू शकणार नाही; तेव्हा या संस्था काहीच कार्य करीत नाहीत, असे म्हणणे वस्तुस्थितीला सोडून आहे असे वाटते.

## विकास रूळला आहे

आपल्या टापूतील विकास योजनांची माहिती बहुसंख्य लोकांना आहे, असा निष्कर्ष काढता येण्याजोगी माहिती नागरिकांनी पुरविली आहे. विकास

योजनेला 'भकास योजना' म्हणून हिणविणारे अथवा याबाबतीत 'न लिहिलेलेच बरे' म्हणून मौन पाळणारे काही नागरिक आढळत असले तरी 'विकास योजना' हा शब्द लोकांच्या जीवनात चांगलाच रुळला आहे असे म्हणता येईल. आपले गाव विकास गटाच्या कोणत्या अवस्थेत (Stage) आहे, कोणती कामे पूर्ण झाली, कोणती चालू आहेत, धरणाचे काम कसे चालले आहे, पूर्णा योजना म्हणजे काय, दोरकाम-विणकामाची शाळा आहे, बंधारा बांधण्याचे काम, सडकफाटा, समाजकल्याण-केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, आरोग्य-केंद्र, को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, ड्रेनेज, विहिरी, ऑइल इंजिन्स, कर्जे, गोदाम, ऑइलमिल, यासंबंधीची माहिती दिली आहे. अर्थात् मिस्किलपणे विकास 'अधिकाऱ्याचे बंगले बांधून झाले,' असेही म्हटले आहे; तर एक टीकाकार म्हणतात, 'इमारतीचा पाया खणला आणि नंतर तो कोरड्या मातीने भरला एवढाच विकास आमच्या टापूत झाला. काही भरीव कामगिरी नाही; पण तगाईवाटप, पत्रे वाटप इत्यादि कामे झाली असे म्हणणारेही काही आहेत.

## निराशा अधिक

या साऱ्या उत्तरांची छाननी केली असता, विकासकार्य कमी, अधिक प्रमाणात चालू आहे याबद्दल जनतेत फारसे दुमत आढळून येत नाही. पण याला जोडून जो एक प्रश्न विचारला आहे, त्याची दिलेली उत्तरे मात्र वरील विधानाशी सुंसगत वाटत नाहीत. 'या योजनांविषयी आणि त्यांच्या कामांविषयी तुमचे काय मत आहे,' असे विचारले असतां, 'योजना चांगल्या आहेत त्या लवकर व्हाव्यात,' असे मत प्रगट केले आहे. 'पण ते काम प्रतिनिधींकडून होणार नाही किंवा सरकारी अधिकाऱ्यांकडूनही व्यवस्थित होणार नाही,' असे म्हटले आहे. ''फक्त कागदी घोडे नाचवीत, काम कसेबसे उरकून काढतात, त्याबद्दल आस्था नाही, निराशा वाटते, कोणतीच योजना पैसा असून समाधानकारकरीत्या पार होत नाही, प्रतिनिधींच्या हेकेखोर स्वभामुळे कामे अर्धवट आहेत, सारा पैशाचा अपव्यय चालला आहे, योजना अपुऱ्या राहिल्यामुळे 'अर्धा हकीम जान का खतरा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे, रस्ता झाला, पण नंतर तिकडे लक्ष नाही, हे तात्पुरते नाटक काय कामाचे ? गटबाजी वाढली आहे, निष्काळजीपणा व बेपर्वाई वाढली आहे, कृतिशून्यता योजनेबद्दल सहानुभूती पण कामाबद्दल तिरस्कार असे असल्यामुळे असंतोष वाढला, कामाचा वेग मंदावला, अंमलबजावणी नाही,' अशी विरोधी मते तिच्या कार्याविषयी व्यक्त केली आहेत.

काही थोड्या लोकांनी मात्र समाधानाचा सूर काढला आहे. 'या योजनांमुळे ग्रामीण भागात चैतन्य निर्माण झाले आहे. पूर्वी लोक सरकारी अंमलदाराला भीत आता ही भीती चेपली आहे आणि राज्य आपले आहे, अशी भावना निर्माण झाली आहे; पाटील-तलाठी यांचे साम्राज्य खलास झाले आहे, आणि त्याचे सारे श्रेय या पंचायत राज्याच्या कार्याला अथवा विकासकार्याला आहे,' असे मानले आहे. 'गाव करी ते राव न करी,' असे काहींना वाटते.

असे जरी असले तरी हा नैराश्याचा जो सूर सर्वसाधारणपणे दिसतो. 'आपल्याला याचे काहीच सुखदु:ख नाही,' अशी जी भावना निर्माण झाल्यासारखी वाटते, तिचा विचार संबंधितांकडून झाला पाहिजे. कारण पंचायत राज्याच्या यशाची गुरुकिल्ली म्हणजे जनतेचे सहकार्यच होय.

## प्रथम आश्वासनं नंतर झिडकी

निवडणुकीच्या संदर्भात एक प्रश्न विचारला, 'प्रतिनिधींनी जातीपातीचा प्रचार केला होता काय, त्यांनी काही वायदे केले होते काय आणि काही जाहीरनामा काढला होता काय ? प्रश्नांना फारशी काही समाधानकारक उत्तरे आली नाहीत. अर्थात

जाहीरनाम्याच्या बाबतीत 'तसा काही नव्हता' असे बहुतेकांनी म्हटले आहे, आणि ते सत्य असावे. 'सभांतून वायदे केले, आश्वासने दिली, हजारो दिली,' असे बहुसंख्य नागरिकांचे म्हणणे आहे. काहींनी स्पष्टपणे म्हटले आहे की, 'आश्वासने काही दिली नाहीत, पण पैसा मात्र दिला !' काहींनी गावच्या गरजा लक्षात घेऊन 'रस्ते बांधू, शाळा देऊ, पत्रे देऊ, विहिरी बांधून देऊ' असे वायदे केले होते. 'प्रथम आश्वासने नंतर झिडकी' असे मत एकाने दिले.

'प्रचार करताना जातीपातीचा उल्लेख केला होता का ?' या प्रश्नावर मात्र भिन्न भिन्न उत्तरे मिळतात. बऱ्याच नागरिकांनी 'अशा प्रकारच्या प्रचाराची आवश्यकताच नव्हती,' असं म्हटले आहे. 'अज्ञानामुळे काही लोकांनी तसा प्रचार केला, पण त्याचा काही विशेष उपयोग झाला नाही.' पराभूत झालेला एक उमेदवार म्हणतो माझ्या प्रतिस्पर्ध्याने जातीचे भांडवल केले म्हणून मी पडलो.' परंतु विजयी उमेदवार आणि हा पराभूत उमेदवार यांची जात एकच होती हे येथे नमूद करावेसे वाटते.

## प्रांजळ उत्तर

अर्थात काही लोकांनी कानावर हात ठेवले आहेत, काहींनी 'असा प्रचार अपरिहार्य आहे,' असे विधान केले आहे, तर काहींनी 'असे ऐकतो' अशी पोकळ उत्तरे दिली आहेत. परंतु दिलेल्या उत्तरावरून असे वाटते की जातीपेक्षा वैयक्तिक हेवेदावे, उखाळ्या-पाखाळ्या, दमदाटी यांचा मात्र प्रचारकार्यासाठी उपयोग करून घेतला असावा. पाटील-देशमुख यांचे संघर्ष, वैयक्तिक तंटे यांचाच आपले घोडे दामटण्यासाठी वापर केला असावा. सगेसोयरे आणि हितचिंतक यासाठी सर्वत्र फिरत होते. एका निवडून आलेल्या सभासदाने मात्र प्रामाणिकपणे असे म्हटले आहे की 'जातीपातीचा प्रचार झाला हे मला जाणवले, कारण मीच निवडून आलो.' हा प्रांजळपणा खरोखरीच वाखाणण्यासारखा आहे. त्या संस्थांनी जी उत्तरे दिली आहेत. त्यावरून 'आपण हे काही चांगले केले नाही' अशी खंत वाटत असावी असा भास होतो. मूर्खपणामुळे किंवा दुसरे काही फारसे सांगण्यासारखे नव्हते म्हणून जात सांगितली असे काही लोकांनी म्हटले आहे, 'पण प्रचारावर त्याचा फारसा परिणाम झाला नाही किंवा त्याची आवश्यकता नव्हती,' असे मत जे बऱ्याच नागरिकांनी व्यक्त केले आहे ते वस्तुस्थितीला धरूनच असावे असे वाटते.

## अपेक्षाभंगाची बोंब

या निवडणुकीच्या संदर्भात आणखी एक प्रश्न विचारला होता. 'प्रतिनिधींना कोणत्या अपेक्षेनं तुम्ही निवडून दिले ?' 'आपल्या गावाची सुधारणा व्हावी, गाव पुढे यावा, लोकशाही स्थापन व्हावी, सुखी राज्याची निर्मिती व्हावी. अल्पसंख्याकांची कामे त्वरित व्हावीत, गरिबांचे हित साधले जावे, लोकोपयोगी कामे व्हावीत, गावचे प्रश्न सुटावेत, आपण आनंदी होऊ, शांततेने व निर्भयतेने जगता येईल, परिस्थितीचा अभ्यास होऊन विकासकार्यासंबंधी जनतेच्या मनात गोडी निर्माण करावी, जनतेचा कैवार घ्यावा, बहुजनसमाजाचे नेतृत्व करावे, द्रुतगतीने विकास साधावा, प्रोत्साहन द्यावे, आणि गाव उजेडात आणावा, या अपेक्षा होत्या.

...परंतु प्रतिनिधींनी आपल्या अपेक्षा पूर्ण केल्या नाहीत,' असा सूर मात्र सर्व उत्तरपत्रिकांतून दिसतो. असे उत्तर देताना एका वर्षाच्या अवधीत या आपल्या साऱ्या अपेक्षा कशा पूर्ण होतील याचा मात्र कोणी विचार केल्यासारखे दिसत नाही. काहींनी उपरोधाने अशी उत्तरे दिली आहेत की, 'निवडणूक हा एक धंदा आहे, त्यात अपेक्षांचा प्रश्न उद्भवतच नाही,' तर काहींना असे वाटते की, 'करायला गेलो मारुती आणि झाले माकड', असा प्रकार घडला आहे, आपले

प्रतिनिधी भेटत नाहीत- 'गरज सरो आणि वैद्य मरो,' अशी त्यांची वृत्ती दिसते. निवडणुकीनंतर याचे तोंडही पाहावयास मिळत नाही. गावचे काम तर राहोच, पण उलट गावात भांडणे लावतात; एकाने तर असे म्हटले आहे की 'हे प्रतिनिधी आपल्याकडे न आलेलेच बरे, कारण यांचा पायगुण असा की जेथे जातील तेथे दुफळी निर्माण होते. मूल ज्या अपेक्षेने आपल्या आईकडे पाहते, तसे आम्ही यांच्याकडे पाहात होतो, पण ही आमची आई सावत्र आई निघाली,' असे निराशेचे उद्‌गारही काही जणांनी काढले आहेत.

## लोकप्रतिनिधींवर रोष

'निवडून आलेले प्रतिनिधी आपले काम करतात किंवा नाही, याची तुम्ही चौकशी केली होती का ? आणि काम न करणाऱ्या प्रतिनिधींबाबत काय करावे असे तुम्हास वाटते ?' अशी पृच्छा केली असता, बऱ्याच लोकांनी प्रतिनिधींना कडवा विरोध केलेला आढळतो. 'आम्ही त्यांना भेटतो, कामाविषयी तगादा करतो, परंतु त्याचा काही उपयोग होत नाही. हे लोक भेटत नाहीत,' अशी तक्रार बऱ्याच लोकांची आहे. 'यांचा आता पेहराव बदलला भाषण बदलले जनतेच्या जीवनाशी ही खेळ खेळताहेत, शाब्दिक व पोकळ आश्वासने देणे, आपला स्वार्थ साधणे, पार्ट्या झोडणे, उद्‌घाटने करणे, सभांना जाणे, भत्ते उकळणे या कामातच हे प्रतिनिधी गुंतलेले असल्यामुळे त्यांना इतर लोकोपयोगी कामे करण्यास अवसरच मिळत नाही' अशी गाऱ्हाणी मांडली आहेत.

वरील आरोपांत सत्यांश असेलही, परंतु या उत्तरपत्रिका वाचीत असताना, अनेक वेळा विरोधासाठी विरोध केला आहे असे वाटते. त्याचबरोबर काही लोक चौकशी मात्र करीत असावेत असेही वाटते. काही जणांनी असे म्हटले आहे की, केवळ चौकशीच करतो असे नाही, तर कामही करवून घेतो. काहींच्या मते 'सरपंच आपली कामे करतात, पण जिल्हा परिषदेचे सभासद मात्र दुर्लक्ष करतात.' असे असले तरी 'गावच्या उन्नतीसाठी झटणारे काही सभासदही आढळतात' अशी ग्वाही काहींनी दिली आहे. 'आपल्याला खरे प्रतिनिधित्व करण्यास संधीच दिली जात नाही,' असे काहींचे म्हणणे आहे.

प्रतिनिधी काहीच काम करीत नाहीत हा समज वस्तुस्थितीला धरून नाही असे वाटते. कारण जिल्हा परिषदेच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा चांगल्या प्रमाणात प्रतिनिधी आपल्या गावच्या हक्काविषयी जागरूक असल्याचे दिसले. आपल्या गावचा रस्ता, आपल्या गावात अपुरे राहिलेले बांधकाम पूर्ण करण्याची तजवीज, सधन शेतीसाठी सरकारी साहाय्य उपलब्ध करून घेणे, शैक्षणिक गरजा मांडणे इत्यादि जनतेच्या मागण्या व्यवस्थितपणे मांडून त्यांना मंजुरी घेतली जात असे. अनभ्यासाचा प्रश्न समजण्याची पात्रता नसल्याचा प्रतिनिधींवर आरोप काहींनी केले आहेत.

परंतु कामकाजाचे निरीक्षण करीत असतांना, प्रतिनिधीने आपल्या गांवच्या गरजाचा अभ्यास केला नाहीं किंवा त्यांला समस्याचे आकलन झाले आहे नाही असा समज होण्यासारखे कांहीच घडत नव्हतें असे दिसून आले. याउलट, होणाऱ्या चर्चेत ते भाग घेत होते, मुद्दे टिपून घेत होते, आपले म्हणणे कळकळीनें मांडीत होते असेंच दिसत होते.

## काम न करणारास क्रॉस दाखवावा

काम न करणाऱ्या प्रतिनिधींना खुर्च्या खाली करावयास सांगावे, त्यांना परत बोलवावे, त्यांना राजीनामा देण्यासा सांगावे आणि काहींनी तर काम न केल्याबद्दल त्यांना 'क्रॉस' दाखवावा असाही सल्ला दिला आहे. काही सुज्ञांनी असे म्हटले आहे की 'त्यांना आणखी संधी द्यावी, पक्षाच्या शिस्तीखाली आणून त्यांच्याकडून काम करवून घ्यावे, आणि एवढे करून काही सुधारणा झालीच नाही, तर त्यांना परत निवडून देऊ नये.'

हा प्रश्न विचारतांना अपेक्षा अशी होती की, लोक प्रतिनिधींना काही जाब विचारतात किंवा नाही ? सत्तानिरपेक्ष असे ग्रामीण नेतृत्व काही निर्माण होते आहे किंवा नाही ? आपल्या गावच्या समस्यांबद्दल जनता किती जागरूक आहे हे समजावून घ्यावयाचे होते. प्रतिनिधी कार्यप्रवण केव्हा होतील, तर जेव्हा सामान्य नागरिक त्यांना त्यांच्या कार्याचा जाब विचारतील. योजनांविषयी, परिषदेच्या कार्याविषयी जनतेने माहिती करून घेण्याचा प्रयत्न करून घेतल्याखेरीज पंचायत राज्य यशस्वी होणार नाही. उपक्रमशीलता आणि कार्यक्षमता वाढविणे ही पंचायत राज्याची उद्दिष्टे सफल होणार नाहीत, प्रतिनिधीत दोष आहेत असे वाटते, ते कदाचित सत्तानिरपेक्ष ग्रामीण नेतृत्वाचा उदय झाल्यावर राहणार नाहीत. केवळ विरोधासाठी विरोध या तत्त्वाचा अवलंब न करता प्रथम समजावून घेऊन नंतर आवश्यक असेल तर विरोध, असे जर धोरण नागरिकांनी ठेवले, तर पंचायत राज्याच्या उपक्रमात ते शुभदायक ठरेल.

## फरक जाणवत नाही

जिल्हा परिषद अस्तित्वात येण्यापूर्वी व ती आल्यानंतर विकासकामे व इतर कामे अमलात येण्याच्या दृष्टीने काही फरक झाल्याचे तुम्हाला वाटते काय ? कामे लवकर होतात का मागच्यासारखाच उशीर लागतो ?' असा प्रश्न टाकला असताना, बहुसंख्य नागरिकांना कोणत्याच दृष्टिने फरक झाला नाही असे वाटते 'ब्रिटिशांचे राज्यच बरे होते,' असे काही लोक उद्विग्न होऊन म्हणतात, तसे पूर्वीचे निजामाचेच राज्य ठीक होते,' असे म्हणणारेहि काही आढळतात. 'पूर्वी कामे लवकर होत होती. आता पत्राचे उत्तरही येत नाही. दप्तरदिरंगाई वाढली आहे. चौकशी केली असता, शिथिलता वाढली, हस्तक्षेप वाढला, सरकारी अधिकाऱ्यांची जागा-दिरंगाईच्या आण उर्मटपणाच्या बाबतीत-आता लोकनियुक्त पुढाऱ्यांनी घेतली आहे' इत्यादि तक्रारी आढळतात.

अर्थात एक वर्षाचा काळ हा या दृष्टीने विचा करण्यास अपुरा आहे. लोकांना फरक जाणवेल इतकी कामं करावयाची संधी जिल्हा परिषदांना अद्याप मिळालेली नाही. पण काही लोकांनी असे आपले मत मांडले आहे की, 'आता आपल्याला कामे लवकर करून घेता येतात. काही वेळा 'गटबाजी' आडवी येते, पण निदान कामाला वाचा फोडता येते. काही बाबतीत ताबडतोब प्रत्यक्ष खुलासा करून घेता येतो अडचण लवकर दूर होते, लोकप्रतिनिधी अभ्यास असेल तर अधिकाऱ्यांवर एक प्रकारचे दडपण येते आणि कामाचा उरक वाढतो,' असे काहींचे म्हणणे आहे.

जिल्हा परिषदेच्या कामकाजांचे अवलोकन करण्याची जेव्हा संधी मिळाली, तेव्हा वरील विधानांतील सत्यता थोडीफार जाणवली प्रतिनिधींच्या असंख्य प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी अधिकाऱ्यांना आपल्या फायली घेऊन अक्षरशः खडे राहावे लागत असे. उत्तरे देत असताना आपण कोणत्या दिव्यातून जात आहोत असे भावही काही अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत. आपण विचारलेल्या प्रश्नाला समाधानकारक आपला विरोध प्रगट करीत होते. हे सर्व प्रत्यक्ष पाहात असताना, पूर्वीच्या आणि आत्ताच्या पद्धतीत काही फरक पडला नाही, अशी जनतेची भावना का व्हावी, हे कोडे मात्र उलगडत नाही.

## लाच वाढली आहे

'पैरवी, वशिलेबाजी, लाचलुचपत वाढली, भयंकर बोकाळली' अशी मात्र बहुतेकांनी तक्रार केली आहे. 'आता फक्त नावे बदलली' असे काहींचे मत आहे. 'लाचलुचपत अथवा वशिलेबाजीच्या ऐवजी आता पानसुपारी असे म्हणतात,' असे काहींचे मत आहे. काहींचे म्हणणे, 'वशिलेबाजीत वाढ असली तरी लाचलुचपत कमी आहे. पूर्वी गटबाजी नव्हती तिची

ता भर पडली आहे.' काहींनी 'लाचलुचपत आणि शेलेबाजी ७% वाढली' असे प्रमाणही दिले आहे. हीना 'जैसे थे' आहे असे वाटते. या संदर्भात जने म्हटले आहे की '३० रु. पगाराच्या कोतवालाला वील खुशामत केल्याखेरीज पगार मिळत नाही. णजे पगाराचा काही भाग खर्चावा लागतो. चलुचपत, वशिलेबाजी याबाबतचे आरोप तसे सिद्ध णे कठीण असले, तरी जनतेमध्ये अशा तऱ्हेची वना सतत राहणे हे देखील हितावह नाही.

## माची जाणीव

'ग्रामपंचायतीने तुमच्या गावासाठी आणि जिल्हा षदेने तुमच्या भागासाठी काही योजना केल्याचे हास माहित आहे काय ?' असा प्रश्न केला नताना, उत्तरपत्रिकांवरून असे दिसून येते की, या जनाची जाणीव जनतेला आहे. 'बोअरिंग खोदण्याचे ग्रामपंचायती, शाळा बांधण्याचे काम सुरू केले, डक-बांधकाम सुरू केले, पंचायतीने कंदिल लावले, ळेस फर्निचर दिले, पाटबंधाऱ्याची योजना केली, णाची योजना आखली, दवाखाना काढला, डवाड्यासाठी प्रयत्न चालू आहेत, गटारी बांधल्या यादि कामांचा उल्लेख केला आहे.

अर्थात ही सर्वच कामे चांगली झाली आहेत असे सर्वांना वाटत नाही, 'सडकेचे काम अपूर्ण राहिले हे, पूर्वीची बस बंद पडली आहे, शाळेचे बांधकाम च्चे राहिल्यामुळे ती पडली, माजी सरपंचाने यतीसाठी घर बांधले, फक्त पत्रे टाकवयाचे राहिले . नवीन सरपंच म्हणतो. 'या कामाला मी हात वणार नाही. दुसरे घर बांधीन. शाळा बांधल्या पण ोब त्यांनाच माहित' इत्यादि तक्रारिही नोंदविल्या हेत. 'आपण काही समाजकार्य करावे म्हटले, तर पंचायतीचे सहकार्य लाभत नाही,' अशी एका टरांनी तक्रार केली आहे. दवाखान्यासाठी जागा मिळावी म्हणून त्यांनी पंचायतीकडे अर्ज केला, तेव्हा त्यांना स्मशानात जागा दिली. 'असे करताना, रोग्याची सर्व दृष्टीने सोय पाहण्याची तर गावाची इच्छा नसेल ना,' अशी एक पुसट शंकाही त्यांनी व्यक्त केली आहे.

## मतदारांची विचारपूस नाही

'या योजनांबाबत तुम्हाला विचारले होते का ?' असा प्रश्न केला असता, 'आम्हाला विचारले नाही,' असे उत्तर बहुतेकांनी दिले आहे. 'तुम्ही त्यांना काही सांगितले होते का ?' या प्रश्नाला मात्र बहुतेकांनी होकारार्थी उत्तरे दिली आहेत. अर्थात् 'असल्या उठाठेवी आम्ही करत नसतो,' 'लुडबुड करण्याचा आमचा स्वभाव नाही,' 'काही तरी चालले आहे, असे वर्तमानपत्रात वाचतो, पण भाग घेत नाही,' असे म्हणणारेही काही लोक आहेत. 'पण योजना तयार करताना लोकांच्या निकडी वा गरजा लक्षात घेतल्या जात नाहीत, सांगितले असता काही फरक होणार नाही, हे असेच चालणार असे म्हणातात, यांना सत्तेची नशा चढली आहे, पैसा शिल्लक असून त्याचा उपयोग केला जात नाही, विचारावयास गेल्यावर गैरभाषा वापरतात. दुर्लक्ष करतात, सदस्य भेटतात पण वर काय चालले आहे ते सांगत नाहीत. जनतेचा विचार घेतला जात नाही संबंधित इसमाचेच हित-अनहित पाहतात. जनतेचे पाहात नाहीत 'अशा तक्रारी मांडल्या आहेत. प्रतिनिधींना किंवा त्यांच्या कार्याला जो इतरत्र विरोध आपण पाहिला, त्याचा ध्वनी येथे देखील उमटला आहे.

## अस्पृश्यांकडे दुर्लक्ष

'जिल्हा परिषदांकडे जी कामे नेमून दिलेली आहेत, त्यात अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करावेत,' अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. 'समाजकल्याणाचा एक भाग म्हणून या कार्याकडे पाहावे असे सूचित केले

आहे. 'मागासलेल्या वर्गाच्या हितसंवर्धनासाठी काही कार्यक्रम हाती घ्यावा,' असेही म्हटले आहे. प्रस्तुत संदर्भात असा प्रश्न विचारला होता 'की, तुमच्या गावातील हरिजन वगैरे मागासलेल्या लोकांसाठी ग्रामपंचायत अगर जिल्हा परिषद यांच्याकडून काही काम झाले आहे काय ?'

या प्रश्नाला उत्तर देताना मात्र नि:संदिग्धपणे बहुतेकांनी काही कार्य न झाल्याची कबुली दिली आहे. 'विहिरीला मंजुरी, हरिजनवाड्याजवळ बोअरपंप बसविला, पत्रे, चाभारांना थोडेसे आर्थिक साहाय्य दिले, वसतिगृह आहे, वडार-लमाणी कॉलनी आहे, एक-दोन ठिकाणी समाज-मंदिरे बांधली याखेरीज विशेष काही झाले नाही. जामखेड येथे आदिवासींची वस्ती आहे, पण तेथे त्यांच्यासाठी मात्र काही काम हाती घेतलेले नाही. हरिजनांची घरे तशीच जुनी, पडकी आहेत, त्यांना गावातील विहिरीचे पाणी मिळत नाही. नदीवरून लांबून आणावे लागते. पूर्वीचे बलुते बंद झाले आहे, त्यामुळे उपासमारीची पाळी काही वेळा येते, चांभाराना धंद्यासाठी कर्जाची आश्वासने मिळाली, पण त्यांना अद्याप कर्ज मिळाले नाही.' अशा तक्रारी ऐकू येतात. काहींच्या मते या 'कार्यासाठी पैसा मंजूर आला आहे. परंतु हरिजन आणि पंचायत यांच्यामधील मतभेदामुळे कार्य स्थगित आहे. सहभोजन आणि मंदिरप्रवेशाच्या कल्पना देखिल काहींच्या मनात आहेत, परंतु जुन्या संस्कारामुळे अद्याप या गोष्टी सर्वत्र प्रत्यक्षात मात्र उतरत नाहीत, आपल्याबद्दल केवळ सहानुभूतीच दाखवली जाते, प्रत्यक्ष भरीव काम काहीच केले जात नाही. अशी तक्रारही काही हरिजनबंधूतर्फे केली आहे. थोडक्यात या बाबतीत आवश्यक त्या प्रयत्नांना अद्याप चालना मिळाली नाही. पुरातन परंपरांखाली अद्याप जगणाऱ्या खेड्यातून अशा तऱ्हेची समाजकल्याण कामे सत्त्वर घडून येतील. आणि ती केवळ प्रतिनिधींच्या साहाय्याने घडून येतील, अशी अपेक्षा उराशी बाळगणे फ[illegible] होय.

## 'जैसे थे' च चालू आहे

जिल्हा परिषदांमुळे तुमच्या स्वत:च्या तुम[illegible] गावच्या अगर तालुक्याच्या जीवनात काही खास फ[illegible] झाल्याचे तुम्हास वाटते काय?' असा एक प्र[illegible] विचारला होता. इतर प्रश्नांच्या उत्तराप्रमाणेच [illegible] देखील मोठ्या प्रमाणावर विरोधाचा सूर दिसून ये[illegible] 'काही फरक नाही, संघर्ष वाढले, जातीयवाद, गटबा[illegible] यांचा सुळसुळाट झाला. पूर्वी व्यक्तिगत तंटे होते[illegible] आता अधिकारपदासाठी सुरू झाले, गोंधळ वाढ[illegible] हे काम माझे नाही म्हणण्याची प्रवृत्ती, उपास[illegible] वाढली, असंतोष आणि नाराजी वाढली, दादा[illegible] वाढली. इत्यादि उत्तरे गोळा झाली आहेत.

## बदलाची चाहूल

पण काही लोकांनी आशावाद व्यक्त केला आ[illegible] विकेंद्रीकरणामुळे निरनिराळ्या संस्थावर आ[illegible] जवळचे लोक निवडून गेले असल्यामुळे आज ना [illegible] आपल्या जीवनात फरक पडेल, अशी आशा व्य[illegible] करण्यात आली आहे. 'पूर्वी कोठल्याही कामाचा वेळे[illegible] खुलासा मिळत नसे. कोणत्याही प्रश्नावर मोकळेप[illegible] बोलतां येत नसे ते आता बोलता येऊ लागले. [illegible] गावात पोलिस आला तरी आपण घाबरून जात अ[illegible] आता आपण बेडरपणे आपली गाऱ्हाणे मांड[illegible] अध्यक्ष, उपाध्यक्ष अथवा अधिकारी यांच्या [illegible] जाण्याच मुळीच भीती वाटत नाही. सरकारी नोक[illegible] महत्त्व कमी झाले आहे,' अशी उत्तरेही काही लोक[illegible] दिली आहेत. अर्थात् काही बदल झाला नाही, '[illegible] थे आहे' असे जरी अनेकांना वाटत असले [illegible] जीवनात अप्रत्यक्षपणे घडणाऱ्या बदलांची जनते[illegible] चाहूल लागली असावी असे मानण्यास काही हर[illegible] दिसत नाही.

## ार्यकर्ते निर्माण झाले, पण परंपरा जुनीच

ग्रामपंचायत, तालुका पंचायत, जिल्हा परिषद या स्थांसाठी अनेक नवीन लोकांची आवश्यकता ाभाविकपणे निर्माण झाली. याखेरीज सत्तानिरपेक्ष ामीण नेतृत्वाचीही वाढ होणे आवश्यक होते. ढाऱ्यांचा दृष्टिकोनही बदलणे नव्या प्रयोगाच्या संदर्भात ावश्यक होते.

'जिल्हा परिषदांमुळे तुमच्या गावात अगर लुक्यात नवीन कार्यकर्ते तयार झाले आहेत य ? का पुढारीपणाची जुनीच वतनदारी, मिरासदारी ाच्यासारखी आताही चालू आहे ?' असे प्रश्न या या नेतृत्वाबद्दल विचारले होते. लोकांनी जी उत्तरे ेली आहेत. त्यावरून असे दिसून येते की, 'नवे त्व काही निर्माण झाले नाही, काही तुरळक प्रमाणात र्यकर्ते पुढे आले असले तरी परंपरा जुनीच आहे. माजिक अथवा राजकीय जाणिवेतून काही नवीन ी पुढे आली नाही. कामाची कळकळ नाही, जुन्या ांना हाव सुटली आहे, दोन-चार जागांवर आपले सोयरे जमा केले आहेत. बाहेरगावी राहून गावचे त्व अथवा प्रतिनिधित्व करतात, ज्याच्या हाती ा तोच कार्यकर्ता, यांना सामाजिक कार्यापेक्षा सत्तेचे ्वार्थाचे आकर्षण फार मोठे वाटते.' असे म्हटले े. त्याचबरोबर 'नवीन कार्यकर्त्यांचे पेव फुटले े.' असेही उपरोधपूर्ण उद्गार काहींनी काढले ेत. काही लोकांना योग्य मार्गदर्शनाचा या नेतृत्वात ाव आढळतो. काही नव्या पुढाऱ्यांचं म्हणणं असे 'आमची काम करण्याची इच्छा असूनही आम्हाला ी दिली जात नाही.'

या सर्व उत्तरावरून असा निष्कर्ष काढता येईल 'नव्या नेतृत्वाची काही फारशी निपज झाली नाही, ो जे काही नवीन लोक पुढे आले, त्यांनी काही ेत फारसा भरवसा निर्माण केला नाही. प्रश्न विचारतांना सत्तानिरपेक्ष नेतृत्व जाणून घेण्याची अपेक्षा होती, पण त्याबाबत काही समाधानकारक उत्तर नाही, परंतु ज्या पद्धतीने काही लोक या कारभाराकडे पाहतात, त्यावरून अशा नेतृत्वास अनुकूल परिस्थिती निर्माण होत चालली आहे, असा अंदाज बांधावयास काही प्रत्यवाय नाही.'

## अन्य निष्कर्ष

प्रश्नपत्रिकेत लहानमोठे असे जवळ जवळ वीस एक प्रश्न विचारले होते, या प्रश्नांना दिलेल्या उत्तरांतून विरोधाचा आणि निराशेचा सूर मात्र मोठ्या प्रमाणात आढळून येतो. अर्थात् हे बुद्धिपुरस्सर केले असेल, असे म्हणता येणार नाही. परंतु हा जो कडवट विरोध दिसतो, त्याची कारणे निश्चितपणे काय असतील हे सांगता आले नाही, तरी मुख्यत्वेकरून अज्ञान आणि अविश्वास ही दोन कारणे या विरोधामागे असावीत असे वाटते.

हे अज्ञान म्हणजे विकासकार्याविषयींचे, त्यांच्या परिणामाविषयींचे अज्ञान होय. आपले प्रतिनिधी काही काम करतात किंवा नाही, हे समजून घेण्याचा फारच थोड्या लोकांनी प्रयत्न केला असेल. 'जुने ते सोने' या भावनेने, आणि अंधश्रद्धेने वागणाऱ्या जनतेला नवीन प्रयोगाशी, अथवा जीवनाशी झटकन् समरस होता आले नाही तर त्यात त्यांना दोष देण्यात नाही काही अर्थ नाही.

अविश्वास हे या विरोधाचे कारण असावे असे वाटते. याचे कारण लोकांच्या - विशेषत: सुशिक्षित लोकांच्या मनामध्ये ग्रामीण पुढाऱ्याविषयी बसलेली अढी हे होय. हे सारे लोक अडाणी आहेत. कृतिशून्य आहेत, आपल्या गावचे प्रश्न यांना कसे सोडविता येणार, राज्यकारभार हे कसे करणार, अशा तऱ्हेच्या शंका व्यक्त करून मुळातच त्यांच्याविषयी अविश्वास व्यक्त केला जातो. परंतु प्रत्यक्ष कामकाजाचे

अवलोकन करीत असताना, काही लोकांनी प्रतिनिधींच्या कर्तृत्वाबद्दल ज्या शंका व्यक्त केल्या आहेत, त्या पूर्णांशाने सत्य आहेत अशी भावना निर्माण होत नाही. चर्चा कदाचित शिस्तबद्ध होत नसेल, थोडक्या शब्दांत आपले विचार त्यांना मांडता येत नसतील, परंतु याचा अर्थ असा नव्हे की, त्यांना आपले प्रश्न समजले नाहीत किंवा आपल्या गावाचा प्रश्न डावलला जात आहे याची जाणीव त्यांना नसते. विशेषत: आपल्या गावच्या रस्त्याच्या, शेतीच्या साधनांचा, इमारत बांधकामाचा जेव्हा जेव्हा उपस्थित झाला तेव्हा संबंधित सभासदांनी पूर्ण जागरूकता दाखविली होती.


आणखी एक विशेष आढळला. तो असा की, आपल्या गावचा प्रश्न मांडण्यासाठी प्रसंगी पक्षाचा विरोध देखील सहन करण्याची तयारी काहींनी दाखविली. ज्या सभेचे सभेचे कामकाज पाहण्याची आम्हाला संधी मिळाली ती एक आदर्श सभा होती, असे म्हणावयास काही हरकत नाही. कामाचा उरक तर कौतुकास्पद होता.

लोकांची मते पाहिली आणि प्रत्यक्ष कामकाज पाहिले म्हणजे दोन्हीमध्ये ही अशी तफावत आढळून येते. आणि म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, हा विरोध अनेक वेळा अज्ञानाच्या आणि अविश्वासाच्या पोटी जन्माला आलेला आहे.

याचा अर्थ जमा नव्हे की, एकंदर कार्य फारच समाधानकारक आहे. परंतु त्याबरोबरच हेही नाकारता येणार नाही की, पुढारी काहीच काम करीत नाहीत. पुढारी हे जीप उडविणारे, भत्ते उकळणारे, पार्ट्या झोडणारे, उद्घाटन करणारे अशी भावना जी जनतेत फैलावलेली आढळते. ती अशी उदाहरणे सर्रास घडतात म्हणून आहे असे नसून, काही प्रमाणात असे होत असेल आणि मनुष्यस्वभावाला अनुसरून त्याचे भांडवल करण्याचा प्रयत्न झाला असेल. असे असले तरी जी काही तुरळक उदाहरणे असतील, ती नाहीशी करण्याचा पुढाऱ्यांनी प्रयत्न केला पाहिजे. 'निवडणुकांमुळे गावात फाटाफूट झाली, दुफळी माजली आणि पुढारी आपले स्थान बळकट करण्याकरिता ही दुफळी वाढवितात,' असा ज त्यांच्यावर आरोप केला जातो, तो जर सत्य असेल तर त्याचे निर्मूलन करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत.

पंचायत राज्याचे यश हे शेवटी लोकांच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. लोकांनी या प्रयोगाकड डोळसपणे पाहावयास शिकले पाहिजे, आपले प्रश्न मांडले पाहिजेत आणि ते सोडवून घेतले पाहिजेत एका नागरिकाने म्हटल्याप्रमाणे, 'पंचायत राज्य सुरू झाल्यापासून लोक आपली गाऱ्हाणी निर्भिडपणे मांडतात, सरकारी नोकरांचे महत्त्व आता कमी झाले आहे,' अशा तऱ्हेची वृत्ती जनतेत सर्वत्र निर्माण हो हे पंचायत राज्याच्या वाढीस पोषकच आहे.

● ●



# वारल्यांमधला माणूस जागा करणाऱ्या "गोदाराणी" श्रीमती गोदुताई परुळेकर

- डॉ. गोविंद गारे

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात जेव्हा कोणी पाऊल टाकण्यास धजत नव्हते, तेव्हा ४२ वर्षापूर्वी १९४५ मध्ये श्रीमती गोदुताई परुळेकरांनी कम्युनिस्ट पक्षाच्या कामानिमित्ताने डहाणू-तलासरी भागात प्रवेश केला. तेथील वारली आदिवासींचे परस्वाधीन व गुलामीचे जिणे पाहून तेथेच काम करण्याचे त्यांनी ठरविले. तहानभूक विसरून, उन्हातान्हात खपून व वेळप्रसंगी वारल्यांच्या झोपडीतला गुळाचा चहा पिऊन त्यांनी वारल्यांचा विश्वास संपादन केला. वेठबिगारीमुळे शोषल्या गेलेल्या आदिवासींना सावकारी पाशातून मुक्त करण्यात त्यांनी यश मिळविले. वारली आदिवासींची अस्मिता जागृत करून अन्याय, अत्याचार, व सामाजिक-आर्थिक शोषणाविरूध्द प्रतिकार करण्यास त्यांना सज्ज करण्याचे गोदाताईंचे कार्य ऐतिहासिक मोलाचे आहे. आदिवासी समाजाच्या विकासासाठी व शोषणरहित नवसमाजनिर्मितीसाठी अविरत प्रयत्नशील असणाऱ्या ध्येयवादी कार्यकर्त्यांच्या दृष्टीने श्रीमती गोदुताईच्या जीवनकार्याचा आढावा घेणे उद्‌बोधक होईल.

## तरूण वयात कम्युनिस्ट तत्वज्ञानाचा प्रभाव व आंदोलनात उडी

श्रीमती गोदुताई या पुण्याच्या जुन्या पिढीतले एक नामांकित वकील श्री. एल. आर. गोखले यांच्या ज्येष्ठ कन्या. गोखल्यांची वकिली उत्तम चाले. त्यामुळे गोदुताई श्रीमंतीतच वाढल्या. त्यावेळचे पुण्यातील वातावरण श्रीमंताच्या मुलीने एखाद्या धनाढ्य व उच्चशिक्षित तरूणाशी विवाह करून थाटात संसार करायचा अशा विचाराचे होते. पण गोदुताईंनी चाकोरीबाहेरची वाट पत्करली. कम्युनिस्ट तत्वज्ञानाने त्यांना झपाटले व त्यांनी त्या आंदोलनात स्वत:ला झोकून दिले. परंतु चळवळीशी संबंध आल्यानंतर त्यांच्या पूर्वीच्या श्रीमंती जीवनातील सवयी कधीच आड आल्या नाहीत. आपले पती शामराव परुळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी वारल्यांच्या मुक्ततेचे महान कार्य केले. कम्युनिस्ट पक्ष संघटना समाजाच्या तळाच्या थरापर्यंत पोहोचविण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे कार्य येथेच थांबले नाही. कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या सदस्या, अखिल भारतीय किसान सभेच्या उपाध्यक्षा व महाराष्ट्र किसान सभेच्या अध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम केले आहे. महाराष्ट्र आदिवासी परिषदेच्या अध्यक्षा म्हणून तसेच प्रौढ शिक्षणाच्या क्षेत्रात त्यांनी सुरूवातीच्या काळात काम केले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी हिरीरीने पुढाकार घेतला.

## वारल्यांमध्ये कामास सुरवात

कम्युनिस्ट पक्षाचे कार्य करीत असतानाच कॉम्रेड शामराव परुळेकरांशी त्यांची ओळख झाली व त्या गोदावरी परुळेकर झाल्या. पतीपत्नी दोघेही कम्युनिस्ट व क्रियाशील कार्यकर्ते पण शामरावांचा वाचन, चिंतनावर भर अधिक तर गोदावरीबाईंना प्रत्यक्ष कार्याचे आकर्षण अधिक. कॉम्रेड शामराव व गोदुताईंनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये कार्य करायचे ठरविले. कॉ. शामरावांनी शेतकरी प्रश्नाचा सखोल अभ्यास केला होता. शेतकरी राजकियदृष्ट्या जागृत झाल्याशिवाय, शेतकऱ्यांनी लढाऊ संघटना उभारल्याशिवाय समाजवादी क्रांती अशक्य आहे ही त्यांची ठाम भूमिका होती. त्यामुळे त्यांनी दोघांनी ठाणे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये कामास सुरवात

करायचे ठरविले. १९४५ च्या जानेवारीत टिटवाळा येथे महाराष्ट्र प्रांतिक किसान सभेचे पहिले अधिवेशन भरवले. या अधिवेशनाचा प्रचार ठाणे जिल्ह्याच्या सर्व तालुक्यात करायचे ठरले. या प्रचारासाठी प्रामुख्याने आदिवासी वस्तीच्या तलासरी, डहाणू, या भागात त्या गेल्या. तेथील आदिवासींचे ते परस्वाधीन व गुलामीचे जिणे पाहून तेथेच काम करायचे त्यांनी ठरविले. १९४५ साली परुळेकर पतीपत्नी व त्यांचे सहकारी ठाणे जिल्ह्यातल्या वारली आदिवासींच्या भागात फिरले. वारल्यांना त्यांनी कम्युनिस्ट तत्वज्ञान सोप्या भाषेत शिकविले. भौतिकवाद, द्वंद्ववाद या गोष्टी त्यांना शिकविल्या. गवताचे भाव सावकार कसे ठरवितात व प्रत्यक्षात कसे ठरवायला हवेत हे समजावून सांगताना त्यांना वरकड मूल्य म्हणजे काय हे त्यांनी शिकविले. शेतकरी क्रांती ही लोकशाही क्रांतीची मेखला आहे, तेव्हा शेतकरी वर्गाची कामगार वर्गाशी एकजूट झाली की, क्रांती होईल हे त्यांना पटवून दिले.

## वारली आदिवासींचे गुलामीचे जिणे

त्या खेडेगावातून त्यावेळी जमिनदारांची खटली होती. खटले म्हणजे काय, तर वेठबिगारी काम करणारे स्त्रीपुरुष. त्यांनी सकाळी घंटेबरोबर जाऊन दुपारपर्यंत काम करायचे. दुपारी त्यांना एका माणसाला पुरेल एवढा भात देत. ते भात घेऊन लाकडाच्या उखळीत बिनवेढीच्या मुसळांनी कांडायचे आणि तांदुळ करायचे. ते शिजवून भात करुन, मिठाच्या काड्याबरोबर व पाण्याच्या घोटाबरोबर गिळून, ठरलेल्या वेळी सुट्टी संपली की, कामाला हजर व्हावयाचे. दिवस मावळताना संध्याकाळी सुट्टी होई. घासभर भाताशिवाय दुसरी मजुरी नाही. सणासुदीचा दिवस नाही की, सुट्टीचा दिवस नाही. दुखणेबाणे नाही. मुक्या जनावराप्रमाणे, रोज सकाळ झाली की कामाला जुंपून घ्यायचे. गोळाभार भात पोटात घालून, कंबर मोडेपर्यंत काम करायचे. जीवनात आनंद नाही, वैविध्य नाही, रस नाही, स्वातंत्र्य नाही. आपल्या खेड्याबाहेर, मालकाबाहेर कशाची दखल नाही. असे जिणे दिवसामागून दिवस, वर्षामागून वर्षे आदिवासी जगत होते. एखाद्या बकऱ्याची मान कापावी तरी तो प्रतिकार करत नाही, त्याप्रमाणे जणू साऱ्या भावना मारत आदिवासी जीवन जगत होते. उपाशी ठेवले, बायको पळवली, तरी मुकाट्याने सहन करुन येईल त्या प्रसंगाला मान तुकवित होते. अशा परिस्थितीत गोदुताई व त्यांचे सहकारी तेथे गेले आणि त्यांच्यामध्ये, वर राख असली तरी आंत धगधगणाऱ्या असमाधानाच्या, चिडीच्या ठिणगीचा स्फोट झाला. त्याला योग्य वळण लावण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी केले. आधार मिळाल्यामुळे आदिवासींची माणुसकी जागी झाली. माणूस म्हणून जगण्याचा आपल्याला हक्क आहे, हे उमजून सज्ज झाले.

## अपार कष्ट व हालअपेष्टा सहन केल्या

अवघ्या एका दशकाच्या आंत वारल्यांची वेठबिगारी त्यांनी नष्ट करुन टाकली. सावकारी नष्ट झाली असा

### वर्गणीदारांना सूचना

*आपण हाकारासाठी मनिऑर्डरने वर्गणी पाठवता. आम्हाला असे आढळून आले आहे की कधीकधी मनिऑर्डरच्या मागे पाठविणाऱ्याचा नाव व पत्ता अजिबातच लिहिलेला नसतो. अशा वेळेस वर्गणी कोणाची आली हे समजू शकत नाही व त्यामुळे पावती पाठवणे शक्य नसते.*

*सर्व वर्गणीदारांना विनंती की मनिऑर्डरने पैसे पाठवताना मनिऑर्डर फॉर्मच्या मागे आपले नाव व पत्ता पूर्ण लिहिला आहे याची खात्री करून घ्यावी. आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.*

***–संपादक***

त्यांचाही दावा नव्हता, पण सावकारशाही उरली नाही, ही वस्तुस्थिती आहे; हे संक्रमण सुखासुखी घडले नाही. कोणतीही ''शाही'' सहजगत्या जात नसते. गोदावरीबाईंना त्यासाठी अपार कष्ट करावे लागले. हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. ज्या वारली आदिवासीमध्ये त्यांनी काम केले व अस्मितेच्या स्फुल्लिंग जागविला ते काम किती अवघड होते याची कल्पाना येण्यास दोन तीन उदाहरणेच पुरेशी आहेत. पण त्यावर मात करुन त्यांनी वारल्यांच्या मुक्तेचा लढा यशस्वी केला. ठाणे जिल्ह्यातील उंबरगांव, डहाणू, पालघर, व जव्हार हा वारली बहुसंख्येने असलेला भाग. या वारल्यांचे जीवन केवळ जनावराप्रमाणे होते. दुसरी उपमा त्याला देता येणार नाही. वर्षानुवर्षे सावकारी पाशात, वेठबिगारीत पिळून निघालेल्या या माणसातील ''माणूस'' केव्हाच मुर्दाड होऊन जाईल. असे हे वारली. त्यांच्या कामात येणारे पांढरपेशा वर्गाचे दोनच लोक. सावकार किंवा त्यांचा ठेकेदार आणि सरकारी अधिकारी, जे बहुधा जप्तीसाठीच यायचे. साहजिकच वारल्यांच्या मनात या माणसाबद्दल भीती व अन्य बाह्य जगातील माणसाबद्दल पुरेपूर साशंकता. या माणसांना हे वारली ''बाबऱ्या' म्हणत. या बाबऱ्यांची दहशत एवढी की, वारली बायका लहान मुलांना धाक दाखविण्यासाठी व झोपविण्यासाठी ''बाबऱ्या आला'' ची भिती घालत. एवढेच नव्हे तर बाबऱ्या आलाच तर मोठ्या माणसासकट सगळे झोपड्यांत भीतीने लपत. इतकी पराकोटीची प्रतिकूल परिस्थिती. पण अत्यंत जिद्दीने वारल्यांमध्ये त्यांच्या सारखेच राहून, जेवून, आपणही त्यांच्यातील एक आहोत, असा विश्वास गोदुताईंनी त्यांच्यात निर्माण केला. वारली त्यांना प्रेमादराने ''गोदाराणी'' का म्हणतात, याचे रहस्य यात आहे.

श्रीमती गोदुताई या सधन घराण्यातील असल्यामुळे साहजिकच त्यांच्या सवयीही उच्च प्रतीच्या होत्या. त्यातलीच एक म्हणजे उत्कृष्ट प्रतीच्या चहाची सवय. चहाची तल्लफ आली की, त्यांना सुचत नसे. या संदर्भातील त्यांचा अनुभव लक्षात घेण्यासारखा आहे. उंबरगांव तालुक्यात आदिवासी परिषदेसाठी त्यांनी प्रचारयात्रा म्हणजे पायी भटकंती सुरू केली होती. डोंगरी हे असेच कड्याकपारीतले गांव. तेथे त्या गेल्या. चालूनचालून थकलेल्या अवस्थेत त्यांना चहाची तल्लफ अनावर झाली. पण एवढ्या जंगलात चहा मिळणार कोठे ? चहा तर कोणाकडेच नाही. साखरेचे तर दर्शन नाहीच. वारल्यांना त्याची गरज नव्हतीच. बाईंना चहा पाहिजे म्हटल्यावर वारल्यांची खटपट सुरु झाली. अखेर काही काळाने चहाचे वास असलेले पाणी त्यांनी तयार केले. याबाबत त्या लिहितात - 'मी विचार करीत होते की, लिफ्टन किंवा ऑरेंज पेकोचा ताज्या दुधाचा चहादाणीत चहाची पत्ती टाकून त्यावर उकळलेले पाणी ओतून तयार केलेला चहा साऱ्या आयुष्यभर पिण्याची सवय असलेल्या मला तो (वारल्यांनी केलेला) चहा कसा बरा वाटावा'. उत्तर सोपे आहे. कोणाही ध्येयप्रवण व्यक्तीला ध्येयाचा मार्ग आक्रमित असताना येणाऱ्या अडचणी, सोसावे लागणारे हाल व कष्ट यांची तमा नसते. ते सारे करत असताना मनाला एकप्रकारचे मोठेच समाधान वाटत असते.'

गोदुताई वारल्यांच्या जीवनाशी किती समरस झाल्या याचे वरील उदाहरण ही एक झलक आहे. वारली आदिवासी गोदुताई व त्यांच्या सहकाऱ्यांसाठी वेगळे जेवण करण्याचा खटाटोप करीत. परंतु गोदुताईंनी त्यांना यापासून रोखले आणि आपण तुमच्यातच राहणार, जेवणार असे सांगितले. व तसेच त्या वागल्याही. शेवाळातील पाण्याने आंघोळ करून नाचणीच्या किंवा वरीच्या पिठाची आंबील खाऊन एवढेच नव्हे तर आंबील न मिळाल्यास वारल्याप्रमाणे आंबाडी, चिंचेचा पाला, कच्चे आंबे खाऊनही त्यांनी दिवस काढले. स्वातंत्र्यपूर्व काळात या भागात

प्रवासासाठी वाहने नव्हतीच. त्यामुळे बहुतेक प्रवास पायीच करावा लागे व तोही जंगलातून. भारत स्वतंत्र झाल्यानंतर वारल्यांसारख्या अत्यंत मागास जमातीत जागृती निर्माण करणाऱ्यांना उत्तेजन मिळायला हवे होते. पण सरकारची पावले वारल्यांच्या विरोधातच पडू लागली. त्यांची धरपकड होऊ लागली. क्षुल्लक व अनेकदा खोट्या आरोपावरून पोलीस त्यांच्यावर खटले भरू लागले. गोदावरीबाईंना डहाणू भागात कार्यालयासाठी एखादी छोटीशी जागा हवी होती. पण जागा द्यायला कोणी तयार होईना. एका बाजूला सावकाराचे व दुसऱ्या बाजूला सरकारचे दडपण. एक जागा कशीबशी मिळाली, ती गोठ्यात. दुसरी एक मिळाली ती कशी होती. त्या लिहितात, 'एका रात्रीत ढेकणांनी माझे शरीर सोलून काढले.'

याही परिस्थितीत त्यांनी आपले उद्दिष्ट्य तडीस नेले. त्यांच्या प्रेरणेने वारल्यांना जणू नवा जन्म मिळाला. सावकारी पाश, त्यांनी तडातड तोडून टाकले. काठी, चाबूक, यांचा वारल्यांच्या पाठीवर वापर करणाऱ्या सावकार, जमीनदारांना वारल्यांची दहशत बसली. गवत कापण्याच्या, जंगलातील लाकडे तोडण्याच्या मजुरीबाबत मालक लोकांशी करार करण्याची हिंमत वारल्यांच्या ठायी आली. बहिष्कारांच्या शस्त्राचे सामर्थ्य त्यांना कळून आले. तेही प्रवास करू लागले. सभेत भाषणे करू लागले. मुलांना शाळेत पाठवू लागले. वारल्यांमध्ये झालेला मुख्य फरक म्हणजे त्यांची अस्मिता जागी झाली आहे, त्याचे प्रतिबिंब त्यांच्या वर्तनात दिसे. त्यांच्यातील भेदरटपणा, न्यूनगंड नष्ट झाला आहे, महत्वाकांक्षा वाढली आहे. मी काही करू शकतो, मला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे, असा विश्वास झाला आहे. माझी लूट होत आहे, हे शल्य बोचू लागले. स्वत:ची परिस्थिती सुधारली पाहिजे असे त्याला वाटू लागले आहे. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी त्याची आहे. धड शब्दही बोलायला भिणारा आदिवासी आज व्यासपीठावर उभा राहून राजकीय व्याख्याने देऊ लागला आहे. 'ही परिस्थिती आशादायक आहे. अन्यायाला ठोकर देण्याला तयार झालेला हा वारली पुढची पावले उचलल्याशिवाय राहणार नाही,' असा आशावाद गोदुताईंनी व्यक्त केला आहे.

### लढा शब्दबध्द

श्रीमती गोदुताईंनी केवळ चळवळ केली नाही. ''जेव्हा माणूस जागा होतो'' या पुस्तकात त्यांनी वारल्यांच्या मुक्ततेचा लढा शब्दबध्द केला आहे. त्यांचे हे जिवंत अनुभव तितक्याच प्रखरपणे या पुस्तकात व्यक्त न झाले तरच नवल. आणि म्हणून या पुस्तकाला १९७२ मध्ये मराठी भाषेतील सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. तसेच महाराष्ट्र शासनाचेही पारितोषिक मिळाले.

### वास्तवतेचे भान

श्रीमती गोदुताईंनी चळवळीत वास्तवतेचे भान नेहमी राखले. त्यांनी दिलेल्य लढ्यात कोठेही स्वप्नाळूपणाचा भाग नाही. क्रांतीचे केवळ स्वप्न डोळ्यापुढे न ठेवता ते ध्येय ठरविले व वास्तव मार्गाचा अवलंब करून त्यांनी त्या दिशेने वाटचाल केली. साधारण कम्युनिस्ट म्हटले की, तो फक्त कामगार वर्गाची व शोषितांची बाजू घेणार असे म्हटले जाते. परंतु आपल्या चळवळीला अन्य वर्गामधूनही पाठिंबा आवश्यक असतो याची जाणीव त्यांना होती. वारल्यांचा लढा संपल्यानंतरच्या सभेमध्ये (१९५३) बोलताना त्यांनी जो विचार मांडले, त्यावरून त्यांनी चळवळीचा किती वास्तव व व्यवहार्य पायावर विचार केला ते दिसून येईल. त्या म्हणाल्या - ''आता साऱ्यांनीच 'वाहिली ती गंगा व राहिले ते तीर्थ' असे

समजून शोषितांना व दरिद्री वर्गाची, गरीब शेतकऱ्यांची व शेतमजूरांची एकजूट बांधून, मध्यम वर्गाशी त्यांची एकजूट साधून कामगार वर्गाच्या नेतृत्वखाली दारिद्र्याचे निर्मूलन व शोषितांचे सत्तारोहण करण्याचे महान कार्य शिल्लक राहिले आहे. ते पार पाडले पाहिजे. ते पार पडलेले पाहण्याचे सद्‌भाग्य मला लाभेल. असे आज तरी वाटत नाही. शोषित वर्ग व इतिहास आपले कर्तव्य पार पाडल्याशिवाय राहणार नाही. चळवळीचा ओघ पुढे जात राहील. गंगा कधी उलटी वाहत नाही.''

### महान कार्य

पराकोटीच्या प्रतिकूल परिस्थितीत जिद्दीने अनेक संघर्षांना तोंड देत गोदुताईंनी वारल्यांमधील ''माणूस जागा केला'' एवढी ही जिद्दीची स्त्री अत्यंत प्रेमळ व मनमिळाऊ आहे. माणसाला जागे करण्यापूर्वी त्याचे मन, विश्वास जिंकावा लागतो. त्यांनी तो आटोकाट प्रयत्नाने, कष्टाने मिळविला. त्यामुळेच त्यांचा अमृतमहोत्सव (पंचाहत्तरी) महाराष्ट्रात ठिकठिकाणी साजरी करण्यात आला. तो कोणत्या पक्षातर्फे, संघटनेतर्फे नव्हता. सामान्य नागरिकांनी उत्स्फुर्तपणे एकत्र येऊन त्यांच्यावर असलेला विश्वास, प्रेम या गौरवातून व्यक्त केले. मागासलेल्या व गरीब माणसांची सेवा करणे निराळे ते विधायक कार्य म्हणून गणले जाईल. पण दारिद्र्य, अज्ञान व वेठबिगारीने गांजलेल्या वारल्यांमध्ये स्वत्वाची अस्मिता जागवण्याचे, आपणही माणूस आहोत, आपणही आपल्या हक्कांसाठी सावकार, सरकार यांच्यापुढे पुढे उभे राहू शकतो, प्रतिकारही करू शकतो, हा आत्मविश्वास वारल्यांच्या मनात निर्माण करण्याचे श्रीमती गोदुताईंचे कार्य केवळ महानच ठरू शकेल. महाराष्ट्र शासनाने अलिकडेच ''आदिवासी सेवक'' पुरस्कार देऊन त्यांच्या ऐतिहासिक मोलाच्या कार्याचा उचित गौरव केला होता.

अशा या महान गोदाराणीला विनम्र प्रणाम.

• • •

## इमान

सखे, मी त्याहीवेळी भारावून गेले होते,
जेव्हा तू मला साथ द्यायचं कबूल केलं होतंस
माझ्या भावनेला, माझ्या शब्दाला तू जपलेस
मी किती सुखावलो होतो
भ्रष्टाचार, स्वार्थाने बरबटलेल्या ह्या देशात
आपले अस्तित्व टिकवताना, तूच म्हणाली होतीस
आपण तत्वानं जगणारी माणसं आहोत
आता तुझं बाळ कुपोषणाने मरताना पाहून
तू तत्त्व झुगारायचे म्हणतेस ?
अगं आपण मरणाच्याच राज्यात नांदतोय
हे मी तुला नव्याने सांगू का ?
तसे नसते तर
ह्या इथे एवढे कांड घडले असते ?
सखे आपण तत्व झुगारूच शकत नाही
हा (घोटाळ्यांचा) आमचा देश
आमच्या सारख्यांच्याच इमानावर उभा आहे
आम्हाला इमान सोडताच येणार नाही
ह्या देशाला बुडताना आम्हासच वाचवायचे आहे
फक्त तुझी खंबीर साथ दे
मी खचू नये म्हणून

सौ. कुसूम अलाम

# मानवशास्त्र : एक आढावा

**- प्रा. वि. श्री. कुलकर्णी**

## एकविसाव्या शतकातील मानववंशशास्त्र

मानवाचा सर्वांगीण अभ्यास करणाऱ्या मानववंशशास्त्राविषयी (अगर मानवशास्त्राविषयी) फार प्राचीन काळापासून लोकांना कुतूहल आहे. हॅनो (खि. पूर्व १०००) या कार्थेजियन नाविकाने आफ्रिकेच्या किनाऱ्यालगत वावरणाऱ्या काही रानटी जमातीची वर्णने दिली आहेत. त्याने त्यांना 'गोरिला' या नावाने संबोधले आहे. हिरोडोटस् (खि. पूर्व ४८४ - ४२५) या ग्रीक शास्त्रज्ञाने मानवजातीसंबंधी काही ऐतिहासिक वर्णने दिली आहेत. स्वत:च्या देशाच्या चालीरीती व लोबियन, इजिप्शियन, पर्शियन, इथियोपियन लोकांच्या चालीरीती यामधील फरक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. इजिप्शियन लोकांच्या कवट्यांच्या जाड हाडांची तुलना त्याने पर्शियनांच्या कवट्यांच्या पातळ हाडाशी केली व त्यासाठी मुखत्वे वातावरणाचा परिणाम व लोकांच्या चालीरीती याचा घनिष्ठ संबंध असावा असे निदर्शनास आणून दिले. हिप्पोक्रेटस् (खि. पूर्व ४६० - ३७७) या वैद्यकीय पेशातील व्यक्तीनेही याच धर्तीवर संशोधन केले आहे. ॲरिस्टॉटल (खि. पूर्व ३८४ - ३२२) या तत्त्ववेत्त्यानेही आपल्या अनेक ग्रंथात मानव जातीविषयी, त्याच्या शारीरिक, सांस्कृतिक विषयासंबंधी अनेक वर्णने दिली आहेत. त्यानंतरच्या काळातही गॅल्डन (१३१ - २००) या डॉक्टरने तसेच आंद्रिसस व्हेसालियस (१५१४ - ६४) या डॉक्टरने मानवी शरीराविषयीचे अभ्यासपूर्ण निष्कर्ष मांडले आहेत. वांशिक (अस्थि) कवटीशास्त्र (Racial Craniology) या संकल्पनेचा व्हेसालियस हा प्रणेता समजला जातो. प्राचीन काळी चीनमध्येही तत्कालीन लोकांच्या चालीरीतींचा विचार करणारे विचारवंत होते. कन्फ्यूशियसने (खि. पूर्व ५११) तत्कालीन लोकांच्या चालीरीतींचा तुलनात्मक अभ्यास करुन आदर्श समाजाचे चित्र रंगवले आहे.

औद्योगिक क्रांतीमुळे दळणवळण सुलभ झाले. पाश्चिमात्य राष्ट्रांनी जगभर वसाहती स्थापन केल्या, त्यावेळेपासून मानवशास्त्राला शास्त्रीय स्वरुप प्राप्त होऊ लागले. मानवासंबंधी सम्यक व तुलनात्मक दृष्टिकोन हा मानवशास्त्राचा प्रमुख हेतु असल्याने, सुरुवातीला त्याला काही अंशी ज्ञानाचे स्वरुप प्राप्त झाले. मानवशास्त्राचे अभ्यासविषय हे काही प्रमाणात जैविक शास्त्रात तर काही प्रमाणात समाजशास्त्राशी मिळतेजुळते आहेत. थोडक्यात एका व्यापक दृष्टीने पहाता मानवासंबंधी सर्वांगीण अभ्यासाची दृष्टी मानवशास्त्राने ठेवली आहे.

मानवशास्त्राच्या या व्यापक स्वरुपामुळे त्याचे प्रमुख दोन भाग पडतात. एक म्हणजे शरीर किंवा शारीरिक मानवशास्त्र व दुसरा म्हणजे (सामाजिक व) सांस्कृतिक मानवशास्त्र. शारीरिक मानवशास्त्राच्या अभ्यासामध्ये एक जैविक प्राणी या दृष्टीने मानवाचा अभ्यास केला जातो. मानवाचा उगम व त्याचे इतरांशी असलेले संबंध, प्राचीन मानव व आधुनिक मानवाचा विकास, वांशिक व इतर स्वरुपाचे असलेले भेद इत्यादींचा या भागात विचार होतो. हे मानवशास्त्रज्ञ मानवाची शारीरिक वैशिष्ट्ये व मानवाचा सांस्कृतिक व सामाजिक संबंध यावर जास्त लक्ष पुरवितात. थोडक्यात असे म्हणता येईल की शारीरिक मानवशास्त्र हे मानवाची उत्क्रांती व मानवातील फेरबदल, मानवाची जैविक वैशिष्ट्ये, तसेच त्यांची अनुवांशिक वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करते. हा अभ्यास स्वतंत्रपणे व तुलनात्मक अशा दोन्ही पातळीवर केला जातो.

सांस्कृतिक मानवशास्त्र ही दुसरी शाखा मानवी चालीरीती व सांस्कृतिक वर्तन याबद्दल सर्वसाधारण माहिती करुन देते. संस्कृती, समाज व व्यक्तिमत्व याबद्दलचे शास्त्रीय सिद्धांत व त्यांचा विकास कसा झाला याबद्दलची सार्वत्रिक स्वरुपाची माहिती गोळा केली जाते. संस्कृती, समाज व व्यक्तिमत्व या संदर्भात घडणाऱ्या मानवाच्या वर्तनाचा अभ्यास या शाखेत होतो. हा अभ्यास तुलनात्मक केला जातो व त्यातून मानवशास्त्रज्ञ काही निष्कर्ष काढू शकतो.

संस्कृतीचे मानवशास्त्रीय विश्लेषण हे मूलत: सखोल निरीक्षणावर आधारलेले असते. प्रत्यक्ष लोकांच्या चालीरीतींचा अभ्यास केल्यावरच मानवशास्त्रज्ञ त्याच्या एकूण वर्तनाबद्दल निवेदन करु शकतो. हा मानवशास्त्रज्ञ स्वत:च्या आवडीनुसार (वा अभ्यासाच्या गरजेनुसार) समस्येनुसार अभ्यासासाठी जागा व समाज निवडतो. एखादी लहानशी जागा व लोक तो निवडतो. त्यामुळे त्यास निश्चित स्वरुपाचे निरीक्षण करता येते. वर्ष - दोन वर्ष त्या लोकांमध्ये तो जाऊन राहतो. त्यांच्या दैनंदिन जीवनाशी तो समरस होतो. त्यांची भाषा शक्य असेल तितकी तो शिकतो. त्यांच्या निरनिराळ्या सवयी, त्यांचा रोजचा जीवनक्रम, त्यांचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या चालीरीती, त्यांचे परस्परातील संबंध, त्यांचा धर्म व धार्मिक कल्पना, त्यांचे उत्सव, सण, समारंभ, त्यांचे विशिष्ठ संस्कारविधी यात भाग घेऊन, त्यांच्या गप्पागोष्टी ऐकून, त्यांना प्रश्न विचारुन, त्यांचे प्रत्यक्ष होणारे वर्तन तो बारकाईने तपासतो. हळूहळू त्याची टिपणे चांगल्या प्रकारे तयार होतात. वैयक्तिक पूर्वग्रह बाजूला सारुन तो तुलनात्मक पद्धतीने निष्कर्ष काढतो.

शारीरिक मानवशास्त्रीय विश्लेषण हे मुख्यत: विशिष्ठ प्रकारच्या तंत्रांचा व उपकरणांचा उपयोग करुन निष्कर्ष काढण्यावर आधारलेले असते. यामध्ये 'मानवमिती' व 'प्रयोगशाळेतील' अनेक चाचण्यांचा समावेश होतो. जसे रक्तगट चाचणी, रक्ताचे विश्लेषण उपकरणांच्या सहाय्याने करुन त्यावर आधारित हानीकरक घटकांचा अभ्यास (उदा. सिकल सेल, थॅलासेमिया इत्यादी) याशिवाय वातावरणाचा परिणाम मोजणाऱ्या काही उपकरणांचा उपयोग इत्यादी. या चाचण्यांच्या विश्लेषणासाठी सामाजिक व सांस्कृतिक माहितीचा आधार घेऊन एकूण समस्यांबाबत निवेदन करता येते. इतर अभ्यासपद्धती वर वर्णन केल्याप्रमाणेच असते. उदा. स्थलकालाची निश्चिती, टिपणे घेण्याच्या पद्धती, पूर्वग्रह बाजूला ठेवण्याचे बंधन, निरीक्षण पद्धती, मुलाखत पद्धती वगैरे.

शारीरिक व सांस्कृतिक मानवशास्त्रामध्ये अशा प्रकारे अनेक सामाजिक अभ्यासपद्धतींचा अंतर्भाव असल्याने खालील विवेचनात अशा गोष्टींचा उल्लेख केला आहे. एकाणिसाव्या तसेंच विसाव्या शतकातील या दोन्ही शाखांची प्रगती व उपयुक्तता पाहाता एकात्मिक पद्धतीचा यथायोग्य वापर हा श्रेयस्कर ठरेल असे दिसते. परंतु त्याचबरोबर शारीरिक मानवशास्त्रातील काही तांत्रिक प्रगतीही नजरेआड करुन चालणार नाही. त्यामुळे मर्यादा व व्याप्ती यावर काही प्रमाणात आडकाठी येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

या अगोदरच म्हटल्याप्रमाणे मानवाचा सर्वांगीण अभ्यास म्हणजे मानवशास्त्राचा अभ्यास होय. मूलभूत प्रश्न असा की मानवाचा म्हणजे नक्की कोणी कोणाचा अभ्यास करायचा? मानवाने मानवाचाच केलेला अभ्यास असे याचे स्वरुप आहे. पाश्चिमात्य अर्थातच याप्रकारच्या अभ्यासात प्रथमपासून आघाडीवर होते. त्यांनी, विशेषत: गोऱ्यांनी बिगर गोऱ्यांचा (गौरेतरांचा), अत्यंत प्राचीन व मागासलेल्या समाजाचा विशेषत: सर्वदूर किंवा अतिदुर्गम भागामध्ये राहाणाऱ्या समाजाचा अभ्यास करण्यावर भर दिला. आपल्या सारखेच काहीसे दिसणारे मानवप्राणी आपल्यापेक्षा वेगळे कसे? सुरुवातीला या उत्सुकतेपोटी व नंतर काही विशिष्ट हेतूने पाश्चिमात्यांनी अभ्यास सुरु केला.

त्यासाठी विशिष्ट स्वरुपाची अभ्यासपद्धती अवलंबिली. सामाजिक – सांस्कृतिक प्रक्रिया व उत्क्रांती समजावून घेण्यासाठी या विशेष अभ्यासपद्धतीचा उपयोग केला. ज्यावेळी लिखित स्वरुपात इतिहासासंबंधी काहीच माहिती नव्हती, त्यावेळी परकीय भाषा आत्मसात करुन, त्या समाजात राहून विशिष्टप्रकारे निरीक्षण पद्धतीचा व त्यानंतर टप्प्याटप्प्याने मुलाखतीच्या पद्धतीचा वापर केला. हळूहळू अशा प्रकारे शास्त्रोक्त अभ्यास पद्धत आकाराला येऊ लागली व ती म्हणजे (एथनोग्राफिक मेथड) पद्धतीचा यथायोग्य वापरामुळे काही सिद्धांताचा (Theory) उगम झाला. यामध्ये स्ट्रक्चरॅलिझम – फंक्शनॅलिझम (Structuralism - Functionalism) या जैविक घटनांवर आधारित नमुन्याच्या सिद्धांताचा समावेश करावा लागेल. याचा उपयोग करुन संस्कृतीच्या संकल्पनांचा, नातेगोते संबंधाचा, धर्माचा व त्या अनुषंगाने येणाऱ्या समाजाच्या इतरही अंगाचा सर्वसमावेशक (Holistic) अभ्यास करण्यावर भर दिला गेला. परंतु घट्ट रुतलेल्या सामाजिक मूल्यांचा, नीतिमत्ता समजावून घेण्याच्या प्रश्नांचा अभ्यास मात्र या पद्धतीद्वारे सहजासहजी होत नाही. त्यासाठी अनेक काळ अभ्यासरत राहणे हाच मार्ग. या एथनोग्राफिक पद्धतीमध्ये आदिम समाजाचा उपयोग 'संकल्पनेची प्रतिकृती' म्हणून व खेड्यांचा उपयोग 'अलगीकरणाची प्रतिकृती' म्हणून केला जातो. (Conceptual model - संकल्पनेची प्रतिकृती, Isolate model – अलगीकरणाची प्रतिकृती) ही अभ्यासपद्धती आजही थोडेफार फरक करुन अनेक गोष्टी समजावून घेण्यासाठी उपयुक्त आहे. मात्र लोकसंख्या वाढीचा व त्या अनुषंगाने येणाऱ्या खेड्यांच्या आकारमानाचा व अलगीकरणाचा तसेच दळणवळण, सोयी सवलती इत्यादी अपरिहार्य ठरणाऱ्या गोष्टींमुळे एकविसाव्या शतकात या अभ्यासपद्धती मध्ये मोठ्या प्रमाणावर बदल होणे अपेक्षित आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी भारतावर पूर्ण क्षमतेने राज्य करता यावे म्हणून प्रशासकीय अधिकाऱ्यांना मानववंश शास्त्राचे शिक्षण अनिवार्य केले होते. तसेच याच काळात भारतातील अनेक जाती-जमातींचा अभ्यासही मानवशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करुन केला गेला. परंतु त्यांचा उद्देश केवळ शासकीय कारभार (त्यांच्या दृष्टीने) उत्तम प्रकारे करणे इतपतच मर्यादित होता. त्यात समाजोपयोगी योजनांचा अभावाने समावेश केला होता.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र समाजविकास,

## *लेखकांना आवाहन*

आपण आदिवासी भागात रहात आहात / कार्य करत आहात? आपल्याला आदिवासींबद्दल साहित्य- कविता,. कथा, नाटक वगैरे लिहिण्याची आवड आहे? आपल्याला आदिवासींची संस्कृती, सणवार, उत्सव, चालीरिती याबद्दलची माहिती इतरांना सांगावीशी वाटते? आपल्याला आदिवासींच्या शिक्षण, नोकरी, व्यवसाय, आरोग्य, विकास या संदर्भात समस्या मांडाव्याशा वाटतात? आपण आदिवासींमध्ये केलेले संशोधन इतरांपर्यंत पोहोचवण्याच्या विचारात आहात?

तर मग आजच आपले साहित्य कोऱ्या कागदावर एका बाजूला लिहून 'हाकारा' कडे पाठवा. आपल्या साहित्याला जरूर प्रसिद्धी दिली जाईल.

**● पत्रव्यवहाराचा पत्ता ●**

संपादक, हाकारा

६४, आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७ (महाराष्ट्र)

ग्रामीण विकास, आदिवासी विकास अशा अनेक क्षेत्रांचा समावेश विकास कार्यक्रमांतर्गत केला. यावेळी थोड्याफार प्रमाणात मानववंश शास्त्रज्ञांचे साहाय्य घेण्यात आले. परंतु त्यावर अनेक मर्यादा होत्या. शिवाय सामाजिक सांस्कृतिक मानवशास्त्राचा विकास जास्त झपाट्याने होऊ लागला. वैद्यकीय क्षेत्रामध्ये शारीरिक मानवशास्त्राचा विकास प्रभावीपणे होऊ शकला नाही. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात मानववंशशास्त्रास स्वतंत्र शैक्षणिक दर्जा प्राप्त झाला व आज भारतातील जवळ जवळ २५ पेक्षा अधिक विद्यापीठात व त्यांच्याशी संलग्न असलेल्या अनेक महाविद्यालयात या विषयाला बऱ्यापैकी प्रोत्साहन मिळत आहे.

भारतामध्ये मानवंश शास्त्राचा उगम व विकास मुख्यत्वे विसाव्या शतकाच्या मध्यावर झाला. महाराष्ट्रामध्ये समाजशास्त्र विषयामध्येच मानवंशशास्त्राचा अंतर्भाव केला होता. परंतु १२ ऑगस्ट १९७७ साली या शास्त्रास स्वतंत्र दर्जा मिळाला व त्याची गणना मानव्यशाखेमध्ये व सामाजिक शास्त्रामध्ये करण्यात आली. याच शतकात शिक्षणक्षेत्रामध्ये काहीशी संख्यात्मक व काहीशी गुणात्मक प्रगती होऊ लागली. यामध्ये शास्त्र शाखा, तंत्रज्ञान व विज्ञान, संगणक प्रणाली इत्यादी विषयात लक्षणीय प्रगती साधली गेली. याचा परिणाम कोणत्याही एकाच विषयावर न होता इतरही विद्याशाखांवर झाला. सुरुवातीला पारंपारिक पध्दीचा वापर करणाऱ्या मानवशास्त्रावरही याचा लक्षणीय परिणाम दिसते आहे. अभ्यासपद्धतीमध्ये कालानुरुप बदल होत आहेत. अपारंपारिक पद्धतीचा वापर, सुधारित संशोधन पद्धती, औद्योगिकरण, शहरीकरण, शिक्षणाचा जोरदार प्रसार तसेच प्रदूषणासारख्या विषयांचा गांभीर्याने करावा लागणारा विचार इत्यादीमुळे मानवी आयुष्य सर्वच पातळीवर - शहरी, ग्रामीण व आदिवासी - ढवळून निघत आहे. त्यामुळे एकात्मिक पद्धतीने आदिवासी समाजाचा अभ्यास, वंशाचा अभ्यास इतपतच मानववंशशास्त्राचा पसारा न राहता, समस्यांशी निगडित असणाऱ्या प्रश्नांचा विचार करणे इष्ट ठरत आहे. मात्र यासाठी सर्वच आघाड्यांवर व त्या अनुषंगाने असणाऱ्या विकासित होत असलेल्या पद्धतीचा विचार व वापर मानववंशशास्त्रातही करणे क्रमप्राप्त आहे. एकविसाव्या शतकातील प्रश्नांना तोंड देण्यासाठी येथेही परंतु सतत प्रयत्न होत आहेत. महाराष्ट्रामध्ये एकमेव ठिकाणी - पुणे विद्यापीठात असणाऱ्या मानववंशास्त्राचा विकास अनेक कारणांमुळे वैयक्तिक, विभागीय, राजकीय - दुर्लक्षित राहिला आहे. केवळ वीसच वर्षांच्या काळात स्वतंत्र स्थान, दर्जा टिकवण्यासाठी अनेक आघाड्यांवर झगडावे लागले आहे. हा विभागही केवळ विद्यापीठासारख्या 'आयव्हरी टॉवर' मध्ये पदव्युत्तर व संशोधनपातळीवर मर्यादित राहिल्याने त्याची उपयुक्तता समाजातील व शिक्षण क्षेत्रातील इतर पातळ्यांवर पोहोचू शकली नाही.

एकविसाव्या शतकात मुख्यत्वे तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा उपयोग याविषयीच्या विकासासाठी करुन घेणे अगत्याचे ठरेल. संगणक प्रणाली व दृक-श्राव्य माध्यमांचा उपयोग प्रभावीपणे कसा करता येईल याचा विचार करायला हवा. सामाजिक प्रश्नांचे बदलते स्वरुप लक्षात घेऊन संशोधन व शैक्षणिक प्रद्धतीत बदल करणे अगत्याचे ठरणार आहे. तसेच काही काही विद्याशाखांच्या मदतीने एकत्रित काम कसे करता येईल याचा विचार करावा लागेल. मानववंश शास्त्राचे शिक्षण न घेतलेले अनेक जण या विषयाच्या अभ्यास प्रणालीत बसणाऱ्या पद्धतींनी समाजोपयोगी कामे करीत आहेत. त्यांच्याशी समन्वय कशा प्रकारे साधता येईल. प्रत्येक क्षेत्रात चाललेल्या स्पर्धेत आपले स्थान कसे टिकवता येईल यावर विचार व्हायला हवा.

• • •

## विचारवेध संमेलन, तळोदा

# आदिवासी विकासाच्या दिशा आणि दशा

(उद्‌घाटनपर भाषण)

- श्री. जनार्दन वळवी

या संमेलनाचे अध्यक्ष मा. श्री. डॉ. गोविंद गारे, सन्माननीय व्यासपीठ, संमेलनाचे संयोजक आणि संमेलनास उपस्थित असलेले सर्व बंधु-भगिनी. मी आपल्या पुढे माझे विचार मांडताना ते सर्वांना पटतीलच असे नाही याची जाणीव ठेवून मी माझे विचार मांडीत आहे.

स्वातंत्र्यापूर्वी आदिवासी समाजाच्या विकासाबाबत गोरे लोक राज्य करीत होते. त्यावेळीच त्यांच्या निर्दशनास आणले. त्यामुळे त्यांनीही लक्ष घालण्यास सुरूवात केले असे दिसून येते. त्या काळीही आदिवासी शेतजमिनी बाळगून होते. त्यांच्याकडून त्यांच्या जमिनी जाऊ लागल्या म्हणून आदिवासीचा जमिनीचे मालकी हक्क सन १९०५ मध्ये करण्यात आला. तरीही जमिनीचे हस्तांतरण थांबले नाही. आदिवासी समाजाच्या लोकांनी पुन्हा तक्रारी उपस्थित केल्या त्यामुळे परत जुन्या शर्ती करण्यात आल्या, पण त्यामुळे आदिवासी माणूस जास्त प्रमाणात भूमिहीन होत असल्याचे आढळून आले. स्वातंत्र्यानंतर आदिवासी शेतकऱ्याजवळील शेतजमीन ही नविन शर्तीची झाल्यामुळे हस्तांतरणाला काही प्रमाणात मज्जाव झाला. त्यामुळे आदिवासी समाजाच्या परिस्थितीची कल्पना येईल. धुळे जिल्ह्यापुरताच मी माझे विचार मांडत आहे. राजकीय परिस्थितीचा आढावा घेता नवापूर, नंदुरबार, शहादा, शिरपूर, तळोदा, अक्कलकुवा व आज अक्राणी महाल हे शेड्यूल एरीया म्हणून होते. ते सन १९५२-५३ पासून शिरपूर, नंदुरबार, शहादा, तळोदा हे तालुके वगळून टाकल्यामुळे या तालुक्यात सन १९७१ पावेतो कोणत्याच प्रकारचे विकासाचे हक्क मिळत नसत. परंतु सन १९७१ पासून क्षेत्र विकास योजना लागू केल्याने त्याचा लाभ मिळत आहे. शिक्षण क्षेत्रात काम करताना अनुसूचित जाती-जमातीच्या शिक्षक बांधवांनी पूज्य ठक्कर बाप्पाचे अनुकरण करावे. आजपर्यंत आपण या समाजासाठी जे केले ते व करीत आहात ते उल्लेखनीयच आहे. परंतु यापेक्षाही अधिक प्रमाणात संकल्प करून समाज कार्याद्वारे शिक्षणाचे कार्य केले तर पूज्य ठक्कर बाप्पा यांच्या संकल्पनेस हातभार लागल्याशिवाय राहणार नाही. पूज्य ठक्कर बाप्पा यांनी भारतीय आदिम जाती सेवा करण्यासाठी संकल्प केला व त्यांनी त्याचे तंतोतंत पालन केले. त्यांच्या इतका त्याग आपल्याला करता येणार नाही याची मला जाणीव आहे. पूज्य ठक्कर बाप्पांनी जो संकल्प केला तो खालीलप्रमाणे होता -

''माझा व माझ्या कुटुंबाच्या योग क्षेमासाठी भारत सेवक समाज जी काही व्यवस्था करील व जे वेतन ठरवील त्यावरच मी संतुष्ट राहीन, स्वत:साठी पैसे मिळविण्याचे कोणतेही प्रयत्न मी करणार नाही.'' यावरून आपण आपल्या समाजबांधवासाठी म्हणजे देशबांधवासाठी पर्यायाने देशासाठी पगार मिळवत आहे. तेवढ्यावरच भागवीन हे विचार आजच्या तरूण पिढीला विचार करण्यासारखे वाटतात असे माझे मत आहे.

यानंतर मी आश्रमशाळा योजनेबाबत विचार मांडतो. दि. ३-४-९८ च्या ''सकाळ'' या वर्तमान पत्रात जे मंथन या मथळ्याखाली प्रसिद्ध झाले

त्याबाबत खरोखर विचार करणे आवश्यक आहे. आश्रमशाळा या पूर्वीच्या म्हणजे सन १९५४ ते १९६७ पर्यंतच्या अनुदानित आश्रमशाळा आज राहिलेल्या नाहीत. मी देखील एक संस्था चालक आहे. तरी मी जी सत्य परिस्थिती आहे ती आज संमेलनामध्ये व्यक्त करीत आहे. कोणतीही आदिवासींसाठी विकासाची योजना राबविताना शिक्षणाला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे. शासन जे आदिवासी समाजाला (विकासासाठीचे पैसे दान) देत आहे ते धरण्यासाठी आदिवासी मानवाजवळ कटोरी हवी ती फक्त शिक्षणापासून मिळणार आहे. म्हणजे आदिवासींसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

बाळासाहेब खेर मंत्रिमंडळाच्या काळात सावकारी घालवून आदिवासी जंगलतोड करणारा मालक बनावा ही चळवळ राबविताना त्या चळवळीतून आदिवासी सेवाभावी कार्यकर्ते तयार झाले. परंतु ती चळवळ आज कार्यरत नाही. सरकारी यंत्रणेमुळे ती चळवळ अयशस्वी झाली त्यामुळे आदिवासी समाजाचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. त्यामुळे याचे पुन्हा संशोधन होऊन त्याची पुन्हा अंमलबजावणी झाली तर आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लावल्यासारखे होईल याचाही आदिवासी कर्मचारी कल्याण संघटना यांनी विचार करावा.

संपूर्ण भारतात आदिवासी समाज हा कित्येक राज्यात बहुसंख्य आहे. तो काही राज्यात भूमिहीन असून टोळ्या-टोळ्याने राहतो. तो हातमजुरीवर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्यात काही जिल्ह्यात मोठ्या संख्येने आहे. धुळे जिल्ह्यापुरता विचार केला तर त्यांच्या वेगवेगळ्या संस्कृतीवरून उच्च नीच असा प्रकार देखील आढळून येतो. आज स्वातंत्र्याच्या पन्नास वर्षाच्या काळानंतर तो प्रकार कमी झालेला आहे. या संस्कृती नुसार विशेषत: पावरा, कोकणी, मावची व धानका हे आर्थिक परिस्थितीने बऱ्यापैकी आहेत. यांच्यात मेहनतीपणा व व्यवहारपण हे गुण प्रामुख्याने आढळून येतात. ते इतर पुढारलेल्या समाजाशी समरस होऊ शकतात, जो शेतजमीन बाळगून आहे. त्यापैकीच शैक्षणिक प्रगतीत अग्रेसर आहे.

स्वातंत्र्याच्या संग्रामात देखील आदिवासी समाजाचा सहभाग आहे. परंतु त्यांची याबाबतच्या नोंदी ह्या दरोडेखोर म्हणून झालेली आहे. असे समजते. धुळे जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या संबंधित पाहिले तर स्वातंत्र्याच्या चळवळीच्या काळांत सेवाभावी संस्था स्थापन झालेल्या आहेत. प. खा. भिल्ल सेवा मंडळ, नंदुरबार या संस्थेच्या अहवालावरून दिसून येते की, कै. अमृतलाल विठ्ठलदास ठक्कार (ठक्कर बाप्पा) यांनी प्रथम पंचमहाल जिल्हा भिल्ल सेवा मंडळ स्थापन केल्यानंतर त्यांच्या प्रेरणेने धुळे जिल्ह्यात नंदुरबार येथे. प.खा. भिल्ल सेवा मंडळाची १९३८ मध्ये स्थापना झाली. हे मागे फिरून पाहिले असता त्याकाळी कशाप्रकारे आदिवासी समाजाच्या विकासासाठी प्रयत्न केला गेला त्यावरून आपणांस प्रेरणा मिळावी या उद्देशानेच मी आपल्यापुढे मांडत आहे. पूज्य ठक्कर बाप्पा यांनी १५ दिवसाचा दौरा मेवास व आज अक्कलकुवा तसेच तळोदा व त्याकाळी धुळे जिल्ह्यामधील अंदमान म्हणून ओळखला जात असलेला अक्राणी महाल या भागातून आदिवासीची सत्य परिस्थिती बघून प.खा. भिल्ल सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यानुसार प.खा. भिल्ल सेवा मंडळाच्या कार्यकारी मंडळात १) श्री. त्रिं. न. सराफ, नंदुरबार, अध्यक्ष २) श्री. विनायक नरहर बर्वे, उपाध्यक्ष ३) श्री. लक्ष्मणदास भगवानदास शहा ऑ. सेक्रेटरी ४) कै. शंकर विनायक ठकार, फिरते चिटणीस ५) श्री. आपसिंग आना पावरा, दारूबंदी प्रचारक राहणार मुबारकपूर ता. शहादा यांना आदिवासी समाज आपले पुढारी म्हणून ओळखत असे. ते ऑनररी

म्हणून सुपरवाईजरचे काम करीत होते. म्हणून त्यांचे अहवालात मंडळाने ऋण व्यक्त केला आहे. ब्रिटिश आमदानीत सातपुड्यातील आदिवासी समाजास भिल्ल हा रानटी वानर वंशातील असल्याचे इ. ३ रीच्या भूगोलाच्या पुस्तकात शिकार करून उदारनिर्वाह करणारा असा उल्लेख होता. ब्रिटिश राजवटीत धुळे जिल्ह्यात ४० वसतीगृहे शिक्षण विभागामार्फत चालविली जात होती. प.खा. भिल्ल सेवा मंडळाने फार मोठी मोलाची कामगिरी केलेली आहे. संस्थेचे संस्थापक कै. नटावदकर साहेब सोडून सर्व पुढारलेल्या विशेषत: ब्राह्मण समाजातील कार्यकर्त्यांनी तळमळीने जिव्हाळ्याने कार्य केलेले आहे. असे संस्थेच्या मागील अहवालावरून दृष्टीस येते. त्यांनी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते निर्माण केले पैकीच कै. जयंत नटावदकर होय. ज्यांनी प.खा. भिल्ल सेवा मंडळाची धुरा सांभाळली व व्याप वाढविला. मानवाच्या बुद्धीचा विकास झाल्याशिवाय समाजाचा विकास होणार नाही, हे त्यांनी जाणले. आदिवासी समाजातील मुलांना शिक्षण घेता यावे म्हणून प्रत्येक तालुक्यात आश्रमशाळा सुरू केल्या आज एकूण ८ आश्रमशाळा वसतीगृहे व माध्यमिक विद्यालय चालू आहेत. ते खासदार असतांना भारत सरकारने आदिवासी समाजाची प्रगती झाली आहे किंवा कसे? याचा अभ्यास करण्यासाठी डेबरभाई कमिशन नेमले ते कमिशन धुळे जिल्ह्यातील धडगाव येथे आले असता कै. जयंत नटावदकरांनी जे लेखी निवदेन दिले ते एक लहानसे पुस्तकच होते. त्यांनी त्यात तळागळातील आदिवासींच्या समस्या नमूद करून भारताच्या राज्यघटनेतील तरतुदीत काही प्रमाणात समावेश करून घेण्यासारख्या बाबी असल्याचे त्यांनी मला सांगितले. सातपुड्यातील आदिवासी समाजाच्या आर्थिक बाबी मी निर्दशनास आणून दिल्या. शेती उत्पन्न हे नऊ महिने पुरत असे, तर तीन महिने जंगल उत्पन्नावर चारितार्थ चालवित असे. काही अतिशय गरीब असलेल्या कुटुंबात एखादी लहान मुलगी दोन-तीन वर्षाची सधन कुटुंबाला विकून देत असे. अशा दहा मुलींची विक्री झालेली मी त्यांच्या निदर्शनास आणून दिली म्हणून शासनाने या भागाकडे अधिक लक्ष दिले गेले. त्यामुळे समाजात थोडाफार बदल झालेला आहे.

स्वातंत्र्य चळवळ राबविताना काँग्रेस पक्षातील काही कार्यकर्ते भूमिगत होते. आदिवासी भागात शहादा, तळोदा, नंदुरबार या भागात कै. शंकर विनायक ठकार उर्फ नानासाहेब ठकार हे काम करीत होते. त्यांनी कळत न कळत आदिवासी समाजात गुला महाराज यांच्या कार्यास चालना देऊन त्या संघटनेचा वापर स्वातंत्र्याच्या चळवळीचे स्वरूप म्हणून उपयोगाला आणले. दारू दुकाने बंद पडली. दारू बंदीचा त्या काळातील सरकारच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला व पुढे संघर्ष घडवून आणून गुला महाराजचे बंधू भाऊ रामदास महाराज यांना हद्दपार केले असता कै. नानासाहेब ठकारांनी दूताकरवी ह्याच्या विरोधात हद्दपारीचा कायदा भंग करून बंड करावयास लावले. परंतु शासनात त्याची नोंद दरोडेखोर म्हणून करण्यात आली हे आदिवासींचे दुर्दैवच म्हणावे लागेल. कित्येक आदिवासी अक्राणीच्या किल्ल्याजवळ खाईत सैनिकांकडून गोळीबार झाल्याने त्यात मृत्यूमुखी पडले व इतरांना कारावास भोगावा लागला. ते जर दरोडेखोर होते तर कोणत्या कोर्टात केस चालविली व त्याचा निकाल काय लागला याची नोंद नाही. थोड्या दिवसात त्यांची कारावासामधून सुटका केली. म्हणून या स्नेहसंमेलनामध्ये यासंबंधी ठराव आणून शासनाने याची दप्तरी नोंदीची चौकशी करून जी नोंद असेल तिच्या ऐवजी स्वातंत्र्यासाठी लढा दिला याची नोंद घ्यावयास लावावी तर अधिक बरे होईल असे मला वाटते.

स्वातंत्र्याच्या पन्नास (५०) वर्षाच्या कालावधीत आदिवासी समाजाची थोडीफार शैक्षणिक प्रगती व इतर विकासाची वाटचाल सुरू आहे. भारताच्या माजी

पंतप्रधान कै. इंदेराजी असताना महाराष्ट्र शासनाने लोकसंख्येचा प्रमाणात राजकीय हक्कासाठी राखीव जागा निर्माण केलेल्या असूनही आदिवासी बांधव त्याचा लाभ घेऊ शकत नाही. ग्रामपंचायत सरपंच, तालुका पंचायत सभापती व जिल्हापरिषदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष ह्या जागा राखीव असूनही त्याचा लाभ आपण घेऊ शकत नाही. याचाच अर्थ असाही होऊ शकतो की आदिवासी समाज हवा त्याप्रमाणात जागृत झालेला नाही. व जो जागृत झालेला आहे. तो स्वत: स्वस्वार्थात गुरफटला गेलेला आहे असे निदर्शनास येते. म्हणून आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांनी पदवीप्राप्त असलेल्या व्यक्तींनी कै. ठक्कर बाप्पा कै. शंकर विनायक ठक्कर, कै. गोबजी वसावे, कै. आपसिंग आना पावरा या थोर समाज सेवाकासारखे संकल्प करून कार्य केले पाहिजे, समाजात अशाप्रकारचे कार्य करण्याची जिद्द बाळगणारे युवक निर्माण व्हायला पाहिजे. तसे कार्यकर्ते निर्माण झाले नाही तर हक्क असूनही त्याचा लाभ घेता येणार नाही. ''केवढे हे आपले दुदैव !''

बुद्धीवादी माणसाच्या अधीन राहून वैयक्तिक लाभ घेणारे निर्माण होतील, आज आदिवासी समाजाच्या परिस्थितीचे नीट निरीक्षण केले तर समाजाची वनवासी, गिरीजन या नावाने ओळख होत असे परंतु आज हे शब्द गेले व आदिवासी म्हणून आपल्या समाजाची वहिवाट आहे. जमीन हस्तांतरण कायदा, राजकीय क्षेत्रातील राखीव हक्क हे सर्व कागदावरच राहणार आहे. याचा विचार व्हायला हवा, तो आपण करणार आहात कां? कृपया याचा विचार व्हावा. श्री. दादासाहेब बिडकर थोर समाजसेवक यांच्या शब्दात सांगावयाचे झाले तर ''आदिवासी माणूस गरीब आहे पण तो चोर, भिकारी अथवा बेकार नाही जंगल हा त्याचा प्राण आहे.'' या विचाराचा आपण जरूर अभ्यास करावा. आज वनवासी या शब्दाच्या नावाने सेवाभावी संस्था चालू आहेत. कै. ठक्कर बाप्पा यांनी भारतीय आदिम जाती सेवा संस्था स्थापन करून ती एक देशभर कार्यान्वीत असलेली संस्था म्हणून नावारूपास आणली आहे. म. गांधीच्या अधिपत्याखाली त्यांच्या प्रेरणेने या देशात चळवळी केल्या त्यात आदिवासी समाजात तळमळीने, आत्मियतने संकल्प करून हयातभर कार्य करणारे पूज्य ठक्कर बाप्पा व त्यांच्या प्रेरणेने मध्यप्रदेशात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तेथील मुख्यमंत्री श्री. शुक्ला यांनी पूज्य ठक्कर बाप्पांकडून एक योजना तयार करून ती योजना राबविण्यासाठी ठक्कर बाप्पांनी सूचित केलेले बाळासाहेब देशपांडे यांना ती योजना राबविण्यास दिली. ती योजना त्यांनी राबविली व त्यातून पुढे त्यांनी वनवासी आश्रम या नावाने स्थापन केली व ती संस्था चालविली. व ते आजही वनवासी वनवासी आश्रम संस्था चालवत आहे. आदिवासी समाजाला ते मानतात व कार्य करीत आहे.

आदिवासी समाजाच्या विकासाठी सरकारने ज्या योजना राबविल्या व आज राबवित आहे. बुद्धीवादी समाजाच्या अधिपत्याखाली या समाजाचे दैनंदिन जीवन चारितार्थ चालवित असल्याने व शासन यंत्रणेच्या मार्फत योजना राबवित असल्याने कोणत्याही योजनेचा लाभ त्यांच्यापर्यंत खऱ्या अर्थाने पोहचत नाही. कित्येक योजनांचा लाभ प्राप्त करण्यासाठी त्यांना कळत नाही. ती समाजजागृती व्हायला हवी, त्याची आज निंतात गरज आहे. ज्याप्रमाणे पालथ्या घागरीत पाणी जात नाही त्यातलाच हा प्रकार आहे. म्हणून आदिवासी समाजाचा शैक्षणिक दृष्टिने बुद्धीचा विकास होणे आवश्यक आहे. हे शासन यंत्रणा व शासनकर्ते यांच्यावर सर्वस्वी अवलंबून आहे. आदिवासी समाजात कार्य करणारे कार्यकर्ते कोणत्याही जाती जमातीचे असोत त्यांना राजाश्रय असल्याशिवाय त्या कार्यर्त्यास आदिवासी समाजात कार्य करता येणार नाही. म्हणून समाजातील प्रतिनिधीचा विचार केला असता व्यापारी व बुद्धीवादीच्या आधी असलेला आदिवासी माणूस

प्रतिनिधी म्हणून पुढे येतो व तो समाजकारण करून प्रतिष्ठा प्राप्त करून समाजात नेतृत्व निर्माण करू शकतो. परंतु आपला आदिवासी समाज पुरेसा जागृत नसल्याने टिकाव धरू शकत नाही. त्यामुळेच तो समाजात नेतृत्व निर्माण करून समाज संघटित करू शकत नाही. याची मला खंत आहे.

आपल्या आदिवासी समाजात शैक्षणिक पात्रता असलेला पदवीधर आदिवासी माणूस आजच्या या बदलत्या युगात इतर समाजात रममाण होऊन आदिवासी समाजापासून दुरावत जातो. तो इतरांचे पुढारलेल्या समाजाचे अनुकरण करून त्याची प्रतिष्ठा वाढवित वावरत असतो सामाजिक स्वाभिमान, समाजाची बांधिलकी यापासून तो दुरावत जातो, आज समाजात लग्न व अंत्यविधी बाबत देखील इतरांसारखे अनुकरण करीत आहे. त्यामुळे आपल्या समाजातील संस्कृती व संस्कार लोप पावत आहे याचा संघटनेने विचार करावा.

आपण आपल्या आदिवासी समाजाचे खास करून नंदुरबार, तळोदा, शहादा सारख्या शहारात जो पुढारलेल्या समाजाच्या सहवासात दैनंदिन जीवन जगतो आहे त्याची विकासाची वाटचाल बघता शेजारी पुढारेल्या समाजाच्या बरोबरीने जगण्याची शक्ती प्राप्त करून घेण्याच्या प्रवृत्तीपासून दूर गेलेला आहे. आणि जो फरक जाणवतो त्यावरून बुद्धीवादीच्या अधिपत्याखाली त्याच्यासारखे जीवन जगण्याची महत्वाकांक्षा करीत नाही. त्याची इतरांच्या बरोबरीने जाण्याची शक्ती हीन झालेली असे म्हणावे लागेल. त्याची शैक्षणिक प्रगती करण्याची इच्छा नाही. अशा घटकांसाठी आर्थिक साह्य देऊन त्यायोगे प्रगती करील, विकास करील असा समज करून घेणे कितपत योग्य होईल याबाबत शंकाच वाटते, त्याचप्रमाणे पहाडातील, पहाडात रहणाऱ्या आदिवासीची अवस्था आहे. म्हणून अशा घटकांसाठी समाजातील माणसांनी संकल्प करून स्वत: लोभ न ठेवता कै. पूज्य ठक्कर बाप्पा व कै. शंकर विनायक ठकार यांचे अनुकरण करून त्याचे समाज प्रबोधन व्हायला हवे. कै. पूज्य ठक्कर बाप्पा यांचे आदिवासी समाजावर फार मोठे ऋण आहे. त्याची फेड आपण आदिवासी समाज करू शकणार नाही. त्याचे संपूर्ण आयुष्य आदिवासींची सेवा करण्यातच गेलेले आहे. कै. पूज्य ठक्कर बाप्पा यांचे एक लहानसे पुस्तक ज्यांनी छापलेले आहे ते मा. डॉ. श्री. गारे हे या संमेलनाचे अध्यक्ष आहे. हा एक फार मोठा योग म्हणावा लागेल, आपण सर्व तरूण वर्ग अभ्यासू, जिज्ञासू आहात म्हणून वरील पुस्तक वाचून त्याचे अवलोकन केल्यास या समाजाचे काही प्रमाणात ऋण फेडल्यासारखे होईल. पूज्य ठक्कर बाप्पा यांचे आदर्श अंगीकारून समाज कार्य केले पाहिजे असे झाले तर आदिवासी समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत हातभार लावल्यासारखे होईल.

जाता जाता मी एका विषयाचा उल्लेख करतो आणि माझे भाषण संपवितो धुळे जिल्ह्यातील अक्राणी तालुक्यात १६३ गावे असून त्यापैकी फक्त ९९ गावे रेव्हीन्यू झालेले असून ६४ वनगावे आहेत. आज स्वातंत्र्य मिळून ५० वर्षाचा काळ लोटला आहे व आपण ''स्वातंत्र्य महोत्सव'' साजरा करीत आहोत परंतु पिढ्यान-पिढ्या ज्या जमिनीवर आदिवासी आपला चरितार्थ चालवित, जीवन जगत आला आहे, त्यांना निवासासाठी देखील हक्क प्राप्त होऊ शकत नाही, ही एक आपल्या आदिवासी समाजाची शोकांतिकाच आहे याचा देखील आपल्या संघटनेने अभ्यास करावा असे मला वाटते.

धन्यवाद.

• • •

# पामल गौतमेच्या किनाऱ्याहून

**- सौ. कुसूम अलाम**

जंगलात निर्भय, मुक्त फिरणारा आनंदीवृत्तीचा, निसर्गावर निरतिशय प्रेम करणारा हा आदिवासी माणूस. ह्याला विकासाचे वेध (वेड नव्हे) लागल्यापासून शहरी जीवनाशी त्याचा संपर्क वाढत आहे. सत्ता-स्पर्धेचे युग ह्या प्रकारापासून तो अपरिचित असला तरी ह्या प्रकारची झळ त्याला पोचतच आहे असे जाणवते. अशा परिस्थितीत जुळवून घेताना त्याची दमछाक होते आहे. तो भांबावलेला दिसतो अशावेळी त्याला कुणाच्या तरी आस्थेची, साथीची, मार्गदर्शनाची गरज भासते, जीवन गतीमान आहे. त्यातील वास्तवालासुद्धा गतीनियम लागू आहेत. ह्या सजीव सृष्टीतील कण न् कण सतत बदलत असतो. गतीमान होत असतो. हे शास्त्राने सिद्ध केले आहे. तेच नियम मानवी समाजासाठीही लागू आहेत. अशावेळी अज्ञानाच्या खाईत, दारिद्रयाच्या गर्तेत असलेल्या ह्या माणसाला समाजपरिवर्तनाची व्यापक दृष्टी असलेल्या सक्षम विचारांची गरज भासते.

आपल्या प्रगतीचा मार्ग कोणता ? समाजपरिवर्तनाची दिशा कोणती ? आपली ध्येय धोरणे काय ? अशा साऱ्याच प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी आदिवासींनी संघटित होणे गरजेचे आहे. त्यासाठी आपणास आपल्या संस्कृतीकडे उघड्या डोळ्यांनी बघणे अगत्याचे आहे.

आम्ही जिचे वारस आहोत, अशी सर्वश्रेष्ठ संस्कृती म्हणजे कोयतूर संस्कृती, सगा संस्कृती. आमची आदिम संस्कृती. समूह हे तिचे खरे अधिष्ठान. सहजीवनाची ती गुरुकिल्लीच जणू. परंतु परिवर्तनाच्या लाटेत, काळाच्या ओघात आणि आधुनिक पाश्चात्य संस्कृतीच्या अंधानुकरणात आम्हास आमच्या संस्कृतीचे विस्मरण होत असल्याचे वाटत आहे.

आज कागदोपत्री आदिवासींचा धर्म हिन्दू धर्म होऊन बसला. आदिवासी कधीही हिन्दू नव्हता. अगदी अलिकडच्या काळात आजचा आदिवासी माणूस इतरांसोबत गणपतीस दूध पाजू लागला. रामकृष्णाच्या मठात, मंदिरात मनोभावे जाऊ लागला. घरात धार्मिक सोहळा करणे आणि लग्नात हुंडा घेणे एवढेच नव्हे तर हुंड्यासाठी छळ करणे यास तो आपली प्रतिष्ठा समजू लागला (एवढे बरे ! सगा आणि सोयरे पद्धती आजही टिकून आहे तिला अजूनही तडा गेलेला नाही.) त्यासाठी कोयतूर संस्कृतीचे दुसऱ्यांच्या संस्कृतीच्या अतिक्रमणापासून संरक्षण व्हावे, तिचे जतन व्हावे ह्या दृष्टीने काही विद्वान, विचारी आचार्य मंडळी, गोंडी धर्म संमेलने भरवून मार्गदर्शनाचं कार्य करीत आहेत.ही अभिनंदनीय बाब होय. परंतु परिवर्तनाच्या व संघटनात्मक दृष्टीने जर ही संम्मेलने भरवली जात असतील तर ते फारसे योग्य नाही. कारण कोणतीही परिवर्तनाची चळवळ जातीधर्माच्या नावावर यशस्वी होऊच शकत नाही. आजच्या परिस्थितीत राजकीय मंडळींनी धर्म ह्या शब्दास बदनाम करून टाकले आहे. त्यांच्या अयोग्य वापरामुळे धर्म संकल्पनेकडे पाहताना शरमेने मान खाली घालावी लागते. खरं तर धर्म ही संकल्पना फार पुरातन काळापासूनच मानव समाजात रूढ होती. परिवर्तनाची दिशा दाखवणारे क्रांतज्योती महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्य धर्म संकल्पना मांडली. त्यावेळेस धर्माला समाजात फार मोल होते. पण आजची परिस्थिती तशी नाही. त्यामुळे नवसमाज

निर्मितीचे बीजारोपण करताना ह्या बदलाच्या आणि बदलत्या काळात धर्माधिष्ठित विचारधारा कुचकामी आहे. समाजपरिवर्तनासाठी उपयोगात व्यवहारज्ञान आज धर्मात नाही. त्यासाठी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून त्याचा अभ्यास आवश्यक ठरतो.

गोंड हा शब्द 'गण' शब्दाचा अपभ्रंश होय. घटनाकारांनी 'गण' शब्दाची Republic अशा संकल्पना घेऊनच स्वतंत्र भारताला गणतंत्रिक Republic state ची संकल्पना/आदर्श उभा केला. (गोंडी संस्कृतीचे संदर्भ पान. १५०) गोंड ही जात नसून तो एक व्यापक समाज आहे. (पान १२८) एवढे असताना बरीच मंडळी स्वत:स गोंड किंवा राजगोंड म्हणूनच ओळख सांगतात. त्यावेळी अशी गोंडी धर्म संमेलने जातीवाचक ठरू लागतात. ती फक्त एका जातीचेच नेतृत्व करते की काय अशी भीती मनास वाटून जाते त्यावेळी आपलेपणास तपासून पहावे लागते.

आदिवासींमधील कोरकू, कोलम, वारली, कातकरी, भिल्ल, आंध यांच्यामध्ये संगापद्धती आहे की नाही ठाऊक नाही. परंतु आपण आपल्या कोयतूर ह्या सर्वश्रेष्ठ संस्कृतीचा विचार करता करताच सर्वार्थाने व्यापक दृष्टिकोन ठेवून मूळनिवासी समुहाचा विचार करावा लागेल. समग्र आदिवासींच्या एकतेसाठी आपल्या आदिम समुहातील 'गण' कोरकू, कोलम, आंध, भिल्ल, कातकरी, वारली, एकत्र येण्यास कचरतील अशी शक्यता वाटते. जर कोयतूर संस्कृती टिकवण्यापुरतीच जर गोंडधर्म संमेलने असतील तर मग काहीच हरकत नाही. नाहीतर संकुचित भावना वाढीला लागून समाजास फायद्यापेक्षा हानीच होऊ शकेल. आज अन्यायाचा प्रतिकार करायचा असेल तर सर्वांनीच एका पातळीवर येणे गरजेचे वाटते.

● ● ●

## वचन

चौऱ्यांशी लक्ष योनीबद्दल मला काय ठाऊक !

मी तर आदिवासी आहे

पण मित्रा, एवढं आग्रहानी सांगते

'अनट्रेन्ड टिचर' बनवण्याच्या प्रक्रियेत

तू जंगलच्या फेऱ्यातच अडकणार आहेस

मध, डिंक, हिरडा, बेहडा,

चारं, टेंभर, साग, बांबू,

खनिज संपत्तीही

कुणी खुशाल नेवोत

सारं जंगल नष्ट झालेलं चालणार आहे

पण जंगलचा माणूस

जंगलीच राहिला पाहिजे

नाहीतर, राजधानीत रेलाँ कोण नाचणार आहे ?

आदिमा, आधीच कुपोषणाने खंगलेले माझे शब्द

नक्षलवादाने भयग्रस्त आहेत

तरीही ते कसेबसे जिवंत आहेत

मित्रा,

माझ्या शब्दांना जगवण्याचं वचन दे

माझ्यावर होणाऱ्या अन्यायासाठी

मला दोन शब्द बोलायचे आहेत

— सौ. कुसूम अलाम

# आदिवासी एकता परिषद

## संमेलन वृत्तांत

- राजू पांढरा

बोईसर चिल्हारफाटा अशा मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय हमरस्त्याला जोडणाऱ्या व सूर्या नदीच्या किनाऱ्यावर नागझरी हे एक छोटेसे आदिवासी गाव. चारी बाजूंनी प्रमुख रस्त्यावर तसेच बोईसर रेल्वेस्थानक व मुंबई अहमदाबाद ह्या राष्ट्रीय हमरस्त्यावरून जवळ असल्यामुळे येण्या-जाण्याच्या चांगल्या सुविधा, तसेच जवळच असलेल्या या सूर्या नदीच्या पाण्याच्या उपलब्धतेमुळे नागझरी ह्या गावाची संमेलनासाठी सर्वात सोईचे गाव म्हणून सर्वांच्या सहमतीने निवड केलेली होती.

संमेलनाची तारीख १४/१५ जानेवारी ही निश्चित असते. त्यामध्ये कोणताही बदल होत नसतो. संमेलनाचे स्थळ मात्र वर्षापूर्वी झालेल्या संमेलनात निश्चित केलेले असते.

संमेलन महाराष्ट्रात असल्याने, संमेलनाचे निमंत्रक भूमिसेनेचे अध्यक्ष काळूराम धोदडे हे होते. त्यामुळे भूमिसेना व आदिवासी एकता परिषदेचे सर्व कार्यकर्ते दिवस रात्र ह्या संम्मेलनासाठी झटत होते. गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्र अशा चार राज्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित रहातील म्हणून प्रत्येक गावागावातून धान्याच्या स्वरूपात तसेच पैश्याच्या स्वरुपात निधी जमविण्यात आला होता. लोक सुद्धा अगदी उत्स्फूर्तपणे निधी देत होते.

कार्यकर्त्यांमध्ये अमाप उत्साह संचारला होता. कार्यकर्ते शेवटी तीन महिने संमेलनाची तयारी करीत होते. मंडपापासून ते प्रमुख प्रवेशद्वारापर्यंत आदिवासी चित्रकलेची सजावट करण्यात आली होती. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन मोठी तारण वाद्य उभारण्यात आली होती. आदिवासी चित्रकार तसेच कलाकारांनी रात्र-रात्रभर जागून कोणताही मोबदला न घेता मंडप सजावट करून दिली होती.

धुळे जिल्ह्यातील वाहरू सोनावणे आपल्या दोन हजार कार्यकर्त्यांसह १३ जानेवारीलाच संध्याकाळी संम्मेलनाच्या ठिकाणी उपस्थित होते. तर गुजरातचे अशोकभाई चौधरी सुद्धा त्याच दिवशी हजर झाले होते. १४ जानेवारी रोजी पहाटे ५.०० वाजता बोईसर स्थानकावर भेट दिली असता मध्यप्रदेशातून आलेले शंकर तलवडा आपल्या कार्यकर्त्यासह रात्रीच आले होते. परन्तु वाहनाची सोय नसल्यामुळे स्थानकावरच झोपलेले आढळले. त्यांना तेथेच थांबविण्यात आले. सकाळी बोईसर स्थानकाच्या परिसरातील सर्व आदिवासी जमा झाले होते. सर्वांनी बिल्ले लावून बोईसर रेल्वे स्थानकातून मिरवणुकीने व घोषणा देत, व मध्यप्रदेशातील आदिवासी आपले पारंपारिक वाद्ये वाजवित बेटेगावच्या मैदानपर्यंत आले. तेथून त्यांना ट्रक व टेम्पोने संमेलनस्थळी आणण्यात आले. दरम्यान मध्यप्रदेशातील आदिवासींनी आपल्या बरोबरच आणलेल्या तीरकमठ्यातून एक बाण बोईसरचे फौजदार श्री. कदम यांनी मागून घेतला. व खैरपाडा वरील कार्यकर्ते श्री. बालकिसन धोडी यांना दाखवून हे शस्त्र कशासाठी व शहरात का आणले म्हणून विचारणा केली. परतु हे त्यांचे पारंपारिक हत्यार आहे. जंगलात रहावे लागत असल्याकारणाने त्यांना त्या शिवाय शिकार वगैरे करता येत नाही. म्हणून आपल्या बरोबरच ते बाळगतात. शिवाय संम्मेलनात इतर सहभागी झालेल्या आदिवासीना दर्शन घडावे म्हणून प्रदर्शनात मांडण्यासाठी हे शस्त्र आणले आहे असे सांगताच त्यांचीही समजूत झालेली दिसून आली.

हा संवाद चालू असतानाच तहसीलादर कार्यालय पालघर येथून एक कर्मचारी संम्मेलनास परवानगी नाकारल्याचे पत्र घेऊन आला. फौजदार श्री. कदम यांनी ते पत्र वाचून रॅली अडवू का म्हणून बालकिसन यांना विचारणा केली, परंतु तो पर्यंत ४-५ कार्यकर्त्याशिवाय येथे कोणीही नव्हते. फक्त आम्हीच आहोत, आम्हाला अडवा असे हसत हसत उत्तर बालकिसन धोडी यांनी देताच फौजदार श्री. कदम सुद्धा हसत हसत निघून गेले.

ह्या संमेलनासाठी परवानगी मागावयास गेलेल्या आदिवासी कार्यकर्ते श्री. आत्माराम वनगा व श्री. सुरेश हांडवा यांना मनोर पोलीस स्टेशनचे फौजदार श्री. पाटील यांनी जातीवाचक अपशब्द वापरून परवानगी न देताच परत पाठवून दिले होते. सदर घटनेचा तपशिल महाराष्ट्र टाइम्सच्या १३ जानेवारीच्या वर्तमान पत्रात छापून आल्यामुळे त्याचा एकच गवगवा झाला होता. सदर संमेलनाला परवानगी मिळते की नाही ह्या संबंधी शंका होत्या. आणि परवानगी नाकारल्यास येवढ्या मोठ्या जनसमुदायाला कसे आवरायचे असे प्रश्न भेडसावित होते मंडप वगैरे उभारुन झाला होता.

सकाळी १०-०० वाजता लोक आपल्या पारंपारिक पोशाखात येत होते. त्याच वेळेत तहसीलदार कार्यालयातील कर्मचारी परवानगी नाकारल्याचे घेऊन आला. पत्र वाचून संम्मेलनाचे निमंत्रक काळूराम धोदडे यांनी सही न करता पत्र परत पाठवून दिले, व संम्मेलनाचे उद्‌घाटन करुन संम्मेलनाची सुरुवात करुन दिली.

पहिल्या दिवशी खुले मंच असल्या कारणाने सर्व कार्यकर्त्यांना भाषण करण्यास मुभा होती. आपल्या पंरपरेनुसार सर्व कार्यकर्ते खाली जमीनीवर बसले होते. फक्त भाषण करणारी व्यक्ती मंचाचा वापर करीत होती. आम्ही सर्व समान आहोत, कोणीही मोठा नाही किंवा छोटा नाही ही भावना व्यक्त करण्यासाठी सर्व कार्यकर्ते सर्वसामान्य जनते बरोबर बसलेले दिसून येत होते.

संध्याकाळी ६.०० वाजता महिला संमेलनामध्ये गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश व महाराष्ट्रातील महिलांनी सहभाग घेतला. महिला संमेलनानंतर लगेच ८.०० वाजता विविध सांस्कृतिक कार्यक्रम सुरु करण्यात आले. स्थानिक लोकांनी कामडी, व ढोल नृत्य आपल्या पारंपारिक पोशाखात करुन दाखविले तर गुजरात, मध्यप्रदेश व राजस्थान मधल्या आदिवासींनी आपल्या पांरपारिक पोशाखात व वाद्य वाजवित आपले आदिवासी नृत्याचे कार्यक्रम केले. महाविद्यालयीन विद्यार्थीनी आपल्या बोलीभाषेतील नाटक करुन दाखविले, त्यामुळे भर थंडीत देखील एका उल्हासित वातावरणात सर्व श्रोते धुंद होऊन आपल्या स्वत:च्या ओळखखुणा मध्ये सामील होऊन गेले होते.

दुसऱ्या दिवशी आदिवासीच्या हक्कांच्या घोषणापत्राचा मसुदा प्रमुख कार्यकर्त्यामध्ये वाचून त्यावर चर्चा करण्यात आली. त्यानंतर प्रमुंख कार्यक्रमात संमेलनाचे अध्यक्ष श्री. अशोकभाई चौधरी यांनी वाचून त्यावर किरकोळ काही दुरुस्ती करुन घोषणापत्र संम्मेलनात मध्ये संमत करण्यात आले.

आदिवासींना स्वयंनिर्णयाचा हक्क आहे आणि हा अधिकार असे सांगतो की आदिवासी समूह आपल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, तसेच शैक्षणिक संस्था स्वस्थ ठरवू शकतात. अगदी ह्याच न्यायानेच आम्ही कोणतीही जबाबदारी पेलण्यात समर्थ असून आपआपल्या विचाराचा आदर न राखता दुसऱ्याने लादलेल्या विचाराचा आम्ही स्विकार करणार नाही. हा कानमंत्र घेऊन सर्व समूहानी दुपारी ४.०० वाजता संम्मेलनात पुढील १४/१५ जानेवारी १९९९ रोजी मध्यप्रदेशात परत भेटूया असे म्हणून निरोप घेतला.

● ● ●

# ऐतिहासिक वैरागड

**- सौ. कुसूम अलाम**

नवव्या शतकात वैरागड येथे 'माना' जातीच्या नागवंशीय राजांनी सत्ता स्थापन केली. पहिला राजा कुरुमप्रुदोह होय. माना राजांची सत्ता गडचिरोली, चांदा ब्रम्हपुरी, राजूरा, सिरोंचा या तालुक्यांनी व्यापलेल्या प्रदेशावर पसरली होती. बाराव्या शतकात माना राजांनी रतनपूरच्या हैहयवंशी राजा जाजल्लदेव प्रथम याचे मांडलिकत्व पत्करले व त्यास करभार देऊ लागले. नागराजे हे कधीच स्वतंत्र नसत. इ.स. १११४ च्या शिलालेखात जाजल्लदेव हा वैरागड, लांजी (बालघाट) व भनारा (भंडारा) येथील सत्ताधिशांपासून करभार घेत असे असा उल्लेख आहे. तेराव्या शतकात देवगिरीच्या यादवांनी वैनगंगेच्या पूर्वेस मार्कंडा ह्या तीर्थक्षेत्रापर्यंत मजल मारली. याच सुमारास दक्षिणेकडे गोंडांचा उदय झाला. यादवांच्या सैन्यातील एक गोंड अधिकारी कोलभील्ल याने गोंडांना संघटित केले व माना राजांपासून माणिकगड जिंकून घेतला. त्याच्याच वंशातील भीम बल्लाळसिंह याने इ.स. १२४७ साली शिरपूर येथे गादीची स्थापना केली. हाच चंद्रपूरच्या गोंड घराण्याचा पहिला पुरुष होय. यानंतर इ.स. १३२२ मध्ये बल्लारपूर येथे व इ.स. १४७२ मध्ये चंद्रपूर येथे गादीचे स्थलांतर झाले. यावेळेपर्यंत नागराजे नामशेष होऊन गोंडराजांची सत्ता चंद्रपूर जिल्हा पूर्व द्रुग व पश्चिम यवतमाळ एवढ्या प्रदेशावर स्थापन झाली होती.

गोंड राजे कधी कधी मुस्लिम राज्यकर्त्यास खंडणी देत होते. इ.स. १५४६ मध्ये रतनपूरचा हैहयवंशी राजा कल्याणसहाय याने आपले स्वामित्व बसवले होते. पण शूर, महत्त्वाकांक्षी व स्वतंत्र वृत्तीचा बाबाजी बल्लाळशहा याने ते स्वामित्त्व झुगारून दिले. इ.स. १४७४ मध्ये बहामनी सुलतानाच्या ताब्यात गेलेले वैरागड बाबाजी बल्लाळशहाचा मांडलिक टिपागडचा राजा पुरमशहा याने जिंकून घेण्याची कामगिरी पार पाडली.

**हिऱ्याची खाण :** वज्र म्हणजे हिरा. हिऱ्याच्या खाणीस संस्कृतमध्ये 'वैरागर' म्हणतात. त्यावरून गावाचे नाव वैरागड असे पडले. या खाणीचा उल्लेख अबुल फजलने लिहिलेल्या ऐन - इ - अकबरी या ग्रंथात आढळतो. ही खाण इ.स. १६४३ साली तृतीय रघुजी भोसले यांच्या कारकिर्दीत बंद करण्यात आली.

**वैरागडचा किल्ला :** बाबाजी बल्लाळशहा याने वैरागड येथे किल्ला बांधला. हा किल्ला गावाच्या पूर्वेस असून त्याने किमान दहा एकर जागा व्यापली आहे. भक्कम काळ्या दगडाने बांधलेल्या ह्या किल्ल्याच्या सभोवती खोल खंदक आहे. तटाची उंची १५ ते २० फूट उंच असून किल्ल्याचे प्रवेशद्वार दक्षिणेस आहे. किल्ल्यात प्रवेश करताना तीन दरवाज्यातून जावे लागते. पहिला दरवाजा भिंतींनी तटास जोडला आहे. आत प्रवेश केल्यावर किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार लागते. प्रवेशद्वारातून काही अंतर आत गेल्यावर एक चबुतरा लागतो. यावर तेथील किल्लेदाराची कचेरी व घरे होती. डाव्या बाजूस जीर्ण झालेली एक पायऱ्यांची विहीर आहे. उजव्या बाजूस तटाच्या जवळून आत गेल्यावर तटाच्या आधाराने बांधलेले केशवनाथाचे देऊळ आहे. (केशवनाथाचे देऊळ बल्लारपूर किल्ल्यासमोरही आहे) हा किल्ला काही ठिकाणी ढासळला असून संरक्षित स्मारक म्हणून सरकारकडून त्याची निगा राखली जाते.

**इदगा :** या किल्ल्याच्या वायव्येस इदगा नावाची टेकडी आहे. इदगा म्हणजे कबर होय. मुख्य कबर टेकडीच्या माथ्यावर आहे. बाकीच्या कबरी टेकडीच्या उतरणीवर जंगलात दबलेल्या आहेत.


हे असे झाले की - गोंड राजांची सरहद्द जेव्हा बहामनी सुलतानाच्या राज्यास टेकली तेव्हा कटकटी सुरु झाल्या. त्यामुळे इ.स. १४१२ मध्ये फिरोजशहाने व इ.स. १४२६ मध्ये अहमदशहावलीने गोंड राज्यावर स्वारी केली. त्याने त्या भागात प्रलय माजवून दिला. तेव्हा गोंड राजांची गादी बल्लारपूर येथे होती. गोंड राजे दिनकरसिंग व रामसिंग यांनी सुलतानाचे मांडलिकत्व पत्करले व खंडणी भरली. पण त्यानंतर गादीवर आलेला सुर्जाबल्लाळसिंह याने स्वामित्व नाकारून खंडणीही बंद केली. बहामनी सुलतानाचा सेनापती युसुफ आदिलखान चालून आला व वैरागडवर स्वारी केली. हिऱ्याची खाण काबिज करणे हा हेतू होताच. त्याने किल्ल्यास वेढा दिला. युध्द सहा महिने चालू होते. रक्तपात झाला. लढाईत मारल्या गेलेल्या मुसलमान अधिकाऱ्यांना याच टेकडीवर दफन करण्यात आले. त्यालाच इदगा म्हणतात.

**वैरागडचे व्यापारी महत्त्व :** इंग्रजांनी हिन्दुस्थानचा नकाशा तयार करण्याचे काम कॅप्टन ब्लंट कडे सोपवले. कॅप्टन ब्लंट आपल्या इ.स. १७९५ च्या प्रवास वृत्तात म्हणतो -

वैरागड हे मोठे शहर असून तेथे मोठा व्यापारही चालतो. तेथे छत्तीस गडातून व उत्तर सरकार प्रांतातून येणारे लमाणांचे तांडे दिसतात. वऱ्हाड नागपूरकडून इकडे पुष्कळ कापूस येतो. तो उत्तर सरकारातील व्यापारी खरेदी करतात. व त्या ऐवजी तिकडील सुपारी, नारळ, मीठ हे समुद्र किनाऱ्यावरचे पदार्थ आणून विकतात. या कापसाचे उत्तर सरकारातील लोक सुंदर कपडे विणतात. वैरागड हे शहर चांदयाच्या जवळपास असून तेथील परिस्थिती चांदयासारखीच आहे.

गडचिरोली जिल्ह्यात असलेले वैरागड खोबरागडी व वैलोचना ह्यांच्या संगमाजवळ आहे. वैलोचना ही छोटी नदी टिपागडच्या टेकडीतून उगम पावून वैरागडच्या खोबरागडीस येवून मिळते. हिला टिपागडी म्हणतात. ती एका रस्त्यावरून वळणे घेत सातवेळा आडवी येते. ह्यामुळे तिला सातनदीही म्हणतात. वैरागडला जाण्यास आरमोरीहून एस.टी. ची सोय आहे.

• • •



# आदिवासी भागातील महिला ग्रामपंचायत सदस्यांचे प्रशिक्षण शिबिर : एक आढावा

- पुरुषोत्तम आगाशे

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ही शैक्षणिक स्वयंसेवी संस्था गेली २२ वर्षे अखंडपणे काम करत आहे. परिषदेतर्फे काढल्या जाणाऱ्या 'हाकारा' या आदिवासींच्या 'हाकाराच्या' माध्यमातून परिषद महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील आदिवासींपर्यंत पोहोचली आहे. आतापर्यंत परिषदेने अनेक विधायक उपक्रम आदिवासी भागात राबविले आहेत. या उपक्रमांमध्ये प्रामुख्याने आदिवासी कार्यकर्त्यांसाठी चर्चासत्र, प्रशिक्षण शिबिरे तसेच संशोधन प्रकल्प इ. समावेश होतो.

१९९३ साली संसदेने ७३ घटना दुरुस्ती करून भारतातील सर्व राज्यांमध्ये लोकांना सत्तेमध्ये सहभागी करून घेण्याच्या दृष्टीने 'पंचायत राज्य' अंमलात आणण्याची व्यवस्था केली आहे. तसेच आदिवासींचे हक्क सुरक्षित रहावेत म्हणून अनुसूचित क्षेत्रांसाठी खास तरतुदी कायद्यामध्ये करण्यात आल्या आहेत. 'पंचायत राज्य' साठीच्या असलेल्या सर्व तरतुदींची माहिती 'जुलै-सप्टेंबर १९९७' च्या हाकाराच्या खास अंकात देण्यात आली आहे.

## प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन

केवळ माहिती छापून भागत नाही तर ती गरजू लोकांपर्यंत पोहोचणे अत्यंत महत्वाचे असते. आणि या सामाजिक जाणीवेतूनच परिषदेने आदिवासी भागातील महिला ग्रामपंचायत सदस्यांसाठी 'पंचायत राज' या विषयावर प्रशिक्षण शिबिरांची मालिका आयोजित केली होती.

## प्रशिक्षणामागची पूर्वपीठीका

आदिवासी भागातील महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण अत्यंत कमी आहे. आश्रम शाळातील पटावरदेखील मुलींचे प्रमाण अत्यल्प असते व मुलींसाठी खास आश्रमशाळा काढण्याची गरज हा केवळ सार्वजनिक व्यासपीठावरील चर्चेचा विषय ठरला आहे. त्याबद्दल कोठलेही ठोस पाऊल उचलले गेले नाही. निरक्षरतेमुळे तसेच बाहेरच्या जगाशी फारसा संबंध नसल्यामुळे आदिवासी महिला विविध विकासाच्या योजनांच्या माहितीपासून वंचितच रहातात.

जंगलतोडीमुळे दिवसेंदिवस बिकट होत चाललेली जळणाच्या लाकडाची समस्या तसेच पिण्याच्या पाण्यासाठी करावी लागणारी वणवण यासारख्या विषयाचा ग्रामपंचायतीच्या तसेच ग्रामसभेच्या विषयपत्रिकेवर कधीच समावेश होत नाही.

आदिवासी समाजातील स्त्रीला अत्यंत मानाचे स्थान असले, तिचा दर्जा चांगला असला तरीदेखील पारंपारिक पंचायतीमध्ये महिलांना प्रतिनिधित्व नव्हते. घटनात्मक तरतुदींमुळे प्रथमच महिलांना ग्रामपंचायत तसेच अन्य स्थानिक स्वराज्य संस्थावर निवडून येण्याची संधी मिळाली आहे. महाराष्ट्रामध्ये १९९५-९६ साली झालेल्या निवडणुकांमध्ये एक तृतीयांश महिला सदस्य निवडून सर्व ग्रामपंचायतींमधून आल्या आहेत.

माहितीचा अभाव, अननुभव यामुळे निर्वाचित महिला सदस्यांना आपण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कारभारामध्ये आपण कोणती भूमिका बजावू शकतो याबद्दलचे ज्ञान नाही.

आदिवासी भागातील महिलांना विकासाच्या संकल्पनांची ओळख करून द्यावी, निर्णय प्रक्रियेमध्ये बजावायच्या भूमिकेबद्दल माहिती द्यावी, महिलांना भेडसावणारे जळणाचे लाकूड, पिण्याचे पाणी इ. प्रश्न प्राधान्याने मांडता यावेत, ग्रामपंचायतीच्या कारभारामध्ये सक्षमतेने सहभाग घेता यावा. या हेतूने ही प्रशिक्षण शिबिरे आयोजिण्यात आली होती.

पश्चिम महाराष्ट्र तसेच महाराष्ट्राच्या अन्य भागांमध्ये काम करत असलेल्या संस्थानी आपआपल्या कार्यक्षेत्रातील ग्रामपंचायत सदस्यांसाठी 'पंचायत राज' विषयावर शिबिरे आयोजित केली होती. परंतु आत्तापर्यंत आदिवासी भागातील पंचायत सदस्यांसाठी अन् त्यातही खास करून महिला सदस्यांसाठी कोणत्यांही संस्थेने प्रशिक्षण शिबिर घेतले नव्हते.

या प्रशिक्षण शिबिरांमध्ये पुढील विषयांवर चर्चा घडवून आणण्यात आली-

'पंचायत राज्य' संकल्पना आणि त्याचा अर्थ, ७३ वी घटनादुरुस्ती, आदिवासी भागासाठी खास घटनात्मक तरतुदी, ग्रामसभा, विविध सरकारी योजना, महिलांचा विकास कार्यामध्ये सहभाग, महिलांचे प्रश्न-जळणाचे लाकूड, पिण्याचे पाणी, दारूची समस्या.

महिला सदस्यांना ग्रामपंचायतीचा दैनंदिन कारभार चालवता यावा म्हणून पंचायत राज विषयक सर्व माहिती असलेला 'हाक़ारा'चा विशेषांक प्रशिक्षण साहित्य म्हणून भेट देण्यात आला.

### प्रशिक्षण शिबिराची तयारी

आदिवासी भागातील महिला ग्रामपंचायत सदस्यासाठी घेण्यात आलेल्या या शिबिरांसाठी खास तयारी करण्यात आली. सर्वप्रथम महिनाभर आधी तालुका पंचायत समितीमध्ये जाऊन गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी, पंचायत समिती, सभापती, उपसभापती व इतर महत्वाच्या व्यक्तींशी चर्चा करून प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली. जास्तीत जास्त संख्येने महिला सदस्य सहभागी व्हाव्यात म्हणून पंचायत समितीतर्फे त्यांना पत्रे पाठविण्यात आली तसेच ग्रामसेवकांमार्फतही निरोप देण्यात आले. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने देखील तालुक्यातील सर्व महिला सदस्यांशी पत्राद्वारे थेट संपर्क साधला.

### तक्ता क्र. १

| तालुका | प्रशिक्षण शिबिर संख्या | प्रशिक्षण तारखा | एकूण ग्रा.पं. | एकूण महिला सदस्य | उपस्थित महिला | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| धडगाव (जि. धुळे) | २ | १८, १९ ऑक्टो. ९७ | २५ | १०१ | ५२ | ५१.५% |
| जव्हार (जि. ठाणे) | २ | ८, ९ डिसेंबर ९७ | ७९ | २०५ | ६१ | ३०% |
| मोखाडा (जि. ठाणे) | १ | १२ डिसेंबर ९७ | २८ | ७२ | ४० | ५५.५% |
| पेठ (जि. नाशिक) | २ | २३, २४ मार्च ९८ | ८९ | २०५ | ७९ | ३८.५% |
| सुरगाणा (जि. नाशिक) | २ | २५, २६ मार्च ९८ | ५८ | १५२ | ५८ | ३८% |
| **एकूण** | **९** | **१८** | **२७९** | **७३५** | **२९०** | **३९.५%** |

महिला सदस्यांना सोयीचे व्हावे म्हणून प्रशिक्षण शिबिराची वेळ सकाळी १०.३० ते दुपारी ३.३० अशी ठेवण्यात आली. महिला सदस्यांना येणेजाणे सोयीचे व्हावे म्हणून तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती / ग्रामपंचायत कार्यालयात प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली.

प्रशिक्षण शिबिरांसाठी धुळे जिल्ह्यातील धडगाव, ठाणे जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा, तर नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा असे पाच तालुके निवडण्यात आले होते. या पाचही तालुक्यांमध्ये आदिवासींचेच प्राबल्य आहे. (अंदाजे सुमारे ९०%) या तालुक्यांमध्ये घेतलेल्या प्रशिक्षण शिबिरांचा तपशील तक्ता क्र. १ मध्ये दिला आहे.

जव्हार व पेठ तालुक्यांचा विस्तार खूप मोठा असल्याने या तालुक्यांमध्ये अनुक्रमे जव्हार व विक्रमगड तसेच पेठ व हरसूल अशा दोन वेगवेगळ्या ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. मोखाडा तालुक्याचा विस्तार छोटा असल्याने तेथे एकच शिबिर भरवण्यात आले. प्रत्येक प्रशिक्षण शिबिराला सुमारे ८० महिला सदस्यांना बोलावण्यात आले होते.

वरील तक्त्यावरून तसे लक्षात येते की धडगाव व मोखाडा तालुक्यांमध्ये महिला सदस्यांनी प्रशिक्षणाला उत्तम प्रतिसाद दिला. तर जव्हार तालुक्यात सर्वात कमी उपस्थिती राहिली. या प्रशिक्षण शिबिरांचा पाच तालुक्यातील सुमारे ४०% महिला सदस्यांनी लाभ घेतला.

प्रशिक्षणाला आलेल्या आदिवासी भागातील महिला ग्रामपंचायत सदस्यांची वैयक्तिक माहिती कळावी म्हणून त्यांना प्रश्न विचारून एक छोटीशी प्रश्नावली भरून घेण्यात आली. या प्रश्नावलीचे विश्लेषण केले असता खालील गोष्टी ठळकपणे पुढे आल्या.

### तक्ता क्र. २
### निर्वाचित महिला सदस्यांचा वयोगट

| वयोगट (वर्षे) | धडगाव | जव्हार | मोखाडा | पेठ | सुरगाणा |
|---|---|---|---|---|---|
| १८-२५ | २१% | १८% | २% | ८% | ७% |
| २६-३५ | ५५% | ४६% | ६०% | ४५% | ४३% |
| ३६-४५ | १४% | २६% | ३०% | ३४% | २९% |
| ४५+ | १०% | १०% | ८% | १३% | २१% |

धडगाव आणि जव्हार तालुक्यामध्ये तरुण महिला सदस्य निवडून येण्याचे प्रमाण २०% च्या आसपास आहे. इतर तालुक्यांमध्ये हे प्रमाण तुलनेने कमी आहे. या सर्व तालुक्यांमध्ये २६-३५ व ३६-४५ या मध्यम वयोगटातील महिला निवडून आल्या आहेत (सुमारे ७०-९०%). सर्व तालुक्यात वयाच्या पंचेचाळीसाव्या वर्षानंतर निवडून येण्याचे प्रमाण दहा टक्क्यांच्या आसपास आहे. मात्र सुरगाणा तालुक्यात २१% महिला या वयोगटातील आहेत.

### तक्ता क्र. ३
### महिला ग्रामपंचायत सदस्यांचे शिक्षण

| शैक्षणिक पात्रता | धडगाव | जव्हार | मोखाडा | पेठ | सुरगाणा |
|---|---|---|---|---|---|
| निरक्षर | ८२% | ३९% | ६७% | ६०% | ६७% |
| प्राथमिक | ६% | २३% | १८% | १९% | २१% |
| पूर्वमाध्यमिक | २% | २६% | १५% | १२% | ३% |
| माध्यमिक | १०% | १२% | - | ९% | ९% |

महिलांचे शिक्षण हा विकास प्रक्रियेच्या वाटचालीतील प्रमुख घटक समजला जातो. परंतु

भारतामध्ये आजही महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प आहे. या पार्श्वभूमीवर आदिवासी भागातील निर्वाचित महिला ग्रामपंचायत सदस्यांची शैक्षणिक पात्रता किती आहे हे जाणून घेणे सयुक्तिक ठरेल.

धडगाव तालुक्यातील ८२% महिला सदस्य निरक्षर आहेत. त्याखालोखाल मोखाडा व सुरगाणा येथे ६७% महिला सदस्य निरक्षर आहेत. भौगोलिकदृष्ट्या हे तिन्ही तालुके अत्यंत दुर्गम असे समजले जातात. गेल्या काही वर्षांमध्ये दळणवळणाच्या सुविधा वाढल्याने तेथील गावांचा बाहेरच्या जगाशी संपर्क येऊ लागला आहे. मात्र मुली व महिलांच्या शिक्षणाची स्थिती सुधारण्यास अजून काही वर्षे लागतील. त्यामानाने जव्हार तालुक्यात निरक्षरता कमी (३९%) आहे. या तालुक्यात प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिक्षण घेतलेल्या महिला सदस्यांचे प्रमाण ५० टक्क्यांच्या आसपास आहे. मोखाडा तालुका वगळता सर्व तालुक्यांमध्ये माध्यमिक किंवा त्यापेक्षा अधिक शिकलेल्या महिला सदस्यांची संख्या १०% पेक्षा अधिक आहे.

**तक्ता क्र. ४**

**महिला सदस्यांची निवड**

| निवड | धडगाव | जव्हार | मोखाडा | पेठ | सुरगाणा |
|---|---|---|---|---|---|
| बिनविरोध | ३५% | ५२% | ८% | ६५% | ७६% |
| निवडणुकीने | ६५% | ४८% | ९२% | ३५% | २४% |

१९९५-९६ साली झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमुळे महिलांना ग्रामपंचायतीवर येण्याची संधी मिळाली. या पार्श्वभूमीवर महिलांची ग्रामपंचायतीवर कशाप्रकारे निवड झाली हे पाहणे निश्चितच उद्‌बोधक ठरेल.

पेठ आणि सुरगाणा तालुक्यात अनुक्रमे ६५% व ७६% महिला सदस्य बिनविरोध निवडून आल्या. मोखाडा तालुक्यामध्ये केवळ ८% महिला सदस्यांची निवड बिनविरोध होऊ शकली इतर सर्वांना निवडणूक लढवूनच ग्रामपंचायतीत येता आले.

**तक्ता क्र. ५**

**ग्रामपंचायतीवर निवडून येण्याची वेळ**

| वेळ | धडगाव | जव्हार | मोखाडा | पेठ | सुरगाणा |
|---|---|---|---|---|---|
| पहिली | ९२% | ८८% | ९०% | ९६% | ९८% |
| दुसरी | ८% | ५% | १०% | ३% | २% |
| तिसरी अगर त्यापेक्षा अधिक | - | ७% | - | १% | - |

महाराष्ट्रामध्ये १९६० सालानंतर ग्रामपंचायती अस्तित्वात आल्या. तेव्हापासून आत्तापर्यंत अनेकवेळा ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. मात्र या निवडणुकांमध्ये कधीही स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळू शकले नाही. निवडणुका हा पुरूषांचाच प्रांत समजला जात असे. हेच चित्र वरील तक्त्यातून पहायला मिळते. सर्व तालुक्यातील ९०% किंवा त्यापेक्षा जास्त महिला प्रथमच ग्रामपंचायतीवर सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. आणि हे केवळ महिलांसाठी जागांचे आरक्षण केल्यामुळेच साध्य होऊ शकले. बोटावर मोजण्याइतक्या महिला दोन अथवा अधिक वेळा ग्रामपंचायतीत निवडून आल्या आहेत ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब.

**तक्ता क्र. ६**

**राजकारणामध्ये इतर नातेवाईकांचा सहभाग**

| सहभाग | धडगाव | जव्हार | मोखाडा | पेठ | सुरगाणा |
|---|---|---|---|---|---|
| आहे | २५% | ३२% | २८% | २५% | १५% |
| नाही | ७५% | ६८% | ७२% | ७५% | ८५% |

राजकारणामध्ये घराणेशाही या विषयावर सर्व पातळींवर चर्चा चालू असते. महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये झालेल्या आरक्षणामुळे या विषयाला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. प्रशिक्षण घेतलेल्या पाच तालुक्यांमध्ये निवडून येणाऱ्या महिला सदस्यांपैकी सरासरी २५% महिलांचे घरातील कोणी ना कोणीतरी नातेवाईक यापूर्वी ग्रामपंचायतीमध्ये निवडून आले होते. सुरगाणा तालुक्यात मात्र हे प्रमाण त्यामानाने कमी म्हणजे १५% होते. समाधानाची बाब म्हणजे सरासरी ७५% टक्के महिला या कोणत्याही राजकीय पार्श्वभूमीशिवाय निवडून आलेल्या आहेत.

परिषदेने ही प्रशिक्षण शिबिरे तर घेतली पण या शिबिरांच्या परिणामाचे मूल्यमापन करणे ही खरोखरच अवघड गोष्ट आहे. ६०-८० टक्के महिला सदस्य निरक्षर असल्याने त्यांच्याकडून प्रश्नावली भरून घेणे शक्यच नव्हते. म्हणून प्रत्येक शिबिराच्या शेवटच्या सत्रामध्ये शिबिरातील काही महिलांना शिबिराच्या कार्यक्रमाबद्दल बोलण्यास सांगितले.

सकाळी प्रशिक्षणाच्या सुरुवातीला अबोल असणाऱ्या महिला अत्यंत धीटपणे उभ्या राहून बोलू लागत. त्यापैकी काही प्रतिक्रिया खाली देत आहोत.

''आम्हाला निवडून येऊन दीड-दोन वर्षे झाली पण ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयी आम्हाला काहीच माहिती नव्हती. आजच्या या कार्यक्रमामुळे आम्हाला सरपंचाशी, ग्रामसेवकाशी, पंचायत समितीमधल्या साहेब लोकांशी कसं बोलायचं ते कळलं. आता यापुढे आम्ही त्यांच्यापुढे धीटपणाने बोलू आमचे प्रश्न मांडू, आणि त्यांना गावची काम करायला भाग पाडू.''

''आम्ही सर्व महिला ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलो असलो तरी यापूर्वी एकत्र येण्याची संधी कधी मिळालीच नव्हती. आज आम्ही प्रथमच एकत्र येऊन भेटत जाऊ व ग्रामपंचायतीच्या कारभाराविषयी चर्चा करू.''

''आजच्या शिबिरात आम्हाला खूपच छान माहिती मिळाली. साहेब, यापुढेही तुम्ही अशीच शिबिरे आमच्यासाठी भरवा. आम्ही निश्चितच अशा कार्यक्रमांना हजर राहू.''

काही अबोल महिला सदस्यांना बोलण्याचा आग्रह केल्यावर त्यांच्यापैकी सरुबाई बोलायला तयार झाल्या. ''साहेब तुम्हीं जे काही सांगताय ते चांगलं आहे आणि आम्हालाही ते समजलं आहे. जरी आम्ही आज, आत्ता या इथे तुमच्यासमोर बोलू शकत नसलो तरी आमच्या डोक्यात पक्क बसलं आहे. तुम्ही आम्हाला हे जे पुस्तक दिलं आहे ते आम्हाला वाचता येणार नाही कारण आम्ही अनपढ आहोत. पण आम्ही ते आमच्या मुलांकडून, शेजाऱ्या पाजाऱ्यांकहून वाचून घेऊ. मात्र आम्ही सर्व गोष्टीं लक्षात ठेवून आमच्या ग्रामपंचायतीचा कारभार सुधारण्याचा प्रयत्न करू.''

या सर्व प्रतिक्रियांमधून महिला सदस्यांचा आत्मविश्वास जाणवत होता. आणि याचा परिपाक म्हणून की काय कार्यक्रम संपल्यानंतर महिला सदस्य पंचायत समितीच्या विस्तार अधिकाऱ्यांपुढे आपआपल्या गावातील विकासाच्या कामांचे प्रश्न, तक्रारी धीटपणाने मांडत होत्या. हे चित्र सर्व शिबिरांच्या ठिकाणी पहायला मिळाले.

अधिक चौकशी केली असता असे समजले की काही महिला सदस्यांना पत्रेच मिळाली नव्हती तर काही जणी शेतीची कामे असल्याने येऊ शकल्या नाहीत.

या शिबिरांमध्ये परिषदेतर्फे प्रा. रा. के. मुटाटकर, श्री. पुरुषोत्तम आगाशे, डॉ. हेमंत आपटे, श्री. रविंद्र देसाई, आरती कौलगेकर यांनी मार्गदर्शन केले. तसेच

गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत विस्तार अधिकारी, पंचायत समिती सभापती व उपसभापती व अन्य सभासदांनी देखील महिला सदस्यांना मार्गदर्शन केले.


या शिबिरांच्या अनुभावातून पुढील गोष्टी प्रकर्षाने समोर आल्या.

१) या प्रकारची शिबिरे महाराष्ट्राच्या अन्य आदिवासींचे प्राबल्य असलेल्या ठिकाणीदेखील भरविली पाहिजेत.

२) केवळ महिला सदस्यांसाठीच प्रशिक्षण शिबिरे न घेता सर्व ग्रामपंचायत सदस्यांसाठी म्हणजे पुरूषांसाठीही घ्यावीत अशी मागणी पुढे आली. आदिवासी भागातील पुरुष सदस्यांना देखील अशा माहितीची गरज आहे.

३) फक्त एक वेळ प्रशिक्षण शिबिर घेऊन ग्रामपंचायतीच्या कारभारात बदल घडवता येणार नाही. महिला सदस्यांना सातत्याने प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यासाठी त्यांच्यापैकीच नेतृत्वगुण असलेल्या महिलांना प्रशिक्षित करून, त्यांच्याकडून अन्य महिलांसाठी नियमितपणे प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली पाहिजेत.

• • •



## बेडीबंद

काल रात्री रेलॉ नाचून
शिणलेला दमलेला देह
पहाडाच्या पायथ्याशी पडणाऱ्या
पाण्याच्या धारेत
निर्भय होऊन झोकून दिलास
आणि तेच रेलॉऽऽगीत
आताही ओठांवर घेऊन
आपल्याच धुंदीत नहात आहेस
पण सखे, लक्षात घे
कदाचित झुडूपाआडून एखादा कॅमेरा
तुझ्या असीम सौंदर्याला
बेडीबंद तर करत नाही ना ?
तुझा छातीवर नसलेला पदर
आणि दारिद्रयापोटी उघड्या ठेवाव्या लागणाऱ्या
मांड्या पोटऱ्या
त्यांच्या फोटोग्राफीला यश मिळवून देतात
आणि आर्ट गॅलरीत फेरफटका मारणारे लाळघोटे
जिभल्या चाटत असतात.
सखे ! अजून कशी अंधारातच ग तू ?
दारिद्र्य? आणि अज्ञानामुळे लादल्या गेलेल्या
काही प्रथा परंपरांना कां नाकारत नाहीस ?
या साऱ्यांचा निषेध करशील
तरच तुझी 'नुमाईश' थांबेल
नाहीतर
प्रत्येक आंबट शौकिनांच्या दिवाणख़ान्यात
नग्न होऊन बसशील पोस्टर रूपात
आणि बघे म्हणतील
व्वा ! काय माल आहे !

**- सौ. कुसूम अलाम**

# पुस्तक परीक्षण

**- डॉ. शौनक कुलकर्णी**

विख्यात मानवशास्त्रज्ञ प्रा. बी. एम. दासू यांच्या षष्ठयब्दीपूर्तीबद्दल झालेल्या चर्चासत्राच्या वेळी वाचल्या गेलेल्या एकूण तेवीस शोधनिबंधांचे 'स्डडीज इन अँथ्रोपोलॉजी रिसेंट परस्पेक्टिव्हस' (Studies in Anthropology : Recent Perspective) हे सार्थक सेनगुप्ता यांनी संपादित केलेले पुस्तक दिल्लीच्या इंटरइंडिया पब्लिकेशनने नुकतेच प्रकाशित केले. पुस्तकातील एकूण तेवीस लेख दोन भागात विभागले आहेत. पहिल्या भागात शारिरीक मानवशास्त्रातील तेरा लेख असून दुसऱ्या भागात सामाजिक / सांस्कृतिक मानवशास्त्रातील लेख आहेत. तिसरा भाग हा प्रा. बी. एम. दास यांची मानवशास्त्रज्ञ म्हणून असलेली कारकीर्द दाखविणारा आहे.

आय. पी. सिंग यांचा जीवशास्त्रीय मानवशास्त्राची व्याप्ती दाखविणारा पहिला लेख उद्बोधक आहे. जीवनाला साह्यभूत होणाऱ्या विविध घटकांचा विचार या लेखात केला आहे. होमिओस्टॅसिस (Homeostasis) तसेच वयपरत्वे होणारे बदल, प्रजनन, सजीवांचा उगम, उत्क्रांती, वांशिक समूह, त्यामागे असलेले अनुवंशशास्त्राचे महत्व. पर्यावरणातील घटक, साथीचे आजार, व्यक्तिची प्रतिकारशक्ती, मानवी विविधता, अनुवंशिक विविधता, विवाहसंबंध आणि वैद्यकीय मानवशास्त्रज्ञांची भूमिका, याप्रमाणेच मानवी अनुवंशशास्त्र, शरीरशास्त्र, पुराचिकित्साशास्त्र, पुरालोकसंख्याशास्त्र, सांस्कृतिक मानवशास्त्र या सर्व विषयांना एकत्रित आणणारे पुरामानवशास्त्र जसे महत्त्वाचे आहे त्याप्रमाणेच कार्यकारी क्रियांना सामावून घेणारे जैविक अनुकूलन हेही सजीवांच्या अस्तित्वाचे कारण आहे. लोकसंख्याशास्त्र विषयक अभ्यासही अनुवंशशास्त्राशी निगडित आहे. मानवेतर 'प्रायमेट' वर्गाचा अभ्यास हा उत्क्रांती आणि अनुकूलन या सारख्या घटकांसाठी आवश्यक आहे. मागच्या दहा हजार वर्षात मानवाने प्राप्त केलेल्या तांत्रिक ज्ञानाने, गेल्या दोन शतकात खूपच भरारी मारली आहे. डी. एन. ए. रेणूमध्ये नोंदलेली माहिती आणि मानवी जीनोम (Genome) आलेखित करण्याच्या कामातील प्रगतीमुळे ५०-१०० मिलियन डॉलर्सचे मोठमोठे प्रकल्प लिहिले जाऊ लागले. या अनुषंगाने शारिरीक आणि सांस्कृतिक घटक आणि मानवी जीवनाचा अभ्यास शालेय जीवनापासून होणे गरजेचे आहे. मानवी जीवशास्त्राची उपयोगिता आणि सामाजिक जाणिवा निर्माण करण्याचे काम जैविक मानवशास्त्रज्ञांना करायचे आहे. या सर्व दृष्टिने प्रा. दास यांनी केलेले काम गौरवास्पद आहे.

हर्बर्ट वाल्टर यांचा दुसरा लेख असून डिगो रक्तगट पद्धतीचे प्रमाण आणि वारंवारता यावर लिहिला आहे. अनुवांशिकता ही शारिरीक मानवशास्त्रातील रंजक आणि महत्त्वपूर्ण प्रणाली आहे. त्यातही रक्तगटाचा अभ्यास हा कौशल्यपूर्ण असून वय, लिंग आणि पर्यावरणादी घटकापासून अलिप्त असल्याने समाजाच्या अभ्यासात अनुवांशिक खूण म्हणून महत्वाची आहे. १९५५ मध्ये या रक्तगट पद्धतीचा शोध लागल्यानंतर विविध सामाजिक घटकांमध्ये त्या रक्तगटाच्या आवश्यक अशा रंगसूत्राचा (Genes) अभ्यास करण्यात आला. व्हेनेझुएलाच्या श्रीमती डिगो यांच्या गरोदरपणाच्या काळातील रोगप्रतिबंधक (Immunisation) औषधाच्या वापराने अँटिबॉडिज तयार होऊन नवजात अर्भकाला हिमोलायटिकचा आजार झाला होता. या ॲंटिबॉडीची इतर ॲंटिजेनबरोबर क्रिया करताना अमेरिकन, भारतीय आणि मंगोलवंशीयात त्याचे विशेष अस्तित्व जाणवले. आज

DI (A+B-) DF (A+B+) DI (A-B+) एवढे तीन रक्तगट माहित असून ते DIA आणि DIB या रंगसूत्रांकडून नक्की केले जातात. युरोप, आफ्रिका, अशिया, ऑस्ट्रेलिया, अमेरिका या खंडातील डिगो रक्तगटाच्या प्रमाणाचा तक्ता आणि नकाशा खूपच परिणामकारक झालेला आहे. भारतातील विविध ४० जमातीमध्ये केलेले काम आणि इतिहास समजून घेता DIA या रंगसूत्राचा प्रवाह मंगोलॉइड वंशाकडून संक्रमित झाला असावा. जगभरातून झालेल्या अभ्यासावरून लेखक असा मुद्दा पुढे आणतो की या रक्तगटाच्या रंगसूत्राचे प्रमाण भौगोलिक रचनेवरून आहे. आफ्रिका आणि युरोपात याचे प्रमाण अत्यल्प आहे. तर अशियाई विशेषत: हिमालयीन भागात याचे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच अमेरिका खंडातील वेगवेगळ्या जमातीत याचे वेगवेगळे प्रमाण आहे. लॅरिस विल्बर्ट यांनी असे प्रतिपादन केले आहे की गुणसूत्रातील अचानक बदलामुळे DIA हे रंगसूत्र अस्तित्वात आले असावे आणि हे प्रोटोमंगोलाइडच्या अमेरिकेतील स्थानांतरापूर्वी घडले असावे. हे स्थानांतर १५००० ते १८००० वर्षापूर्वी झाले असावे आणि उत्तर अमेरिकेऐवजी दक्षिण व मध्य अमेरिकेत हे लोक स्थायिक झाले असावेत. मॉरंट यांचे मतानुसार DIA हा मंगोलॉइड वंशियांचा गुणधर्म असावा आणि मंगोलेतर वंशातील त्याचे अस्तित्व हे अनुवंशिक संक्रमणातून म्हणजेच मंगोल आणि इतरांबरोबर सरमिसळीतून झाला असावा.

अेथनोजनेसिस ऑफ इंडियन मुस्लिम या रिझ्वी आणि शिल्बानी यांच्या लेखात समाजाची इतिहास, भाषाशास्त्र, पुरातत्व, शारिरीक आणि सांस्कृतिक मानवशास्त्रदृष्ट्या माहिती एकत्रित करण्यात आलेली आहे. पारंपारिक इस्लामधर्मातील उच्चनीचता न मानणारी प्रवृत्ती, एकेश्वर तत्व परंतु अनेकत्वाची भावना या ठिकाणी सांगितलेली आहे. इस्लाममधील पोटप्रकार, जमातींचा शारिरीक आणि अनुवंशिक शास्त्रानुसार अभ्यासक्रम तक्ता रूपाने सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

चौथे प्रकरण टी. एस. सिंग यांचे असून हातावरील मुख्य रेषा किंवा घडी पाडणाऱ्या रेषांसंबंधी परीक्षणात्मक विवेचन त्यात येते. भारतातील विविध जमातीमधील स्त्री पुरूषांचे हस्तरेखांचे प्रमाण वारंवारता तक्तारूपाने दिले आहे. प्रोटोऑस्ट्रॅलॉइड मध्ये याचे प्रमाण सर्वाधिक तर त्यानंतर मंगोलॉइड, कॉकॅसॉइड आणि निग्रिटो वंशाच्या जमातीत आहे.

भारतातील आदिवासींच्या आरोग्याचे स्वरूपावरील जी. सी. घोष यांचे पाचवे प्रकरण असून १९८१ च्या जनगणनेनुसार ४२७ आदिवासी जमाती असून एकूण लोकसंख्येच्या ८% त्याचे प्रमाण आहे. परंतु आदिवासी रहात असणाऱ्या भागातील पर्यावरण आणि त्यांची आर्थिक परिस्थिती यावरून त्यांचे आरोग्य आणि आहार हे महत्वाचे निकष ठरतात. आदिवासींच्या आरोग्याचे प्रश्न प्रामुख्याने अपुऱ्या आणि निकृष्ट आहारामुळे तसेच अतिसार आणि साथीच्या आजारामुळे निर्माण झाले आहेत. तसेच इतर कोणत्याही समाजापेक्षा आदिवासी समाजात वृद्धत्वाची चिन्हे लवकर दिसू लागतात. आदिवासींच्या स्वत:च्या अशा काही आरोग्यविषयक विचार किंवा परंपरा असतात आणि त्यानुसार त्यांची चिकित्सा, औषधपद्धती असते. त्यांचा औषधोपचार धार्मिक आणि जादूविद्येवर आधारित असतो. या सर्वावर उपाययोजना करण्यासाठी सरकारी योजना, आरोग्य केंद्र याची गरज प्रतिपादन करताना दोन परस्परविरूद्ध प्रक्रिया, एकात सामाजिक आरोग्यासाठी तर दुसरीकडे प्राचीन, परंपरागत औषधोपचार, दुखण्याकडे बघण्याचा दृष्टिकोन. यावर उपाय म्हणून एकात्मिक कार्यक्रमाची गरज लेखकास वाटते.

सहावे प्रकरण ह बी. ्ुोपाध्याय यांचे असून आजार (Morbidity) व आरोग विषयक काळजीचे लेपचांमधील स्वरूपाचा वि ार यात केलेला आहे. ख्रिश्चन आणि बौद्धामधील प्रौढांमध्ये रोगाचे प्रमाण अधिक आहे. औषधोपचाराचे प्रमाण चांगले असले तरी पारंपारिक औषधांची फारशी माहिती आणि श्रद्धा त्यांना नाही. सातवे करण हे पर्यावरण संबंधित मानवमितीय परिणामावर असून भिन्न सामाजिक, आर्थिक आणि कामाचे स्वरूप असणाऱ्या नऊ तेलगू समाजाचा विचार बी. मोहन रेड्डी, निर्मला आणि चेंगल रेड्डी यांनी केलेला आहे. संपूर्ण शाकाहारी आणि आर्थिक दृष्ट्या प्रबळ असणाऱ्या ब्राह्मण, मारवाडी आणि वैश्यांबरोबर शेती, कष्टाची कामे करणाऱ्या मजुरी करणाऱ्या रेड्डी, बालिया, मुस्लिम, माला, मेरूकाला आणि हेबी जमातीमधील १४ मानव मितीय आणि तीन फिजियॉलॉजिकल घटकांन्वये तपासणी करण्यात आली. यापैकी ब्राह्मण, मारवाडी आणि वैश्यात कातडीची घडी (Skin fold) मोठी आहे. विविध तक्ते, आलेख आणि शासकीय पद्धतीनुसार या सर्व माहितीचे उद्‌बोधक पृथःकरण देण्यात आले आहे.

आठवे प्रकरण बॅनर्जी, पाल आणि बंडोपाध्याय यांचे असून ABO रक्तगटाची बंगाली लोकातील माहिती देण्यात आली आहे. रेणुकादास यांच्या नवव्या प्रकरणात ईशान्य भारतातील लोकांचे तांबड्या रक्तपेशीसंबंधित अनुवांशिक घटकांचा साकल्याने विचार केलेला दिसतो. ABO रक्तगटाबरोबर MNS, डफी, डिगो या रक्तगटाच्या रंगसूत्रांची वारंवारता GLPD कमतरता, हिमोग्लोबिन E या विविध घटकांचा अभ्यास केला आहे. हिमोग्लोबिन E आणि बालमृत्यूचे प्रमाण यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे.

दहावे प्रकरण रंजनरेखा यांचे असून नैॠत्य भारतातील ग्लोबिन जीन म्हणजे रंगसूत्राचे प्रमाणावर आहे. नैॠत्य भारतातील समाजात मंगोलॉइड आणि कॉकेसॉइड वंशाचे लोक आढळतात. १९५४ मध्ये हिमोग्लोबिनचा चौथा घटक सापडला. ही एक बीटा साखळीतील अनियमितता आहे. ज्यात सव्वीसाव्या ठिकाणी ग्लुटामिक ॲसिडच्या जागी लायसिन येते. नैॠत्येकडील समाजात त्याचे प्रमाण देण्यात आले आहे. HBE समगुणीत रंगसूत्राचे माणसाचे आयुर्मान पुनुरुत्पादन क्षमता प्राप्त होईपर्यंत असते आणि गुणसूत्रात अचानक होणारे बदल सौम्य स्वरूपातील बीटा थॅलासिमियासाठी कारणीभूत ठरतो.

यापुढील अकरावे प्रकरण Gebhord Flat यांचे असून नैॠत्येकडील बोडो समाजातील हिमोग्लोबिनच्या अधिक वारंवारतेचा उगम यासाठी विचारात घेण्यात आला आहे. रंगसूत्राची वारंवारता आणि पिढी यांच्या तुलनेत बोडो, खासी यांचा आलेख तयार केला आहे. बारावे प्रकरण हे अे. के. घोष यांचे असून मेघालयातील समाजाची जीवनमानवशास्त्रीय आढावा (Profile) या लेखात घेण्यात आला असून मेघालयाची रचना, स्थान, भूशास्त्रीय, भौगोलिक रचना, खनिज साठे, हवामान, वातावरण याची संपूर्ण माहिती देऊन त्यानंतर समाज या मानवशास्त्रीय विचाराला हात घालण्यात आला आहे. प्रामुख्याने शारिरीक मानवशास्त्राचा अभ्यास असून शरीर वर्णनस्वरूपावर प्रथम भर देण्यात आला आहे. त्यानंतर रक्तगट, हस्तरेखाटन आणि अनुवांशिक घटकांनी दाखविली जाणारी माहिती, सामाजिक फरक, ABO, MH, Rh, रक्तगटाची फेनाईल थायो कार्बाबाइड सारख्या घटकांची सविस्तर माहिती येथे असून माहितीचे एकत्रिकरण या दृष्टिने नवोदित अभ्यसाकांना उपयुक्त लेख आहे. तेरावे प्रकरण हे स्वत: सार्थक सेनगुप्ता यांचे असून आसाममधील कोच समाजावर शारिरीक मानवशास्त्राच्या दृष्टिने प्रकाश टाकण्यात आला आहे. संपूर्ण प्रकरणात शारीरमिती त्याला लावलेली सांख्यिकी कसोटी, ABO, Rh रक्तगटाच्या

रंगसूत्राची वारंवारता, पी.टी.सी. चव गुणधर्म हस्तरेखाटन आणि त्यानुसारचे इनडायसेस (Indices) चक्रीत तक्तारूपाने माहिती असून, आढावा स्वरूपाचा हा लेख आहे.

यानंतरचा दुसरा भाग हा सामाजिक सांस्कृतिक मानवशास्त्रातील विविध शोधनिबंधाचा असून त्यात चौदापासून बावीसपर्यंत प्रकरणे आहेत. अजित दंडा यांचे वांशिकता आणि एकात्मता (Ethniciny of Integration) असा भारतीय संदर्भातील लेख आहे. सोव्हिएट युनियनमधील झालेल्या बदलानुसार भारतीय समाज त्यातील विविधता वेगवेगळे समूह, परंतु सांस्कृतिक वारशातील समानता येथे देण्यात आली आहे. याशिवाय समाजाचे वर्गीकरण करण्याची चालत आलेली प्रथा ही येथील वांशिकतेचे मूळ असून ते वैदिक काळाइतके जुने आहे. तसेच विविध शारिरीक ठेवणीचा वंश सांस्कृतिक विभिन्नता असलेल्या घटकांचे येथे झालेले स्थलांतर यामुळे विविध शारिरीक आणि सांस्कृतिक घटकांच्या एकजिनसी पणाला खूपच थोडा वाव होता. मुस्लिम राजसत्ता, येथे पोहोचलेला ख्रिश्चनधर्म, ब्रिटिश राजसत्तेचा उदय आणि त्यांनी निर्माण केलेला द्विराष्ट्रवाद येथील मूळ रहिवासी स्थलांतरीत होऊन झालेला समाज यांच्यात होत राहिलेली देवाणघेवाण, सामाजिक समरसता यामुळे येथील समाजात मूळ परंपरांना विविधतेची झालर वेळोवेळी लागत गेली.

पंधरावा लेख हा प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ के. सी. मल्होत्रा यांचा असून भारतातील जंगल व्यवस्थापनावर लिहिला आहे. भारतातील जंगले, तेथील रहिवासी त्यांच्या व्यवस्थापनाची नवी क्षेत्रे त्याला असणाऱ्या समस्या आणि प्राप्त संधीचा अभ्यास केला आहे जंगल संरक्षणासाठी आजूबाजूचे लोकही आपआपल्या परीने पुढाकार घेत असातात. चिपकोसारख्या चळवळीचे महत्व आणि जंगलनियोजनाची गरज प्रतिपादन केली आहे आणि नियोजनाचा आराखडा परिणामकारकरित्या देण्यात आला आहे. मिताली दास आणि अभिताभ बसू यांनी लिहिलेल्या सेवानिवृत्तीचे नियोजन आणि तडजोड (Retiremant Planning & adjuctmant) या लेखात साठ ते एकोणसत्तर वयातील मंडळींचा, त्यातील २/३ विभक्त कुटुंबपद्धतीत जगणाऱ्या, काही एकत्र कुटुंबातील तर काही अविवाहित राहून, वेगवेगळ्या प्रकारचे उद्योग-व्यवसाय करून निवृत्तीचे आयुष्य जगणाऱ्या लोकांच्या प्रश्नांचा साकल्याने विचार करून एक वेगळाच विषय हाताळला आहे. या मंडळींच्या बाहेरील आप्त मित्रांना दिलेल्या भेटी, त्यांचे छंद आणि त्यांचे एकूण स्वतःच्या कर्तृत्वाबद्दलचे समाधान या विषयावर माहिती संकलित करून लेखकाने असे निदर्शनास आणले आहे की शास्त्रीय व्यवसायात कार्यरत असलेल्या सुशिक्षित कोणाला तरी कामात व्यग्र असून सामाजिक जगापेक्षा भौतिकी जगाबद्दल समाधानी नाहीत. सतराव्या प्रकरणात ईशान्येकडील वृद्ध लोकसंख्या किंवा समाज यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ईशान्य भारतामध्ये वृद्धांची होणारी वाढ लक्षणीय आहे. वृद्धांच्या समस्या बदलत्या असून त्याचा वेळोवेळी अभ्यास होण्याची गरज आहे.

अठरावे प्रकरण बी. के. रॉय बर्मन यांचे आहे तर एकोणीसावे देवेन्द्र यांचे आहे. जेऊटी बारूआ यांच्या विसाव्या प्रकरणात व्यसनाधिनता मादक द्रव्ये आणि माफिया या संदर्भातील नैऋत्य भारतातील समस्यांचा विचार केला आहे. नवाश्मयुगापासून माहित असलेल्या अफूचा भारतातील प्रवाह, हिप्पोक्रेटसला माहित असलेला त्याचा उपयोग, मुघलकाळातील त्याचा प्रसार येथपासून मॉर्फीन, हेराईन, बाऊन शुगर, रालिपन कॅप्स्युल याचा अतिरिक्त वापर, गुवाहाटी, मणिपूर, मिझारोम, आणि नागालॅण्ड येथून होणारा

त्याचा प्रसार आणि एकवीस ते पस्तीस वर्षीय तरूणांमधील त्याच्या वापराची माहिती येथे देण्यात आली आहे.

एकविसाव्या इर्शाद अली यांच्या प्रकरणात आसामी मुस्लिम समाजाबरोबरील सामाजिक संबंधाचा विचार आहे तर आर. के. कार यांच्या बावीसाव्या प्रकरणात चहा मळ्यातील कामगारासंबंधी माहिती आहे. विविध जमातींचे कामगार एका ठिकाणी गुंतले असल्याने दैनंदिन आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि धार्मिक जीवनात त्यांच्या वांशिक व्यक्तिगत जीवनाला वाव मिळत नाही आणि त्यातून जे प्रश्न उभे राहतात ते लेखकाने मांडले आहेत. तेवीसावे प्रकरण हे 'टारो' समाजाचे राजकीय जीवन विचार दाखविणारे असून आर. के. रणजितसिंग यांनी लिहिले आहे.

शेवटच्या चोविसाव्या प्रकरणात प्रा. बी. एम. दास यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा आहे. १९३३ च्या एप्रिलमध्ये त्यांचा जन्म झाला. M.Sc, Ph.D आणि D.Sc. पर्यंत प्राप्त झालेल्या पदव्यांबरोबरच मानवशास्त्रज्ञ म्हणून केलेले योगदान मौलिक आहे. त्यांची एकूण दहा पुस्तके प्रसिद्ध झाली असून विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नियतकालिकातून संशोधनपर लेखही प्रसिद्ध झाले आहेत. एकूण त्यांना समर्पित केलेले हे पुस्तक मानवशास्त्राच्या अभ्यासकांना आणि संशोधकांना खूपच उपयोगी आहे.

स्टडीज इन ॲन्थ्रॉपॉलॉजी रिसेंट पर्सपेक्टीव्हज

संपादन : सार्थक सेनगुप्ता

प्रकाशक : इंटर इंडिया पब्लिकेशन, नवी दिल्ली

किंमत : ५५५/- रुपये

● ● ●

## थेअरी ऑफ टायगर प्रोजेक्ट

एक  
एक  
वाघ कमी पडू लागलाय दादा  
जंगलतोडीत झाड कोसळावं तस्सा  
परवा तर केलती सिरगणती  
मातीतल्या ठस्स्यांची  
म्युझियममधल्या नगांची  
उच्चभ्रू दिवाणखान्यातल्या मुंडक्यांची  
तरी एवढी तफावत कशी ?  
सिरगणतीचा गणपती बशिवल्यापासून  
वाघ टाकंना झाला लेंडकं  
वाग्ना झाला मोकळं  
पाणवठ्यावर जायेना झाला एकटं  
फोड्ना झाला नरडं  
तवा पाळीव झाल्याचा सर्वांना संशय!  
मचानावरल्या मालेमाचा तिरकामठा  
जणू हिस्कून वाघाने घेतला  
मन्ला, दुर्मिळ होण्यापासून वाच !  
एक एक कमी येआया लागलाय  
ट्रायबल प्रोजेक्ट कळाया लागलाय...

**- भुजंग मेश्राम**

# पुस्तक परिचय

**– ग. शां. पंडित**

**आदिवासींचा जीवन संघर्ष बोलका करणारी कविता**

कुसुम अलाम या 'हाकारा' परिवारातील म्हणायला हव्यात. त्या सतत आपल्या भावनांचे अविष्कार काव्याच्या माध्यमातून व्यक्त करीत असतात व 'हाकारा'तून त्याला दृश्य रूप मिळत असते. त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'रान आसवांचे तळे' या पहिल्या वाहिल्या काव्यसंग्राहातील काही कविता पूर्वी 'हाकारा'तून प्रसिद्ध झालेल्या आहेत. परंतु त्यांच्या इतरत्रही प्रसिद्ध झालेल्या कविता संकलित करून काव्यसुमनांचा हा पुष्पगुच्छ संग्रहाच्या रूपात प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहातील कविता केवळ आदिवासी जीवन संघर्ष चितारणारी नाही तर आदिवासी संस्कृती, याची अस्मिता व अस्तित्व टिकविण्यासाठी ज्या वीरांनी, विरांगनांनी लढा दिला त्यांच्याविषयी व समाजाला मानवतेची शिकवण देणाऱ्या फुले दांपत्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न कवयित्री केलेला आहे.

आदिवासी समाजाला त्यांच्या संस्कृतीला प्रस्थापित व्यवस्थेने सतत दूरच ठेवलेले आहे. त्यांचे अस्तित्व नाकारण्याचाच प्रयत्न वर्षानुवर्षे होत आलेला आहे आणि त्यामुळेच दबून राहिलेले हे दु:ख काही शिकल्या-सवरलेल्या आदिवासी नवयुवक-युवतींच्या अंतर्मनातून काव्याच्या रूपाने उफाळून बाहेर येत आहे. त्यांचे हे दु:ख या प्रस्थापितांना कळावे, त्यांच्या समस्या जगासमोर मांडल्या जाव्यात यासाठी प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या विरूद्ध शिंग फुंकणे गरजेचे आहे. आणि तेच कार्य सौ. अलाम यांच्या या विद्रोहवादी कवितेने केलेले आहे.

सौ. अलाम यांच्या कवितांचे अगदी सविस्तर पृथक्करण डॉ. विनायक तुमाराम यांनी या संग्रहासाठी लिहिलेल्या प्रस्तावनेतून केलेले आहे. त्यामुळे कविता समजायला, त्यातील आशयाचे आकलन होण्याला चांगलीच मदत होते. म्हणजे काव्याच्या रसात अधिक गोडी निर्माण होईल. रानआसवांचे तळे या अगदी समर्पक शीर्षक असलेल्या काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठही शीर्षकाला साजेसेच आहे.

हा काव्यसंग्रह एकदा तरी वाचावयास हवा; परंतु त्याच्या किंमतीमुळे लोक तो घेण्यास कितपत तयार होतील याबद्दल शंका आहे. खरेतर आणि मराठी पुस्तकांच्या किंमती भरमसाठ असल्यामुळे लोक पुस्तके विकत घेण्यास धजावत नाहीत. आणि हीच मराठी प्रकाशनांची शोकांतिका आहे. त्यामुळे चांगले साहित्य लेखांपासून दुर्लक्षित राहते आहे.

**रान आसवांचे तळे**

लेखिका : कुसुम अलाम

प्रकाशक : स्वत:च, मु. आलापल्ली,
जि. गडचिरोली

मूल्य : रु. ७० फक्त

• • •

# खंडीभर

एक्कीसव्या नक्षेत्राचे टोळधाडी आगमन
तवा घालायाच पाह्यजे कि
स्वातंत्र्यदेवतेचं जागरण
मनुन ते घातलं:
तर वाघ्या मन्ला
पार्लीमींटच्या कुकुरमधी अर्धाकच्चा इस्वाद
पेपरांयच्या ढगांतून मतलबी अफवांचा पाऊस
मुख्य प्रवाहाच्या कर्मठ चिखलात व्यवस्थेच्या भुऱ्यांत्या म्हैशी / शितयुद्धाचा HIV किडा सुसंस्कृत फिरतो सर्वत्र
खूनखराबीविना गोडीगुलाबी मूठ मूठ मुल्यांचा प्रसार सहज
शेअर मार्केटच्या सट्ट्याने काबिज शेत सत्ता नी साहित्य
पन्नास पावलं झाली नाही तो
तुम्ही स्वातंत्र्याचा खेळून खेळ दमला ना परत
मल्टीनॅशन्ल्टीच्या वाऱ्यावर रंगीबेरंगी झेंडे सळसळत
ह्यो गुलाम वाघ्या बगा कसा हसत खेळत!
अर्बाटाची शेकोटी पेटवतांना पाहुण्या म्हाताऱ्याने लावली कळ
त्याच्या अंगात घुमाया लागला इथ्यासं्
मन्ला; ५० सालात ठर्ऱ्ना झाली स्वतंत्र व्याख्या
मुक्त जगाच्या कोंडल्या कॉलन्यांमधी तो कैद असावा
बिच का रास्ता नही पाशआधी बुद्ध म्हन्लेच ना
पर मनून काय येशू कालमापनापुरता ऊरला ?
श्रमाची प्रतिष्ठा दावूनही त्यांनी नापासवला मार्क्सला
जगाच्या खेड्याची सपनं दावणारा गांधीबी उशीरा कळला
लोकमान्यांनी बोकांडी बसीवलाच ना स्वातंत्र्याचा गणपती
लिंगापल्याडच्या इद्यापीठात नेलं जोतिबांनी, नी
जाती-पोटाच्या पैलतिरी बाबासायेबांहि!
वाघ्या लागला गायाया;
नवलाख पायऱ्या चढल्यावर जशी इरळ हवा
पणतूनं ओरबडावी पूर्वजाची रगतगाथा
आमी इसरलो जिण्याच्या अर्बाटाची भाषा
वैमान्यावानी रचल्या भाकडकथां
तवा संस्कृतीचं गिऱ्हाणं सुटलं!
इस्कोट व्हायाचा तो झालाच
जवा दूभती गाय सोडून झव्तं गाढव ऊरावं घेतलं-
धोंड्याच्या मह्यन्यात अवकाळी पाऊस
तस्सी तुम्ची पिढी झाली पाप्युलर माजवली हौसमौज
आराध्यांचे धंदे बसवाया गावोगाव कवेता
भटकभवानी कवतेला कधी गाव असते का ?
गांधीबाबा बोल्ले मनून खेड्याकडं जाता का ?
इत्यास भूगोलाचा कवाच मिटला घोटाळा
जगभरच्या रेडइंडियन्समुळे
संस्कृतीचा एकात्मिक घोटाळा तेवढा नापास झाला!
लंगर तोडतांना मुरळी मन्ली
माजं कुणी ऐकलच नाही
तवा हे शेंडेफळू दशक मन्लं; फुडं ऐकू,
समारोपात कुपोषणाचा ठराव झाल्यानं
ग्लोबल गावजेवण फुक्कट गेल
खंडीभर वरणात मुतावं तसं या दशक्यानं क्येलं!

**- भुजंग मेश्राम**

# म्हसा जत्रेचा तमाशा

१.

हे शिवसवंकर गिरजा तनया गणनायक प्रभूवरा
शुभकार्याच्या शुभप्रारंभी नमन तुला इस्वरा ऽऽ
नमन ज्यॉल
आगमन संपील्
पागोटे-शेले-कॅप
हौसे-गव्से-नव्से गच्च
गण गौळण झक्क्
थेटरं भरली
चांदण्यावानी
बैलांच डोळे चकाक लख्ख्
थर्थरत्या कातडीची भूक
झूल बाशिंग कडबा
हम्म्बॉ ऽ हम्म्बॉ -
नाच्यान् टकारले कान
धरला त्योच ठेका
वहाव्वा वहाव्वा ऽ

२.

सोताच्या घरॉन् बनवू डझन मेंब्रा
दूधात काळू नदीचे पाणि
सोसायटी दुधाची विकासाची हंबरा
हाल्याला हाक मारा,
न्हाव्यांही वढ्यावर बोलवा
वढ्याव् खंडीभर बाया
मणभर कपडे ढिगभर गप्पा
सासूरवासिनीचा राग कपड्यावर पक्का
डोळे फाडू फाडू बघतोय रेडा
हाल्याची कातडी बिचारी पतली
भादरता भादरता काजू कतली
हाल्याला दलदल, न्हाव्याला बदुतं
सासरवास्नीला कुटकं गायकीला कुड्तं
कितीबा धुतलं धुणं
काळजीनं लगीच मळ्तं
हाल्या हाल्या दूध् दे
बाया माणसांही माजू दे
प्राणिमात्रांही विकू दे
चांगला भाव येऊ दे
म्हशाची जत्रा गाजू दे
हाल्या हाल्या लोणीऽ
तूप ? न्हाय
हाल्या हाल्या!

३.

लोकनाट्य तमाशा मंडळाचा बोर्ड बघून
नवरा थांबवतो घोडा
अख्ख्या वऱ्हाडाचा विचका
जशी पांगवली पाखरां
नवऱ्याच्या हातात लिंबासंग जंबीया
गावच्या येशीवर म्हशाची जत्रा

येसकर गातो नवऱ्याचा पोवाडा:
नवरा आला वेश्येपाशी
नवऱ्या नवरी कस्सी नेशी ?
देईन मावशीला मान
नायकीन् जींकूनं नेईन -
नवरा आला पालापाशी
नवऱ्या नवरी कस्सी नेशी ?
देईन दलालाला मान
गाय विकत घेईन -
नवरा आला जत्रंपाशी
नवऱ्या नवरी कस्सी नेशी ?
देईन म्हसोबाला मान
हौस फिटवून टाकीन -
न्हवरा आला, न्हाय न्हाय
न्हवरा गेला संस्कृतीपाशी
न्हवऱ्या नवरी कस्सी पेल्सी ?
नवऱ्याच्या घोड्याला जत्रंत भरघोस किम्मत
खचली नवऱ्याची हिम्मत
नवरा घोडा होऊन खिंदळत...

**४.**

चला चला जत्रंला चला
म्हशाची जत्रा
बाजाराची जत्रा
आजाराची जत्रा
कलेची मात्रा
सफाईसंग कचरा
म्हशी ग म्हशी
मला कुठे नेशी
रेड्या रे येड्या
किती वलांडल्या येशी ?
कुणब्या रे कणग्या
झाली का कर्जमाफी ?
लिड्रा रे गदळ्या
भास्नाला भेट्ली का टाळी ?
दलाला रे कलाला
घाण चाळे रुमालाखाली
सरपंचा रे महंता
टोलनाक्याची भरली का थैली ?
बैला रे बैला
कडबा फेकून कुठं हिर्वळ शोधसी ?
पळा पळा
माळशेजेचा नाग शिरला जत्रंमधी!

**५.**

रवंथ करता करता चर्चा:
मागच्या वर्षी कसा होता आडदांड
तरी मालकानं विकाया काढलाय ?
शेतकऱ्यासंग कसाई बी आलायऽ-
जशी ज्याची तब्यीयत
तसे भविष
तवा गड्या
मरस्तोर खा कडबा
टाळ कत्तलखाना!

**- भुजंग मेश्राम**

# सूची


१) जानेवारी - मार्च १९८० - जबरन जोत जंगल जमीन

२) एप्रिल - जून १९८० - आदिवासी व शिक्षण

३) जुलै - सप्टेंबर १९८० - आदिवासी व वनसंवर्धन

४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० - आदिवासी साहित्य व कला

५) जानेवारी - मार्च १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती

६) एप्रिल - जून १९८१ - आदिवासी व आरोग्य

७) जुलै - सप्टेंबर १९८१ - रोजगार हमी योजना

८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ -

९) जानेवारी - मार्च १९८२ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम

१०) एप्रिल - जून १९८२ - धरणे व विकास

११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ - जंगल व्यवस्थापन

१३) जानेवारी - मार्च १९८३ - आदिवासी व दारू

१४) एप्रिल - जून १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी

१५) जुलै - सप्टेंबर १९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य

१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१७ - १८) जानेवारी - जून १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य

१९) जुलै - सप्टेंबर १९८४ - आदिवासी स्त्री

२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण

२१) जानेवारी - मार्च १९८५ - आदिवासी संघटन

२२) एप्रिल - जून १९८५ - जमीन हस्तांतर

२३) जुलै - सप्टेंबर १९८५ - आदिवासी महिला

२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ - आदिवासी व सरकार

२५) जानेवारी-मार्च १९८६ - जंगल व धरण

२६) एप्रिल - जून १९८६ - आदिवासी कला

२७) जुलै - सप्टेंबर १९८६ - आदिवासी व वेठबिगारी

२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय

२९) जानेवारी - मार्च १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न

३०) एप्रिल - जून १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल

३१ - ३२) जुलै - डिसेंबर १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न

३३) जानेवारी - मार्च १९८८ - सवलती अपहरणाची समस्या

३४) एप्रिल - जून १९८८ - आदिवासी साहित्य

३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती

३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक

३९ - ४०) जुलै-डिसेंबर १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन

४१ - ४२) जानेवारी - जून १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती

४३) जुलै - सप्टेंबर १९९० - जागतिक आदिवासी

४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

४५ - ४६) जानेवारी - जून १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

४७) जुलै - सप्टेंबर १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्य

४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती

४९ - ५०) जानेवारी - जून १९९२ - सर्वसाधारण आदिवासी

५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ - अनुताई वाघ विशेषांक

५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव

५५ - ५६) जुलै - डिसेंबर १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन

५७) जानेवारी - मार्च १९९४ - सर्वसाधारण आदिवासी

५८) एप्रिल - जून १९९४ - आदिवासी एकता परिषद

५९) जुलै - सप्टेंबर १९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका

६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ - आदिवासी जमाती

६१ - ६२) जानेवारी - जून १९९५ - राणीपूर विशेषांक

६३) जुलै - सप्टेंबर १९९५ - कुपोषण विशेषांक

६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ - पर्यावरण विशेषांक

६५) जानेवारी - मार्च १९९६ - आदिवासी जमाती

६६) एप्रिल - जून १९९६ - महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा

६७) जुलै - सप्टेंबर १९९६ - आदिवासी जमाती

६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ - आदिवासी शिक्षण

६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ - वारली लोकगीते व बोलीभाषा विशेषांक

७१) जुलै - सप्टेंबर १९९७ - पंचायत राज विशेषांक

७२) ऑक्टोबर - डिसेंबर १९९७ - साहित्य संमेलन विशेषांक

७३) जानेवारी - मार्च १९९८ - वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनीऑर्डरनेच पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व संपूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

Printed by Shailesh Art